# माणूस

शनिवार । २६ ऑगस्ट १९७८ । ७५ पैसे

सक्तीचे कुटुंबनियोजन हा आणीबाणीच्या काळात बदनाम झालेला कार्यक्रम. पण या कार्यक्रमाला 'माणूस 'ने नुकत्याच घेतलेल्या जनमतकौलात मतदारांनी भरघोसपणे उचलून धरलेले आढळले.

राजकीय पक्ष या गंभीर प्रश्नाला स्पर्श करायला अजूनही बिचकत आहेत. पुरोगामी म्हणून सत्तेवर आलेल्या नव्या महाराष्ट्र सरकारने आपल्या ४० कलमी कार्यक्रमात या कार्यक्रमाला गौण स्थान दिले असले तरी सर्वसामान्य नागरिकाला— मग तो खेडयातला असो की शहरातला – हा कुटुंबनियोजन-कार्यक्रम, पिण्याच्या पाण्याची सोय व बेकारीनिर्मूलन याखालोखाल महत्त्वाचा वाटत आहे.

**मग सरकारने 'पुनश्च हरिः ॐ' का म्हणू नये ?**
**मागील चुका टाळून पुढे जाण्याचा अट्टाहास का बाळगू नये ?**

या दृष्टीने उपयुक्त ठरणारा यापुढील अंक

## माणूस : कुटुंबनियोजन विशेषांक

**किंमत दीड रुपया**

या अंकी....

'माणूस' एकलेखकी वर्षारंभ विशेषांकाचे लेखक
विजय परूळकर
यांनी घेतलेल्या पाच मुलाखती....

१ : अर्थमंत्री श्री. शंकरराव चव्हाण
२ : रोजगार-विकास मंत्री श्री. निहाल अहमद
३ : उद्योगराज्यमंत्री श्री. विनायकराव पाटील
४ : उद्योगपती श्री. माधवराव आपटे
५ : डॉक्टर बानू कोयाजी

शिवाय डॉ. उल्हास लुकतुके यांचा खास लेख

**प्रश्न संख्येचा आहे; मनांचा नाही ?**

## साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे-अंक तेरावा
२६ ऑगस्ट १९७८
मूल्य ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
◘
वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये
◘


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
◘


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
◘
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
◘
दूरध्वनी : ४४३४५९
◘


मुंबई वार्ता । विनय सहस्रबुद्धे

# विद्यार्थ्यांना विधायकतेचा उपदेश करणारी वृत्तपत्रे सनसनाटी आणि हिंसक कृत्यांनाच प्रसिद्धी का देतात ?

९ ऑगस्टला मुख्यमंत्री शरद पवार यांनी केलेल्या घोषणेमुळे फी-वाढविरोधी विद्यार्थ्यांचे आंदोलन पुन्हा एकदा वर्षभरासाठी स्थगित झालं आहे. सरकारच्या संकल्पित अभ्यासगटाचा अहवाल पुढील शैक्षणिक वर्षापर्यंत हातात येईल आणि त्यात सुचविलेल्या फीवाढीनुसार विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा आंदोलन हाती घ्यावं लागेल.

फीवाढीच्या प्रश्नावर पुण्यात चर्चा, परिषदा, परिसंवाद असे कार्यक्रम चांगल्या प्रमाणात झाले; पण मुंबईच्या डायनॅमिक आणि डॅशिंग विद्यार्थ्यांना अशा फालतू चर्चा आणि परिषदांना वेळ नव्हता. त्यांनी आपलं लक्ष मोर्चे आणि कॉलेजबंदीची आवाहने यावर केंद्रित केलं होतं. विधानसभेत निवेदन होणार हे माहीत असताना मुद्दाम त्याच दिवशी एक मोर्चा विधानसभेवर नेण्यात आला. मोर्चात गडबड, लाठीमार, विद्यार्थ्यांनी मार खाऊन पडणं, विद्यार्थिनींनी त्यांना पाणी आणून पाजणं हे सगळे प्रकार मग ओघानं आलेच.

मग एक दिवस कॉलेज बंदचे प्रकार झाले. निरोधने किंवा प्रचाराच्या जोरावर कॉलेज बंद पाडणं हे परंपरागत प्रकार झाले. क्रांतिकारी विद्यार्थ्यांना ते कसे मानवणार? माटुंग्याच्या एका कॉलेजात भराभर शंभर एक क्रांतिकारी विद्यार्थी घुसले आणि मधल्या पटांगणातून सरळ खिडक्यांवर दगडफेक सुरू झाली. बिचाऱ्या प्राचार्यांनी लगेचच आपणहून कॉलेज बंदची नोटिस काढली! आणखी एका कॉलेजातही प्राचार्यांनीच (क्रांतिकारी विद्यार्थ्यांना घाबरून?) कॉलेज अधिकृतपणे बंद ठेवण्यात पुढाकार घेतला होता. एका कॉलेजात म्हणे काही प्राध्यापकांनीच तास घ्यायला नकार दिला. कॉलेजबंदीची ही आवाहने दोन स्वतंत्र तारखांना केली होती, आपल्या 'बळावर' आपण कॉलेज बंद पाडू शकतो हे दाखविण्यासाठीच हा प्रकार होता की काय?

८ ऑगस्टला कृतिसमितीच्या विद्यार्थ्यांनी आपला मोर्चा मुंबई विद्यापीठाकडे वळविला आणि अवघ्या अर्ध्या-पाऊण तासात विद्यापीठ 'ताब्यात' घेतलं. गनिमी काव्यानं किल्ला जिंकल्याच्या थाटात कृतिसमितीचा ध्वजही विद्यापीठावर लावण्यात आला. कुणा एका सरोज त्रिपाठीची कुलगुरू म्हणून नेमणूक केली गेली. पद्धतशीर पत्रकारपरिषद वगैरेही झाली. विद्यापीठाच्या मालमत्तेचा काही

तास उपभोग घेऊन रात्री साडेआठला या शूर क्रांतिकारी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचा ताबा सोडला.

विद्यापीठ ताब्यात घेतलं गेलं तेव्हा कुलगुरु तिथे नव्हते. एका वृत्तपत्रीय वृत्तांतानुसार ते त्या दिवशी घरीच बसून राहिले आणि धडामोडींच्या बातम्या ऐकत त्यांनी सुटी ' एंजॉय ' केली. पोलिसांनी हस्तक्षेप केला असता तर परिस्थिती चिघळली असती हे कुलगुरूंचं प्रतिपादन सकृत दर्शनी योग्य वाटेल; पण या अहिंसक मार्गामुळे एक अत्यंत बेशिस्त आणि अनाठायी परंपरा पडते त्याचं काय ? उद्या कुठल्याही मागणीसाठी विद्यापीठाच्या कचेऱ्या किंवा महाविद्यालये अशी शेदीडशे विद्यार्थ्यांनी ताब्यात घेतली तर त्याला जबाबदार कोण ? आणि एकदा आपण विद्यापीठ ताब्यात घेऊनही सहीसलामत सुटू शकतो हे विद्यार्थ्यांच्या ध्यानात आल्यावर ते हाच मार्ग अवलंबिणार नाहीत हे कशावरून ? विद्यापीठात या मुलांनी परीक्षाविभागाला हातही लावला नाही असं हे विद्यार्थी सांगतात. कदाचित ते खरंही असेल; पण जर परीक्षाविभागातही उलथापालथ झाली असती तर ज्या लाखो विद्यार्थ्यांचं भवितव्य त्या विभागात आहे त्यांच्यावरील अन्यायाला जबाबदार कोण ?

पण विद्यार्थी तरी इतका सनसनाटी मार्ग का अवलंबितात ? एका विद्यार्थी-नेत्याच्याच शब्दात सांगायचं तर केवळ प्रसिद्धीसाठी ! मुंबईतल्या तमाम वृत्तपत्रांनी या एकूण प्रकाराला ज्या प्रकारे व ज्या प्रमाणात प्रसिद्धी दिली होती ती लक्षात घेतली तर या विद्यार्थीनेत्याच्या भावना समजू शकतील. शांततापूर्ण मोर्चे, निवेदने, शिष्टमंडळांच्या भेटी, सत्याग्रह या कार्यक्रमांना कोण प्रसिद्धी देतो ? शीर्षवृत्ताचा मान हवा असेल तर असंच काही तरी खळबळजनक करायला हवं. विद्यार्थीनेत्याचं हे प्रतिपादन योग्य आहे किंवा काय हा वादाचा विषय ठरेल; पण विद्यार्थ्यांना विधायकतेचा उपदेश करणारी वृत्तपत्रे सनसनाटी आणि हिंसक वृत्तांनाच अधिक प्रसिद्धी देतात ही वस्तुस्थिती मान्य करावी लागेल.

विद्यार्थ्यांच्या या विद्यापीठावरील चढाईपाठोपाठ सरकारने फीवाढ रद्द केल्याची घोषणा केली. वास्तविक दि. ७ ऑगस्टला झालेल्या एका संयुक्त बैठकीत आपापले मुद्दे मांडण्याची एक संधी सरकारने विद्यार्थीसंघटनांना दिली होती; पण शिक्षणमंत्र्यांच्या आश्वासनासाठी विद्यार्थीनेते अडून बसले आणि सभात्याग करून मोकळे झाले. ज्यांनी सभात्याग केला नाही त्या सर्वांनीच फीवाढीची अतिशय परखड आणि शास्त्रीय चिकित्सा केली व त्यामुळे आपण प्रभावित झालो असे खुद्द शिक्षणमंत्र्यांनीच सांगितले. ज्यांच्याजवळ चर्चेसाठी मुद्दे नव्हते त्यांनी सभात्यागाचा सोपा मार्ग स्वीकारला असा याचा अर्थ काढावा का ?

जाता जाता विद्यार्थीसंघटनांबद्दल थोडेफार लिहिता येईल. सॅफॅक या नावाने ओळखल्या जाणाऱ्या कृतिसमितीत काही साम्यवादी संघटना होत्या. यातले बरेचसे नेते या आंदोलनामुळेच विद्यार्थ्यांना माहीत झाले. मार्क्सवाद्यांची संघटनाही काही काळ त्यांच्याबरोबर होती. मग मात्र स्टुडंटस् फ्रंटच्या नावाखाली त्यांनी वेगळी चूल मांडली. विद्यार्थीसेना आणि विद्यार्थीपरिषद यांच्या चुलीसुद्धा स्वतंत्र होत्या. सेनेचे धोरण आक्रमक होते. विद्यार्थीपरिषदेने बराच काळ या प्रश्नावर मौन पाळले होते. त्यांचे कार्यकर्ते विविध प्राचार्य आणि अधिकाऱ्यांना भेटून फीवाढीची शास्त्रीय पहाणी करण्यात मग्न होते; पण एकूण हे काम खूपच रेंगाळले आणि परिषदेची भूमिका बराच काळ अस्पष्ट राहिली. विद्यार्थ्यांनी विद्यापीठ ताब्यात घेतल्यावर, उशीरा परिषदकार्यकर्त्यांनी प्रतिवेढा वगैरे प्रयत्न करून बघितले; पण त्यापूर्वीच कृतिसमितीचे विद्यार्थी विद्यापीठ सोडून गेले होते.

मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु सध्या परदेशदौऱ्यावर आहेत. येत्या नोव्हेंबरमध्ये निवृत्त होणारे विद्यापीठाचे कुलपतीदेखील ' निवृत्तिपूर्व लाभ ' पदरात पाडून घेण्यासाठी कुलगुरूंबरोबर परदेशवारीवर आहेत. विद्यापीठात कर्मचाऱ्यांचा असहकार सुरू आहे. अद्याप हजारो विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे निकाल लागायचे आहेत. बी. ए. चा निकाल ३० सप्टेंबरला लागेल अशी बातमी आहे. अशा परिस्थितीत कुलगुरूंनी महिना-दीड महिना परदेशी जाणे नैतिकदृष्ट्या समर्थनीय नाही. एकूण मुंबई विद्यापीठ म्हणजे सध्या तरी अगदी आनंद आहे. विद्यापीठातील कर्मचाऱ्यांचा असंतोष, विद्यापीठ सिनेटने पूर्वी घेतलेले बेजबाबदार निर्णय, माजी कुलपतींचा भ्रष्टाचार या सगळ्या प्रकरणांची नव्या सरकारने जरूर चौकशी केली पाहिजे.

जवळजवळ येणाऱ्या विद्यापीठ-निवडणुकांकडे लक्ष ठेवून विद्यार्थीसंघटना आंदोलने हातात घेतात. त्यामुळे विद्यापीठातील प्रश्नांची, विद्यार्थ्यांच्या समस्यांची सोडवणूक होण्यापेक्षा हे राजकारणच अधिक महत्त्वाचे मानले जाते. परीक्षांचे निकाल उशीरा लागणे हे आता नित्याचेच झाले आहे; पण यामागे वेतनाच्या प्रश्नावरून विद्यापीठ, कर्मचारी व सरकार यांच्यात निर्माण झालेला तिढा अद्यापही सुटलेला नाही हे महत्त्वाचे कारण आहे. तो सुटेल असे प्रयत्न विद्यार्थीसंघटनांकडून का होऊ नयेत ? विद्यापीठ ताब्यात घेण्याचा प्रकार बहुतेक विद्यार्थ्यांना फारसा रुचलेला नाही. मूळ प्रश्न सुटण्यापेक्षा संघर्षाची धार तिखट होण्यातच अशा उपायांची परिणती होते.

विद्यार्थ्यांनी फीवाढीसंबंधातही एखादी पर्यायी योजना सुचविली तर सरकारने जरूर तिचा विचार करावा. लोककल्याणकारी राज्यात मोफत शिक्षणाची अपेक्षा असते. ही अपेक्षा जर पूर्ण होत नसेल तर निदान शिक्षण महाग होणार नाही याकडे तरी सरकार लक्ष देईल अशी आशा आहे. नव्या अभ्यासगटाचे सदस्य या प्रश्नाच्या अशा सर्व बाजू विचारात घेतील काय ?

# प्रमोद महाजन यांची मुलाखत

विद्यापीठनामांतराच्या प्रश्नावरून मराठवाड्यात उसळलेली दंगल आणि तिचे सादपडसाद हा आता एक सार्वजनिक चर्चेचा विषय बनला आहे. मुंबईत तर या प्रश्नावरून मोर्चे, चर्चा, परिसंवाद यांचे सत्रच सुरू आहे. वृत्तपत्रांतूनही आरोप-प्रत्यारोप होत आहेत. आतापर्यंत दंगलीचे दैनंदिन वृत्त वर्तमानपत्रांतून येतच होते; पण पुनर्वसनाच्या दृष्टिकोनातून मराठवाड्याचा दौरा केल्यानंतर त्याचा अहवाल सर्वप्रथम प्रसिद्ध केला तो महाराष्ट्रात जनता युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी.

ही दंगल का घडली ? त्याला कोणाची विधाने किंवा कोणाचे निर्णय कारणीभूत ? या सत्यशोधनाच्या उपद्व्यापापेक्षा तिथली वर्तमान सामाजिक परिस्थिती, त्यातील तणाव आणि त्यानुसार पुनर्वसनाची व मुख्यत: एकात्मतेसाठी काम करण्याची दिशा ठरविणे हे अधिक महत्त्वाचे आहे.

गेल्या गुरुवारी (दि. १७) जनता युवाचे नेते श्री. प्रमोद महाजन यांनी मुंबईत एका पत्रकारबैठकीत त्यांच्या संघटनेने केलेल्या पाहाणीची माहिती दिली. पत्रकारसंघातील वार्तालापात श्री. महाजन यांनी या आंदोलनाची कुळकथा विस्ताराने सांगितली.

गेल्या वर्षी मेडिकलच्या प्रश्नावरून मराठवाडा विद्यापीठातील विद्यार्थीसंघटनांनी एक कृतिसमिती स्थापन केली. या समितीत दलितांच्या संघटनाही होत्या. आपल्या इतर अनेक मागण्यांसह मराठवाडा विद्यापीठास डॉ. आंबेडकरांचे नाव देण्याच्या मागणीचाही या कृतिसमितीने पाठपुरावा केला. पुढे मेडिकलच्या विद्यार्थ्यांचा प्रश्न तात्पुरता सुटला, तेव्हा नामांतराचा एकच प्रश्न अनिर्णित राहिला होता. पूर्वी ज्या २१ संघटनांनी या प्रश्नाला पाठिंबा दिला होता त्यांनी केवळ नामांतराचाच प्रश्न अनिर्णित राहिल्यावर कृतिसमितीतून अंग काढून घेतले.

पुढे वसंतदादांनी या प्रश्नावर निर्णय घेण्याचे बराच वेळ टाळले औरंगाबादेत ते गेले तेव्हा कोणत्याही शिक्षणसंस्थेला व्यक्तीचे नाव दिले जाणार नाही अशी घोषणाही त्यांनी केली होती. मुंबईत आल्यावर त्यांनी निर्णय फिरविला; पण औरंगाबादकर मात्र वसंतदादा 'नामांतरविरोधी होते' अशाच भाबड्या कल्पनेत राहिले.

नवे शरद पवार सरकार आल्यावर मराठवाड्यातील सर्वपक्षीय आमदारांची एक बैठक त्यांनी बोलाविली होती. या बैठकीत नामांतराला तत्त्वत: कोणाचाच विरोध नव्हता. काही जनता आमदारांनी हा निर्णय घेण्यापूर्वी मराठवाड्यातील जनतेचे मत जाणून घेण्यासाठी काही काळ थांबावे अशी सूचना केली; पण विरोधी पक्षाचे एक नेते म्हणून हजर असलेल्या वसंतदादांनी 'दलितांना न्याय मिळण्यात अगोदरच खूप उशीर झालाय तेव्हा किती वेळ थांबणार ?' असा सवाल केला. वसंतदादांच्या या भूमिकेला विरोध करणे म्हणजे प्रतिगामीपणा ! साहजिकच नामांतराचा ठराव अविरोध संमत झाला; पण आपल्याला विश्वासात न घेतल्याची भावना मात्र मराठवाड्यातील जनतेच्या मनात कायम राहिली.

'नामांतराबाबत निर्माण झालेली ही भावना हे शेवटी एक निमित्त ठरले. गेली काही वर्षे दलितांना मिळणाऱ्या सवलती व त्यांना सरकारी नोकऱ्यांमध्ये मिळणारे प्राधान्य याबद्दल सवर्णांच्या मनात असलेला राग हे या आंदोलनाचे एक प्रमुख कारण आहे.' अशी माहिती या मुलाखतीत सांगण्यात आली. श्री. महाजन पुढे म्हणाले की, 'आपण लायक असूनही केवळ सवर्ण आहोत म्हणून ही संधी दुसऱ्या एका व्यक्तीला मिळते व आपल्याला मिळत नाही याबद्दलचा राग या आंदोलनात उफाळून वर आला.'

याचा परिणाम म्हणून दलितवस्त्या किंवा दलितांची घरे हे आंदोलनाचे भक्ष्य बनविण्यात आले. सुमारे १५० ते २०० गावांतून दलितांची कच्चीपक्की घरे जमिनदोस्त करण्यात आली. काही ठिकाणी दलितांची घरे पेटवून देण्यात आली. एका गावात 'जनता युवा'च्या कार्यकर्त्यांना अनेक दलित स्त्रिया अंगावरच्या वस्त्रानिशी आसरा शोधीत पायपीट करताना दिसल्या. एके ठिकाणी तर ओल्या बाळंतिणीसुद्धा निराश्रित अवस्थेत दिसल्या. मात्र स्त्रियांवर अत्याचार झाल्याची एकही घटना आढळली नाही.

नांदेडजवळील सुगाव या गावातील दलितांच्या पाणवठ्यामध्ये कोणी तरी एंड्रिन टाकले होते. एवढे भयानक प्राणघातक विष पाण्यात टाकल्याची सरकारकडे तक्रार जाऊनही बरेच दिवस कोणतीही हालचाल झाली नाही. अलीकडेच समाजकल्याणमंत्री श्री. अर्जुनराव कस्तुरे यांनी या गावाला भेट दिली; पण त्यानंतरही शासनयंत्रणा ढिम्मच राहिली.

आंबेजोगाईच्या मेडिकल कॉलेजात दलितांना नियमानुसार प्राधान्य दिले जाते. त्याबद्दल तिथल्या विद्यार्थ्यांच्या मनात असलेला राग या आंदोलनाच्या निमित्ताने व्यक्त झाला.

आंदोलनाच्या धुमश्चक्रीचा अनेक समाजकंटकांनीही फायदा घेतला. आपल्या वैऱ्याच्या घरांवर हल्ला करण्यासाठी काही दलितांनी सवर्णांना, तर काही सवर्णांनी दलितांना निमंत्रणे दिली होती अशीही बातमी समजली. पाणीपट्टीबद्दलच्या नोंदी नष्ट व्हाव्यात म्हणून बऱ्याच ठिकाणी जमावाने इरिगेशन ऑफिसेसवर हल्ला केला. चोरी किंवा वाटमारी करणाऱ्या काही जमातींनी पोलिसठाण्यावरील त्यांच्याबाबतच्या नोंदी नष्ट करण्याचा प्रयत्न केला. आंदोलनातील वित्तहानीचा अंदाज या अहवालात दिलेला नाही, हे जरी खरे असले तरी हानीचा आकडा चांगलाच फुगलेला असणार यात शंका नाही.

श्री. प्रमोद महाजन यांच्या मते ही वित्तहानी भरून काढणे किंवा पुनर्वसनाचे एकूण काम फारसे अवघड नाही; परंतु या आंदोलनामुळे दलित आणि सवर्ण या उभयतांच्या मनात अलगतेची जी भावना होती ती अधिकच घट्ट रुजली आहे आणि ती नष्ट करणे हे अधिक कठीण आहे. या आंदोलनातून एक प्रकारचे Total Social Seperation घडून आल्याची अत्यंत दुर्दैवी जाणीव आपल्या कार्यकर्त्यांना झाली असे श्री. महाजन यांनी सांगितले. याचे एक उदाहरण म्हणून त्यांनी परळीवैजनाथजवळ एका ठिकाणी सवर्ण आणि दलित यांच्यात झालेल्या युद्धसदृश चकमकीची हकिगत सांगितली.

आंदोलनानंतरही सवर्णांचा दृष्टिकोन फारसा बदललेला नाही, उलट 'आता नुकसानीच्या नावाखाली दलितांना भरपूर मदत मिळेल. एकूण त्यांची मजाच आहे !' असे उद्गार अनेक सवर्णांनी जनता युवाच्या कार्यकर्त्यांजवळ काढले.

बहुतेक गावांत दलित अल्पसंख्य असल्यामुळे त्यांच्यावर हल्ले झाले. नांदेडमध्ये मात्र सवर्ण जनता कार्यकर्त्यांना बेदम मारहाण करण्यात आली.

पुनर्वसनाबद्दल बोलताना श्री. महाजन म्हणाले की, अनेक ठिकाणी पोलिसांची संख्या कमी पडल्यामुळे दंगली झाल्या. सरकारला पोलिसांचे जाळे योग्य प्रकारे विणता आले नाही. पुनर्वसनाच्या कार्यात नोकरशाहीच्या दिरंगाईची अडचणही सर्वत्र जाणवते. जनता युवाने मराठवाड्यातील पाचही जिल्ह्यांत कार्यकर्त्यांचे दोघादोघांचे गट पाठविले होते. यात एक सवर्ण व एक दलित कार्यकर्ता अशी जोडी मुद्दामच पाठविण्यात आली होती. ह्या कार्यकर्त्यांनी पुरविलेल्या माहितीनुसार पुनर्वसनाचे काम जनता युवा मोर्चा लवकरच हाती घेईल. 'दंगलग्रस्तांना साड्या, अन्न, वस्त्रे व भांडी पुरविण्याच्या कामाला आम्ही प्राधान्य देणार आहोत' असे जनता युवाच्या नेत्यांनी सांगितले.

पुनर्वसनाच्या दृष्टीने प्रत्यक्ष पाहणी करण्याचा जनता युवाचा हा उपक्रम स्वागतार्ह आहे. आरोप-प्रत्यारोपात गुंतलेल्यांनीही या उपक्रमाकडे लक्ष देण्यास हरकत नाही. कारण शेवटी जे अवघड आहे तेच अधिक आवश्यक आहे ! ☐

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ कर्पूरी ठाकूर यांच्याविरुद्ध काहूर

कांति देसाई प्रकरणावरून दिल्लीमध्ये उठलेले वादळ शमविण्यासाठी कर्पूरी ठाकूर यांचे प्रयत्न चालू असतानाच बिहार विधानसभेमध्ये कर्पूरी ठाकूर यांच्याविरुद्ध काहूर उठविण्यात आले आहे. आणीबाणीच्या काळात ठाकूर नेपाळमध्ये होते. कर्पूरीजींच्या समस्तिपूर या मतदार संघामधील एक गृहस्थ एस्. एन्. वर्मा काठमांडू येथे स्थायिक झालेले होते. कर्पूरीजींनी त्यांच्याकडेच आश्रय घेतला होता. हे वर्माजी तेथील त्रिभुवन विद्यापीठामध्ये प्राध्यापक होते आणि कर्पूरीप्रकरणी बिचाऱ्या वर्माजींना नोकरी गमवावी लागली. अर्थात हा झाला दुसरा भाग. ज्या प्रकरणाचा येथे विशेष संबंध आहे आणि ज्याच्यावरून बिहार विधानसभेमध्ये काहूर उठविण्यात आले ते ठाकूर–प्रेमलता रॉय प्रकरण याच वर्माजींच्या घरी सुरू झाले. कर्पूरीजींचे नितळ खाजगी आयुष्य आणि निष्कलंक सार्वजनिक जीवन याबद्दल आजवर त्यांच्या विरोधकांनाही संदेह नव्हता. भले त्यांच्या कार्यपद्धतीबद्दल आणि कार्यक्षमतेबद्दल काहीही मतभेद असले तरीही त्यांचे व्यक्तिगत आयुष्य ही एक निर्लेप गोष्ट आहे, याची त्यांच्या विरोधकांनीही कबुली दिली आहे. त्यांचे कुटुंबीय आपल्या मूळ गावी आपला परंपरागत व्यवसाय करीत कसे राहतात याचा तपशील अनेक ठिकाणी प्रसिद्ध झालेला आहे. 'माणूस'मधील माझ्या या सदरातही त्याची तपशीलवार दखल घेण्यात आली आहे; पण अशा माणसाचे एक खमंग गुलाबी प्रकरण विधानसभेमध्ये दाखल झाले. कर्पूरीजींबरोबर ज्या बाईच्या नावाचा उल्लेख केला जातो त्या प्रेमलता रॉय यांना कर्पूरीजींनी लिहिलेल्या प्रेमपत्राची छायांकित प्रत सभागृहासमोर ठेवली आणि तरीही आजवर सरकारतर्फे या साऱ्या प्रकरणाचा इन्कार करण्यात आलेला नाही. कदाचित स्वतःच्या पक्षामधील मतभेद दूर करण्यात मुख्यमंत्री गढून गेलेले असल्यामुळेही त्यांना या प्रेमपत्रप्रकरणी लक्ष घालण्यास वेळ मिळाला नसावा; पण या गोष्टीचाही विरोधकांकडून लाभ उठविण्यात येत असून हे प्रकरण पद्धतशीरपणे तापविले जात आहे.

कर्पूरीजींनी ज्या वेळी नेपाळमध्ये आश्रय घेतला होता, त्या वेळी त्यांना ज्या मंडळींनी मदत केली त्यामध्ये प्रेमलता रॉय नावाची एक शिक्षिकाही होती. या प्रेमलताजींचे वडील बंगाली आणि आई नेपाळी आहे. वर्माजींच्या घरीच प्रेमलता व कर्पूरीजी यांची पहिली भेट झाली आणि पुढे लौकरच त्या दोघांची मैत्री वाढत जाऊन दोघांमध्ये विशेष प्रेमसंबंध निर्माण झाले, असा प्रेमलताजींचा दावा आहे. पुढे राजकीय परिस्थिती निवळल्यावर कर्पूरीजी भारतात परत आले. निवडणुका झाल्या आणि प्रचंड बहुमताने ते लोकसभेमध्ये निवडून आले. आपल्या जुन्या मैत्रीची आठवण देत प्रेमलताबाईंनी तातडीने काही पत्रे लिहिली; परंतु या असल्या गोष्टीत लक्ष घालण्यास कर्पूरीजींना जराही सवड नव्हती. प्रेमलताजींकडून आलेल्या पत्रांना त्यांनी साधी पोचही दिली नाही. आपल्या खासदारकीचा राजीनामा देऊन कर्पूरीजी पाटण्यात बिहारचे मुख्यमंत्री म्हणून आले. प्रेमलताजींच्या मनात आले, कदाचित दिल्लीमध्ये वेळ मिळत नसेल. आता कर्पूरीजी पाटण्यात आले आहेत. आता तरी काही जमते का ते पहावे. त्यांनी पुन्हा पत्रांचा मारा सुरू केला. अगदी रजिस्टर्ड पत्रेही पाठविली; परंतु साधी पोचही आली नाही. मुख्यमंत्री फारच कार्यमग्न असावेत असे समजून प्रेमलता पाटण्यात येऊन दाखल झाली. तिच्या पत्रांबाबत तिने विचारणा केली असता कर्पूरीजींच्या सेवकवर्गापैकी एकाने तिला असे सांगितले की, आपली तीन-चार पत्रे आल्यावर त्याने एकदा या पत्रांना उत्तर देण्याबद्दल कर्पूरीजींना आठवण केली. त्यावर मुख्यमंत्र्यांनी म्हणे असे उत्तर दिले की, 'या पत्रांना मी मेल्यावर उत्तर पाठवायचे !' हे समजल्यावर प्रेमलता अस्वस्थ झाली. मंत्रालयामध्ये जाऊन तिने कर्पूरीजींची गाठ घेतली; परंतु तिला ओळख देण्यासही मुख्यमंत्र्यांनी नकार दिला ! ती पाटण्यास कशासाठी आली ? ती कोठे राहते ? – काठमांडूला परत जाण्याची तिची काय व्यवस्था आहे, याबाबत तरी कर्पूरीजी विचारणा करतील अशी तिची अपेक्षा होती; परंतु ते आपण ओळखत नाही, असे म्हणू लागल्यावर पाटण्यात राहून आणखी शोभा करून घेण्याची तिची इच्छा नव्हती; पण साऱ्या खाणा–खुणा सांगूनही कर्पूरीजी आपली दखल घेत नाहीत, हे लक्षात आल्यावर तिने हे त्या दिवसापर्यंत छुपे असलेले सारे प्रकरण उघड करण्याचे ठरविले. अनेक विरोधी नेत्यांची तिने भेट घेतली. विशेषतः कांग्रेस आयच्या नेत्यांकडून तिची विशेष आस्थेने विचारपूस झाली. तिचे सारे बोलणे त्यांनी ऐकून घेतल्यावर ते म्हणाले, 'तू म्हणतेस ते सारे आम्ही खरे कसे मानावे ? काही पुरावा नको का?' तिने दोन दिवस विचार केला आणि काही पत्रे या नेत्यांच्या स्वाधीन केली. तातडीने या पत्रांच्या छायांकित प्रती काढण्यात आल्या. या प्रकरणी तिचा असा दावा आहे की, ही पत्रे कर्पूरी ठाकूर यांनी आपल्याला लिहिली आहेत. आता पत्रांचे हे भांडवल मिळाल्यावर काँग्रेस आयच्या नेत्यांनी हे प्रकरण विधानसभेमध्ये उपस्थित केले आणि या प्रकरणी सरकारने खुलासा करावा अशी मागणी केली. तथापि सरकारकडून अधिकृतरीत्या हे मुख्यमंत्र्यांचे छुपे प्रेमप्रकरण धिक्कारलेही गेले नाही आणि स्वीकारलेही गेले नाही. स्वतः मुख्यमंत्री पत्रकारांत पण

असल्याने अद्यापि त्यांनी काहीही खुलासा केलेला नाही. या शांततेचा लाभ उठवून विरोधी पक्ष त्या पत्रांबद्दल आणि मुख्यमंत्र्यांच्या या छुप्या प्रेमप्रकरणाबद्दल वातावरण तापविण्याचा प्रयत्न करीत आहेत. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणी खुलासा केला नाही तर आपण हे सारे प्रकरण पत्राच्या छायांकित प्रतीसह जयप्रकाशजींकडे नेऊ, अशी धमकी एका जनता पक्षीय आमदाराने दिली आहे. हे प्रकरण जर खरे असेल तर कर्पूरीजींना नेता मानणे कठीण जाईल असेही त्याने म्हटले आहे. आजवर ज्या मुख्यमंत्र्यांच्या खाजगी आयुष्याबद्दल ब्र काढण्याची हिंमत झाली नाही अशा मुख्यमंत्र्यांच्या वर्तनाबद्दल वादळ उठविणाऱ्या त्या पत्रांमध्ये असे. आहे तरी काय ? पत्राची जी छायांकित प्रत प्रसिद्ध झाली आहे ती हिन्दीमध्ये आहे. प्रेमलताजींनी एक जाहीर पत्र लिहिले असून त्या पत्रासोबतच मुख्यमंत्र्यांनी त्यांना लिहिलेली पत्रे आहेत असा त्यांचा दावा असलेली पत्रेही प्रसिद्ध केली आहेत. या पत्रांमधील मजकूर लक्षवेधी असल्याने तोही खाली नोंदवीत आहे. प्रेमलताजींचे जाहीर पत्रामधील महत्त्वाचा मजकूर खालीलप्रमाणे आहे.

'काठमांडूमध्ये असताना आपण जे वचन दिले होते त्याचा थोडाफार तरी विचार कराल अशी माझी अपेक्षा आहे. आपण खासदार झाल्यावर मी रजिस्टर्ड पोस्टाने आपल्याला काही पत्रे पाठविली होती; तथापि त्यांपैकी एकाही पत्राला आपण उत्तर पाठविले नाही. कार्यबाहुल्यामुळे आपल्याला वेळ झाला नसावा, अशी माझी समजूत झाली. तथापि आपण मुख्यमंत्री झाल्यावर मी पाटण्याला येऊन आपली भेट घेतली; पण आपण साधी ओळख दाखविण्यासही नकार दिला. मी व्यक्तिशः एक पत्र आपल्या हाती दिले; परंतु यापैकी कोणत्याच गोष्टीला आपण महत्त्व दिले नाहीत. मी कोठून आणि कोणत्या उद्देशाने आले, माझ्या खाण्या-पिण्याची काय व्यवस्था आहे अथवा मी काठमांडूला परत कशी जाऊ शकेन यांपैकी एकाही गोष्टीची दखल तुम्ही घेतली नाहीत.

मी काठमांडूला पोचल्यावर आपल्याला एक अखेरचे रजिस्टर्ड पत्र लिहिले आणि आपण दिलेल्या वचनांची आठवण करून देण्याचा प्रयत्न केला. एवढे झाल्यावरही आपल्याकडून काहीही उत्तर आले नाही. अशा परिस्थितीमध्ये मी पाटण्याला परत येऊन या प्रकरणाचा सोक्षमोक्ष करून घेण्याचे ठरविले. पण आपण पाटण्यात नव्हता. आपल्या नजीकच्या वर्तुळामध्ये चौकशी करता माझी अशी खात्री झाली की, आपण माझी फसवणूक करीत होता. म्हणूनच मी असा निर्णय घेतला की, या प्रकरणाची सारी खरी हकीगत बिहारमधील तमाम जनतेसमोर ठेवायची. आपले सन्माननीय मुख्यमंत्री किती प्रामाणिक आहेत हे त्यांना समजावे, हाच माझा जाहीर पत्रामागील हेतू आहे. माझ्या निवेदनाच्या समर्थनार्थ आपण स्वदस्तुरात लिहून दिलेला काही भाग मी छायांकित करून प्रसिद्धीसाठी देत आहे. आपले खरे स्वरूप स्पष्ट करणे हाच या पत्राचा उद्देश आहे.'

आपली,

प्रेमलता रॉय

या बाईंनी कर्पूरीजींच्या सहीनिशी जो भाग प्रसिद्धीसाठी दिला आहे त्यामधील अर्धा भाग प्रश्नोत्तरस्वरूपाचा असून उरलेला अर्धा भाग प्रेमपत्राप्रमाणे आहे. 'स्टार–डस्ट'सारख्या चित्रपट–विषयक मासिकातून चित्रपटकलाकार जशी गरमागरम उत्तरे देतात, तशा पद्धतीचे हे सवालजबाब आहेत. या बाईंनी जे पत्र प्रसिद्धीस दिले आहे त्यामध्ये प्रश्नोत्तरे स्वरूपात कर्पूरीजींनी काही गोष्टी कबूल केलेल्या दिसतात. ही प्रश्नोत्तर खालीलप्रमाणे आहेत.

प्रश्न : तुम्ही माझ्यावर किती प्रेम करता ?

उत्तर : खूपच !

प्रश्न : तुम्ही मला तुमच्याबरोबर इंग्लंडमध्ये घेऊन जाल का ?

उत्तर : माझ्याजवळ तेवढे पैसे असतील तर निश्चितच घेऊन जाईन !

प्रश्न : तुम्ही भारतात गेलात तर मला तेथे बोलावून घ्याल का ?

या प्रश्नाला कर्पूरीजींनी काहीही उत्तर दिलेले नाही.

प्रश्न : मला भेटण्यासाठी, माझ्यावरील प्रेम व्यक्त करण्यासाठी तुम्ही काठमांडू येथे याल का ?

उत्तर : निश्चितच.

प्रश्न : छे, तुम्ही खोटे बोलता; भारतामध्ये गेल्यावर तुम्हांला माझा विसर पडेल.

उत्तर : नाही, असे होणे नाही !

काठमांडू सोडण्यापूर्वी कर्पूरी ठाकूर यांनी प्रेमलताजींना एक पत्र लिहिले होते. त्या पत्राची छायांकित प्रतही प्रेमलताने प्रसिद्धीस दिली आहे. त्याचा मराठी तर्जुमा असा.

'प्रिय प्रेमलताजी,

मी निघालो असताना तुम्ही म्हणाला होतात, वर्माजी येथे नाहीत आणि मला एकटीला रहायला फार भीती वाटते. आपल्या या म्हणण्यात खरोखरच तथ्य होते. कारण वर्माजींनी तुमची जबाबदारी माझ्यावर सोपवली होतो; परंतु मी आपली देखभाल करू शकलो नाही. मला आज असे अचानकपणे निघून जावे लागत आहे याबद्दल क्षमा करावी; पण याबाबत माझा नाइलाज आहे. सांगितले तर खरे वाटणार नाही; पण माझ्यावर विश्वास ठेवा. मी रात्री दीड वाजेपर्यंत रडत बसलो होतो. इतके कशाला, हे पत्र लिहीत असतानाही माझ्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात आहेत. तुम्ही दोघांनीही माझ्यासाठी खूप खर्च केलात. माझ्यासाठी वर्माजींना आणि तुम्हाला खूप काही सोसावे लागले. जवळजवळ दोन महिनेपर्यंत तुमची राहण्याझोपण्याचीही परवड झाली. त्यातून तुम्ही स्त्री असल्याने तुमचे विशेष हाल झाले. स्त्रिया जात्याच नाजूक असतात. मी तेथे असताना अनेक लोक येत असत, तुमच्या घरावर आमचा कब्जाच होता म्हणा ना ! त्या काळात आलेली सारी संकटे तुम्ही आणि वर्माजींनी हसून साजरी केलीत याबद्दल मी तुम्हा दोघांचा, विशेषतः तुमचा ऋणी आहे.

कृपया माझी सर्व वृत्तपत्रे व्यवस्थित ठेवावीत. तसेच माझी सर्व पुस्तकेही व्यवस्थित ठेवावीत. माझ्या या सामानाला अन्य कोणास हात लावू देऊ नये. लेदर बॅगमध्ये काही अतिशय महत्त्वाची कागदपत्रे आहेत. त्या बॅगलाही कोणाला हात लावू देऊ नये. हरिप्रसाद उपाध्ये यांना त्यांची पुस्तके ज्योतिषी गणेश प्रसाद यांच्याजवळ आहेत असे सांगावे. मी पंधरा–एक दिवसांत परत येईनच. माझ्या चुकांबद्दल क्षमस्व.

आपला,

कर्पूरी ठाकूर

ही पत्रे कर्पूरीजींनी लिहिली असली तर त्यातून एक वादळ निर्माण होऊ शकेल, असा विरोधी पक्षाचा दावा आहे. या प्रकरणात काही सत्यता असली तर त्याचे त्यांच्या राजकीय जीवनावरही परिणाम झाल्याखेरीज राहणार नाहीत. परंतु तसे काही नसेल तर कर्पूरीजींनी केवळ इन्कार करून न थांबता त्यांची बदनामी करणाऱ्या या प्रेमलताबाईविरुद्ध योग्य ती कारवाई केली पाहिजे. केवळ उपेक्षा किंवा दुर्लक्ष करून हे प्रकरण–निवण्यासारखे नाही. त्याचा निचरा झालाच पाहिजे. या प्रकरणी कर्पूरीजी जर खरोखरच गुंतलेले असतील तर आधीच घुमसणाऱ्या बिहारमध्ये हे जळतेलाकूड चांगलाच वणवा पेटवू शकेल. □

# जनतापक्ष

## तत्त्वाचे आधारे वाद सोडवा

वा. दा. रानडे

पेच–तोडगा–पुन: पेच–नवा तोडगा या चक्रव्यूहातून जनता पक्ष कधी बाहेर पडणार आहे की नाही असे गेल्या काही महिन्यांतील घटनांवरून वाटू लागले आहे. असे होत आहे याचे कारण पक्षाच्या जखमांवर तात्पुरत्या मलमपट्टया लावल्या जात आहेत; पण रोगाचे मूळ काय याचे अचूक निदान करून तो कायमचा बरा करणारी उपाययोजना केली जात नाही. अंतर्मुख होऊन पक्षाच्या स्थापनेपासूनच्या सर्व घटनांचे कठोर आत्मपरीक्षण करायला हवे. त्या दृष्टिकोनातूनच काही विचार मांडीत आहे.

इंदिरा गांधींनी निवडणुकांची घोषणा केल्यानंतरच जनता पक्षाच्या स्थापनेस मूर्त स्वरूप आले. सर्व लोकशाहीविरोधी पक्षांनी एकत्र येऊन एक पक्ष स्थापण्याचे प्रयत्न आणीबाणीपूर्वी आणि आणीबाणीच्या काळातही झाले होते; पण त्यांना यश आले नव्हते. निवडणुका होणार असे दिसताच मात्र हे पक्ष एकत्र आले आणि आपले स्वतंत्र अस्तित्व न ठेवता एकच पक्ष स्थापण्याचा त्यांनी निर्णय घेतला. काँग्रेसला परिणामकारक विरोध करणारा पर्यायी विरोधी पक्ष स्थापावा हा त्यांचा मूळ उद्देश; पण जनता आणीबाणीला एवढी विटली होती की तिने जनता पक्षाला मोठा विजय मिळवून देऊन सत्तेवर आणले. कल्पना नसताना, पूर्व तयारी नसताना सत्ताधिकारी पक्षाची भूमिका जनता पक्षाकडे आली आणि सत्तेशी निगडित असलेले दोष सत्तारूढ पक्षात निर्माण होतात तसे जनता पक्षातही निर्माण झाले.

सत्ता टिकविणे आणि त्यासाठी पक्षाचे ऐक्य टिकविणे हेच पक्षनेत्यांचे मुख्य कार्य होऊन बसले. घटक पक्षांनी आपल्या स्वतंत्र अस्तित्वाचे औपचारिक विसर्जन केले खरे; पण प्रत्यक्षात घटकांच्या भूमिकेतून विचार, हालचाली, डावपेच चालूच राहिले. पक्ष आपल्या प्रभावाखाली आणण्यासाठी त्यांच्यात स्पर्धा सुरू झाली. डाव–प्रतिडाव खेळले जाऊ लागले. १ मे १९७७ ला जनता पक्षाची औपचारिक स्थापना झाली. त्यानंतर रीतसर सभासदनोंदणी होऊन पक्षाच्या खालपासून वरपर्यंतच्या समित्या आणि पदाधिकारी निवडणे हे कार्य हाती घ्यावयास हवे होते; पण पक्षस्थापनेला सव्वा वर्ष होऊन गेले तरी ही आवश्यक गोष्ट घडली नाही. जून १९७७ मध्ये विधानसभांच्या निवडणुका पक्षास लढवाव्या लागल्या. त्यात नेत्यांची शक्ती खर्च झाली हे खरे; पण त्यानंतर वर्षअखेरपर्यंत पक्षांतर्गत निवडणुका घेण्यास काहीच हरकत नव्हती. पक्षांतर्गत निवडणुका हा पक्षांतर्गत लोकशाही कार्यपद्धतीचा पाया आहे. त्याच लांबल्याने पक्षात लोकशाही कार्यपद्धतीच सुरू होऊ शकली नाही. राज्यातून अस्थायी समित्या कार्य करीत आहेत. राष्ट्रीय कार्यकारिणीचे निर्णय किंवा काही धोरणे चुकीची वाटली तर त्यांचा फेरविचार करण्यासाठी पक्षाची अखिल भारतीय समितीच अस्तित्वात नाही. राज्यपातळीवरही राज्यसमित्या नाहीत. त्यामुळे नेते घेतील तो निर्णय आणि त्यांच्यात भांडणे असतील तर निर्णयच नाही अशी पक्षाची अवस्था झालेली आहे. पक्षाचे धोरण व निर्णय ठरविण्यात सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा काही सहभागच राहिलेला नाही. कारण त्याला आपले मत जेथे मांडता येईल अशी पक्षयंत्रणाच अस्तित्वात आलेली नाही. कार्यकर्त्यांचे मेळावे काही ठिकाणी मधून मधून भरतात हे खरे; पण नेत्यांच्या भाषणासाठीच हे मेळावे मुख्यत: भरविलेले असतात. खुली, मनमोकळी चर्चा होऊन ठरावांच्या रूपाने मतप्रदर्शन त्यात क्वचितच होते. पक्षांतर्गत निवडणुका होईपर्यंत सर्व वादग्रस्त प्रश्नांवरचे निर्णय स्थगित ठेवा, तुमच्यात एकमत होत नसेल तर, जैसे थे परिस्थितीच चालू ठेवा. निवडणुकीनंतर स्थापन होणाऱ्या पक्षाच्या प्रातिनिधिक समित्यांवर हे निर्णय सोपवा असे सामान्य कार्यकर्त्यांनी नेत्यांना सांगण्याची वेळ आता आली आहे. काँग्रेसमध्ये पक्षांतर्गत लोकशाहीच्या प्रथा डावलल्या गेल्या म्हणून इंदिरा गांधी हुकूमशहा बनू शकल्या अशी टीका जनता पक्षाचे नेते करतात; पण पक्षांतर्गत निवडणुका दीर्घकाळ लांबविणाऱ्या जनता पक्षाच्या नेत्यांना तरी पक्षांतर्गत लोकशाही कार्यपद्धतीबद्दल कितपत आस्था आहे? असा प्रश्न सामान्य कार्यकर्त्यांच्या मनात आल्याशिवाय राहणार नाही.

पक्षापुढील पेच तात्पुरते तोडगे काढून नव्हे, तर निश्चित तत्त्वांच्या आधारे सोडवायला हवेत. मोरारजीभाई आणि चरणसिंग यांच्यातील संघर्ष याच पद्धतीने सोडविला पाहिजे. हा वाद सोडविण्यासाठी अशी काही तत्त्वे निश्चित करता येतील का? मंत्रिमंडळाच्या संयुक्त जबाबदारीचे तत्त्व सर्व मंत्र्यांनी पाळायलाच हवे. चरणसिंगांनी इंदिरा गांधींविरुद्ध कारवाईसंबंधात जे जाहीर निवेदन केले ते संयुक्त जबाबदारीच्या तत्त्वाचा भंग करणारे होते, तेव्हा मोरारजीभाईंनी त्यांच्या राजिनाम्याची मागणी केली ते योग्यच झाले. असे निवेदन करण्यात आपली चूक झाली हे चरणसिंगांनी मोकळेपणाने कबूल केले पाहिजे; पण त्याला त्यांची तयारी नाही.

दुसरा प्रश्न मोरारजीभाईंचे पुत्र कांतिलाल आणि चरणसिंगांचे नातेवाईक यांच्यावरील भ्रष्टाचारांच्या आरोपांचा. वरिष्ठ पातळीवरील भ्रष्टाचारांच्या आरोपांची चौकशी कशी करावयाची याची पद्धती जनता पक्षाने ठरवायला हवी. लोकपालबिल दोन्ही गृहांत मंजूर होऊन त्याला राष्ट्रपतींची मान्यता मिळाल्यावर त्याच्याकडे ही प्रकरणे सोपविता येतीलच; पण त्याशिवाय पक्षाचीही या बाबतीत यंत्रणा हवी. पक्षाबद्दल आस्था असलेल्या पण पक्षाच्या दैनंदिन राजकारणात भाग न घेणाऱ्या नि:पक्षपाती व्यक्तींची समिती त्यासाठी नेमावी. कांतिलालविरुद्ध जे आरोप केले जातात त्या बाबतीत प्राथमिक पुरावाही नाही. तेव्हा चौकशी करण्याचा प्रश्नच येत नाही, असे मोरारजीभाईंचे म्हणणे; पण केवळ मोरारजीभाईंनी असे म्हणणे पुरेसे नाही नि:पक्षपाती व्यक्तीच्या समितीने या आरोपांची छाननी करून दिलेला निर्णयच याबाबतीत मानण्यात यावा. आपल्या नातेवाइकांवरील आरोपांची चौकशी होऊ देण्यास चरणसिंगांनी तयारी दर्शविली आहे. यात चरणसिंगांची भूमिका उदात्त दिसते; पण तो खरोखरच उदात्त आहे की, उदात्ततेचा देखावा आहे? चरणसिंगांनी आपल्या नातलगांची चौकशी कांतिलालच्या चौकशीशी निगडित केली आहे कांतिलालच्या चौकशीस मोरारजी तयार होणार नाहीत. तेव्हा आपल्या नातलगांवरील आरोपांच्या चौकशीचीही वेळ येणार नाही हे त्यांना माहीत आहे; पण आपण किती मोठ्या मनाचे अशी प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी या प्रकरणी केला आहे. मोरारजी कांतिलालची चौकशी करोत किंवा न करोत मी माझ्या नातलगांचे चौकशीस तयार आहे असे चरणसिंगांनी का म्हणू नये? तसे त्यांनी केल्यास त्यात त्यांच्या मनाची खरी उदात्तता दिसून येईल, नाही तर तो नुसता देखावा आहे असेच म्हणावे लागेल.

दोनच प्रश्नांचा येथे मी विचार केला. इतर प्रश्नांच्या बाबतीतही निश्चित तत्त्वे ठरवून निर्णय घेण्याचा पायंडा जनता पक्षाने पाडायला हवा. त्याशिवाय पेचप्रसंगांच्या चक्रव्यूहातून हा पक्ष बाहेर पडणार नाही. □

## प्रसिद्धिपूर्व सवलत योजना

जगातल्या निरनिराळ्या क्रांत्या–उत्क्रांत्यांनी म्हणा किंवा सामाजिक, राजकीय इत्यादी स्तरांवर मांडलेल्या गणितांची उत्तरे सापडल्याच्या आनंदात असणाऱ्या विचारवंतांना ती चुकीची निघाल्याचा अनुभव येऊ लागल्यामुळे म्हणा, विचारवंत पुन्हा एकदा गांधी-टॉलस्टॉय यांसारख्या ऋषिवर्यांकडे वाट पुसायला जाणार असे मला वाटू लागले आहे. तुमच्या ग्रंथाचे म्हणून मला फार मोठे मोल वाटते.

**–पु. ल. देशपांडे**

महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार आणि ‘ललित’ पारितोषिक
लाभलेल्या ग्रंथाची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध होत आहे.

# टॉलस्टॉय–एक माणूस

## लेखिका : सौ. सुमती देवस्थळे

- ☐ प्रसिद्धीनंतरची या ग्रंथाची किंमत पंचावन्न रुपये.
- ☐ १५ सप्टेंबरपूर्वी नोंदणी केल्यास किंमत पस्तीस रुपये.
- ☐ रजि. पोस्टाने ग्रंथ हवा असल्यास तीन रुपये अधिक.
- ☐ रक्कम म. ऑ. किंवा ड्राफ्टने पाठवावी.
- ☐ व्ही. पी. पद्धत नाही.
- ☐ ग्रंथ २ ऑक्टोबर–गांधीजयंतीला प्रसिद्ध होत आहे.

**प्रसिद्धीपूर्व नोंदणी खालील ठिकाणी सुरू आहे.**

१ : राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०.

२ : मॅजेस्टिक बुक स्टॉल । शनिपाराजवळ, पुणे २ । किंवा । गिरगाव नाका, मुंबई ४.

परराष्ट्रीय घडामोडी । चन्द्रशेखर पुरन्दरे

# इंग्लंड : लिबरल पार्टी धोक्यात

## आधीच उल्हास त्यात फाल्गुनमास

द्विपक्षीय लोकशाही रुजलेल्या (?) इंग्लंड-मध्ये लिबरल पार्टी ही तिसरी निर्णायक पार्टी आहे. प्रमुख हुजूर आणि मजूर पक्ष सोडता इतर अल्स्टरच्या खासदारांचा गट, स्कॉटिश नॅशनॅलिस्टस्चा गट वगैरे गट जसे हुजूर किंवा मजूर यातील एका पक्षाला पाठिंबा देऊन सरकारची निश्चिती करतात; तसाच लिबरल पक्ष आहे. आपले हे वैशिष्टयपूर्ण स्थान आजवर लिबरल पक्षाने आटोकाट प्रयत्न करून टिकवून ठेवलेले आहे. एकूण १४ खासदारांचा हा गट आहे. या लिबरल पक्षाचा माजी अध्यक्ष, सध्याचा खजिनदार आणि एक लोकप्रिय खासदार जरेमी थॉर्प याच्यामुळे हा पक्ष कधी नव्हे एवढ्या अडचणीत आला आहे आणि त्याच्या जीवनमरणाचाच प्रश्न अकस्मात उभा राहिला आहे.

नॉर्मन स्कॉट नावाच्या एका इसमाचा खून करण्याचा कट केल्याच्या आरोपावरून लिबरल पक्षाच्या उपरिनिर्दिष्ट जेरमी थॉर्पवर खटला भरण्यात आला आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांत त्याने परत एकदा खासदारकीसाठी उभे रहावे की न रहावे यावरून प्रचंड वादंग इंग्लंडच्या राजकीय वर्तुळात माजले आहेत.

४ ऑगस्टला त्याला त्याच्याबरोबरच्या तीन आरोपींसह माइनहेड (सॉमरसेट) च्या कोर्टात हजर रहावे लागले. बावीस मिनिटांच्या सुनावणीनंतर चौघांनाही '१ ऑक्टोबर १९६८ ते १ नोव्हेंबर १९७७ दरम्यानच्या विभिन्न दिवशी डेवन आणि इतरत्र; एकत्रितपणे अथवा अलग अलग स्कॉटच्या खुनाचा कट केल्याबद्दल १२ सप्टेंबरपर्यंत प्रत्येकी ५००० पौंडांचा जामीन घेऊन रिमांड देण्यात आला. ऑरिंग्टनमधून निवडून आलेला लॉर्ड अॅवबरी थॉर्पला जामीन राहिला. इतर तिघांची नावे अशी– जॉन ल मेसुरिएर– हा एके काळी गालिचांचा विक्रेता होता. डेव्हिड होम्स हा थॉर्पच्या लग्नात 'बेस्ट मॅन' होता. तो लिबरल पक्षाचा मध्यंतरी उपकोषाध्यक्ष होता. तिसरा जॉर्ज डिकिन हा एका नाइटक्लबचा मालक आहे आणि स्लॉटिंग मशीन्सचा दलाल आहे. या तिघांवरही थॉर्पला कटात साथ दिल्याचा आरोप आहे.

### जेरमी थॉर्प

एकूणपन्नास वर्षांचा जेरमी थॉर्प हा एके काळी इंग्लंडचा पंतप्रधान होण्याची स्वप्ने पहात होता. १९३९ ते १९४५ च्या दरम्यान तो अमेरिकेत होता, तेव्हा तो लिबरल विचारसरणीकडे आकृष्ट झाला. १९५९ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटवर निवडून गेला आणि जो ग्रिमंडनंतर १९६९ मध्ये लिबरल पक्षाचा नेता झाला. नॉर्थ डेव्हन मतदारसंघातून तो सतत निवडून येत आहे. १९७४ हा लिबरल पक्षाच्या कारकीर्दीतला सुवर्णकाल होता. फेब्रुवारी १९७४ मध्ये थॉर्प त्याच्या प्रसिद्धीच्या शिखरावर होता. त्या वेळी निवडणुका तोंडावर आल्या होत्या आणि जिकडे जाईल तिकडे लिबरल पक्षाला प्रचंड पाठिंबा मिळत होता. सरकार बनविण्याच्या गप्पा त्या वेळी हा पक्ष करीत होता. थॉर्प स्वतःची जॉन केनेडीशी तुलना करू पहात असे! पण लवकरच ऑक्टोबरपासून या प्रसिद्धीला ओहोटी लागली.

त्यात भर पडली ती नॉर्मन स्कॉटच्या आरोपांनी. १९७६ च्या जानेवारीमध्ये पहिल्यांदा स्कॉटने आपल्याकडे थॉर्पची काही खळबळजनक पत्रे आहेत असे जाहीर केले. हा स्कॉट पूर्वी मॉडेलिंगचा व्यवसाय करीत असे. १९५०–६० च्या दरम्यान थॉर्पचे आपल्याशी होमोसेक्शुअल संबंध होते असे त्याने तेव्हा जाहीर करून पहिला बॉंबगोळा टाकला. आजतागायत थॉर्प या आरोपाचा जोरदार इन्कार करीत आलेला आहे; परंतु पक्षाची जनमानसातील प्रतिमा, पक्षाच्या नेत्यावरच असा आरोप झाल्यास व होत राहिल्यास डागळेल या विचाराने त्याने १९७६ च्या मेमध्ये नाखुशीने नेतेपद सोडले. लिबरल्सचा सध्याचा नेता डेव्हिड स्टील आणि इतर दोघे (एम्लिन हूसान आणि लॉर्ड बायरस) यांनी पक्षातर्फे समिती स्थापन करून या आरोपांची छाननी केली. त्यात त्यांना आक्षेपार्ह असे काहीही आढळले नाही. काहीच तथ्य नाही असे आढळल्याने परत लिबरल्सची प्रतिमा उजळली. आता मात्र प्रकरण कोर्टात गेले आहे. थॉर्पला या आरोपाखाली जास्तीत जास्त जन्मठेपेची शिक्षा होऊ शकेल. एखाद्या प्रमुख राजकीय नेत्याविरुद्ध इतके गंभीर आरोप होण्याची ही १६१३ सालानंतरची पहिलीच वेळ आहे. (त्या वेळी अर्ल ऑफ सॉमरसेटवर असाच आरोप ठेवण्यात आला होता. त्यातून तो थोडक्यात सुटला होता.)

आणि इतका गंभीर आरोप असूनही जेरमी थॉर्प आगामी निवडणुकीसाठी उभा रहाणार म्हणतो.

### लिबरल पक्ष आणि इंग्लंडच्या आगामी निवडणुका

येत्या ५ किंवा १२ ऑक्टोबरला इंग्लंडमध्ये सार्वत्रिक निवडणुका होतील असा अंदाज आहे. याचे कारण असे की, सध्याचे जेम्स कॅलॅघनचे मजूरपक्षाचे सरकार लिबरल, अल्स्टर, स्कॉटिश नॅशनॅलिस्ट्स् अशा छोटया छोटया गटांवर आधारित आहे. यांनी पाठिंबा काढून घेतल्यास सरकार अल्पावधीत कोसळेल आणि ५ ऑक्टोबर ही या पक्षांनी अखेरची तारीख जाहीर केली आहे त्यानंतर आपण हे सरकार टिकू देणार नाही असा त्यांचा निर्धार आहे.

ऑक्टोबरला फारशी दिवसे राहिलेली नाहीत. ह्यामुळे आतापासून छोटया छोटया पक्षांनी मोर्चे बांधायला सुरुवात केली आहे. या छोटया पक्षांचे वैशिष्टय असे की, त्यांचे मतदारसंघ निश्चित आहेत. नवीन मतदारसंघात विजय मिळणे ही अशक्य कोटीतील गोष्ट आहे. त्यांच्याच नेहमीच्या मतदार-

संघातसुद्धा जेमतेम मताधिक्याने ते निवडून येतात. नॉर्थ डेव्हन हा एक असा पूर्वापार लिबरलसचा बालेकिल्ला असणारा मतदारसंघ आहे. एकूण पार्लमेंटमधली ताकद १०–१५ च्याच घरात असल्याने लिबरल पक्षाला प्रत्येक जागा अतिशय महत्त्वाची आहे. अशा वेळी नॉर्थ डेव्हनच नव्हे तर राष्ट्रीय राजकारणाचा विचार करता गुन्हेगारी स्वरूपाचा आणि तोही खुनाचा आरोप असताना थॉर्पने निवडणूक लढवू नये अशी उर्वरित खासदारांची इच्छा आहे. पक्षाकडे पाहून तरी थॉर्पने उमेदवारी मागे घ्यावी नाही तर त्याचा त्वरित परिणाम इतरत्र होऊन लिबरल पक्षाचा धुव्वा उडण्याची शक्यता आहे. आधीच दरिद्री न् त्यात नवीन कर्जाचा शोध लागल्यासारखी लिबरल पक्षाची केविलवाणी परिस्थिती झाली आहे.

४ ऑगस्टला थॉर्पची कोर्टात सुनावणी झाल्यानंतर लगेच इतर नेत्यांची धावपळीला सुरुवात झाली. डेव्हिड स्टीलने (लिबरलसचा नेता) ऑगस्ट महिना त्याच्या स्वतःच्या मतदारसंघात घालवायचे ठरविले होते. सप्टेंबर महिना देशभर हिंडायला मोकळा ठेवायचा अशी त्याची योजना होती; पण आता या योजनेला सुरुंग लागला आहे. कारण पूर्ण अनिश्चितता, सामान्य कार्यकर्त्यांच्या मनात गोंधळ आणि जर थॉर्प उभा राहिलाच तर प्रत्येक मतदारसंघात मतदारांच्या चेहेऱ्यावरचे अनुत्तरित प्रश्नचिन्ह यांची भीती त्याला व पक्षाला भेडसावीत आहे. सध्या त्यामुळे सगळाच गोंधळ माजला आहे.

१९७६ मध्येच थॉर्पने त्याच्या पक्षाच्या लोकांना खाजगीत असे आश्वासन दिले होते की जर कोर्टात आरोपपत्र दाखल झाले, तर मी निवडणुकीला उभा रहाणार नाही. आता मात्र त्याने उभे रहाण्याकडेच अनुकूलता दर्शविल्याने त्यांचे धाबे दणाणले आहे; पण उघडपणे थॉर्पची उमेदवारी अयोग्य आहे असे सांगणारे दोनच खासदार आहेत. सोरिल स्मिथ आणि डेव्हिड पेनॅलिगन. यातील पेनॅलिगनसाहेब नॉर्थ डेवनच्या शेजारच्या दुसरो मतदारसंघातून केवळ ४६४ मते जास्त पडून निवडून आलेले आहेत. त्यामुळे त्यांना आपल्या जागेची काळजी वाटणे स्वाभाविक आहे. अशा मजेशीर परिस्थितीत सर्वांचे डोळे नॉर्थ डेवनकडे लागून असल्यास नवल नाही.

नॉर्थ डेवन : नॉर्थ डेवन मतदारसंघाने ब्रिटनमध्ये लोकशाही रुजल्याचा फुगा फोडला आहे. पक्षाच्या आदेशाप्रमाणे आणि व्यापक पक्षहित ध्यानात घेता वादळाचा केंद्रबिंदू ठरलेल्या थॉर्पने निवडणुकीतून बाजूला होणे आवश्यक; पण नॉर्थ डेवनच्या १५० जणांच्या समितीने थॉर्पच निवडणूक लढवील असे जाहीर केले. जर त्याला लिबरल पक्षाचा अधिकृत उमेदवार म्हणून मान्यता मिळाली नाही, तर त्याने अनधिकृत म्हणजे बंडखोर उमेदवार म्हणून निवडणूक लढवावी असा निर्णय त्यांनी पक्षाच्या कार्यकारिणीला कळविला आहे. थॉर्प या मतदारसंघात अतिशय प्रिय आहे. ४ ऑगस्टच्या सुनावणीनंतर ५ ऑगस्टला तो मतदारसंघात गेला असता त्याचे ठिकठिकाणी प्रचंड स्वागत झाले. नॉर्थ डेवनच्या लोकांची व्यक्तिनिष्ठा ही पक्षनिष्ठेपेक्षा मोठी आहे. लिबरल पक्षाच्या दृष्टीने आणखी त्रासदायक गोष्ट म्हणजे दुसरा उमेदवार या जागेसाठी योग्य नाही. थॉर्पच तो मतदारसंघ जिंकू शकतो. त्याच्याऐवजी तात्पुरता डमी उभा करून नंतर कोर्टातून थॉर्प निष्कलंक सुटल्यावर डमीने राजीनामा देऊन थॉर्प तेथून निवडून येण्याची शक्यता त्यामुळे फेटाळली जाते. आता त्याने उभे न रहाता आरोपांचे निराकरण झाल्यावर एखादी पोटनिवडणूक लढवावी म्हटले तर लिबरलसची ठराविक पॉकेट्स सोडली तर बाकी ठिकाणी काही शाश्वती नाही आणि थॉर्प तर राजकारणातून निवृत्त होऊ इच्छीत नाही.

नॉर्थ डेवनच्या लोकांचे म्हणणे असे की, जर आता थॉर्पने माघार घेतली तर एक तर त्याला नजीकच्या भविष्यात काही आशा नाही व दुसरे म्हणजे आरोपांना अप्रत्यक्षपणे कबूली दिल्यासारखे होईल म्हणून त्याने आणि फक्त त्यानेच उभे रहाणे योग्य. शिवाय कायद्यानुसार जोपर्यंत आरोप सिद्ध होत नाही तोपर्यंत प्रत्येकजण निर्दोषीच असतो. तेव्हा थॉर्पला हा हक्क नाकारण्याने त्याच्यावर अन्याय होईल. म्हणून नॉर्थ डेवनने आणि पर्यायाने थॉर्पने त्याची उमेदवारी निश्चित केल्यात जमा आहे.

## परिणाम

१) मजूर पक्ष आणि लिबरल यांचा समझोता आहे. संशयी वर्तनाच्या या उमेदवाराचा प्रश्न उघड नाही तरी छुप्या रीतीने निवडणुकीत महत्त्वाचा ठरणार. लिबरलसचे स्वतःचे भवितव्य धोक्यात आले आहे असे नाही, तर त्यांच्या थॉर्पबद्दलच्या भूमिकेचे परिणाम आणि पडसाद मजूरपक्षातही उमटणार. मजूरपक्षाच्या हुजूरपक्षाशी चाललेल्या स्पर्धेत आधीच त्याची परिस्थिती नाजूक, त्यात पोटनिवडणुकांत बेदम मार खाल्लेला म्हणजे एकूण पहाता सरकार बदलण्याइतका हा प्रश्न प्रभावी ठरू शकेल. त्यामुळेच टोरी आनंदात आहेत. थॉर्पचे भूत लिबरलसनाच नाही तर मजुरांनाही पछाडील ही शक्यता नाकारता येणार नाही.

२) लिबरल पक्षाला थॉर्प अध्यक्ष होता त्यानंतर आता वेगळे वळण लागले आहे. पक्ष अधिक मूळ धरू लागला आहे. तेव्हा लाटेवर त्याचे भविष्य असे आता त्याचे मतदार व मतप्रणाली हळूहळू निश्चित होऊ लागली आहे. आजवर एक विशिष्ट धर्तीची छाप त्याने ब्रिटिश राजकारणावर पाडलेली आहे. हे सारे एका व्यक्तीमुळे नष्ट होईल काय हे लोकशाही मिरविणाऱ्या राष्ट्राच्या एका छोट्या पक्षाच्या भवितव्यावरून लवकरच स्पष्ट होईल. □

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा
**मॅक्झिम गॉर्की**
**सुमती देवस्थळे**
मूल्य दहा रुपये
**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

# कलकत्ता मेल

तारा पंडित

## झोपी गेलेला जागा झाला !

१९७१ नंतर वाटलं होतं, सारं काही शांत शांत झालंय. नक्षलवादी चळवळ संपली आहे. ती केवळ एक लाट होती, ओसरून गेली; पण खरं तर तसं नाहीये हे आता कळतंय. ती शांतता फक्त पृष्ठभागावर होती. आत खळबळ असलीच पाहिजे. आम्हाला वाटत होतं, चला, नक्षलवाद्यांचा त्रास संपला एकदाचा; पण आमच्या कल्पना चुकीच्या ठरल्या. आता तर त्यांच्या हालचाली वेगाने वाढू लागल्या आहेत. साऱ्या कलकत्त्यात नि आसपासच्या प्रदेशात अगदी बंगाल-बिहार सीमारेषेपर्यंत नक्षलवादी कृत्यांना, म्हणजे मुख्यत: विध्वंसनाच्याच, ऊत येऊ लागला आहे. वास्तविक त्यांचे आपापसात मतभेद झाल्याने शक्ती विभागली गेली होती व तिचा प्रभाव दिसून येत नव्हता. आता अकस्मात त्यांनी जुळवाजुळव केलेली दिसतेय. एरवी अगदी अलीकडे म्हणजे जेमतेम एक वर्षाचाच ह्या चळवळीशी संपर्क आलेला माणूस ह्यांचा नेता कसा काय ठरू शकतो ? पोलिसांनादेखील ह्याचे आश्चर्य वाटते. ते शेवटी म्हणतात, ह्यांच्या स्वभावातच खून करण्याची प्रवृत्ती भरलेली आहे, हेच खरं !

काही का असेना, पण नक्षलवादी अलीकडे सचेतन झाले आहेत व पहिलं काम त्यांनी हाती घेतलय् ते शहरातील पुतळ्यांची तोडफोड करण्याच. त्याप्रमाणे बऱ्याच ठिकाणी त्यांनी यशस्वीपणे आपला उद्देश साध्य करून घेतला आहे. या त्यांच्या कृत्यावर अनेक पक्षांच्या अनेक नेत्यांनी भाष्य केलं. कोणी म्हणाले, पुतळ्यांची तोडफोड नक्षलवाद्यांनीच केली असावी, असं मी म्हणत नाही; पण कोणीही का करीना, हे कृत्य वेडेपणाचं आहे खास ! श्रेष्ठ व्यक्तींचे पुतळे हे आपल्या देशाचे धन आहे. त्यांची अशी नासधूस व्हावी हे बरं नव्हे. कोणी म्हणाले, अशा तऱ्हेने धुमाकूळ घातल्याचे प्रकार इतर देशांमधून ऐकू आले नाहीत. रशियातदेखील एवढी क्रांती झाली; पण पीटर द ग्रेटचा पुतळा अबाधित राहिला! अजूनही तो तसाच आहे. चीनने देखील पूर्वजांचे पुतळे सुस्थितीत कायम ठेवले आहेत. त्यांना जराही धक्का लावला नाही. असे केले तर म्युझियमलादेखील काही अर्थ उरणार नाही. कोणी म्हणाले, आपला बेकारीचा प्रश्न इतका बिकट आहे की, तो पुढे कोणतेही भयानक स्वरूप धारण करू शकतो. गेल्या वर्षभरात सी. पी. एम् चा राज्यकारभार पाहून नक्षलवादी हताश झाले आहेत. त्यांना वाटते आता आपण काही तरी हालचाल करणे अत्यावश्यक आहे. म्हणूनच त्यांनी पुतळे तोडण्याचे काम सुरू केले असावे.

ही मतमतांतरे नुसती शाब्दिक भाष्ये आहेत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे नक्षलवाद्यांनी आता अस्तन्या वर सारल्या आहेत आणि त्यांना वठणीवर आणणं हे कुणालाच जमत नाहीये—अजून तरी ! ☐

## वीज जाते तेव्हा . . .

कलकत्त्यात वीज जाणं हा नित्याचा कार्यक्रम होऊन बसलाय्. ह्या दीडदोन वर्षात तर लोकांना 'वीज जाणे' ह्या प्रकाराची इतकी सवय झाली आहे की, मध्यंतरी दोन तीन दिवस 'वीज कशी गेली नाही ?' म्हणून जो तो एक दुसऱ्याला विचारू लागला व आश्चर्य प्रकट करू लागला. लोकांच्या मनात आशेचा किरण निर्माण होतो न होतो तोच पुन्हा आपलं ये रे माझ्या मागल्या सुरू!

ह्या वीज जाण्याच्या प्रकारामुळे अनेकांचं अनेक तऱ्हेने नुकसान होत आहे, हे तर खरंच; पण नगरवासियांची सहनशक्ती फार मोठ्या प्रमाणावर वाढली आहे हेही तितकंच खरं. ऑफिसमध्ये घाम पुसण्यासाठी एकाऐवजी तीन रुमाल जवळ बाळगू लागले आहेत. गृहिणींनी मेणबत्तीच्या उजेडात स्वयंपाक करण्याची सवय लावून घेतली आहे. आपल्या सासवांच्या काळात कुठे होती इलेक्ट्रिसिटी ? त्यांनी नाही का मिणमिणत्या उजेडात कामं केली ? अशी मनाची समजूत त्या घालू शकतात. अभ्यास करणारी मुलं कंदिलाच्या प्रकाशात डोळे ताणून परीक्षेची तयारी करतात. त्यांना आता जाणीव आहे की, आपल्या आजोबा-पणजोबांनी तर रस्त्यावरच्या म्युनिसिपालिटीच्या कंदिलावरच अभ्यास करून उत्तम यश मिळविलेलं आहे. आपणही कंदिलाच्या प्रकाशात अभ्यास करून चांगले मार्क मिळवू शकतो. थोडक्यात, विजेवाचून अडू द्यायचं नाही अशी प्रत्येकाने सवय लावून घेतली आहे. सुरुवाती—सुरुवातीला खूप आरडाओरडा ऐकू यायचा. दैनिका—मासिकातून मोठ्या उत्साहाने लेख—पत्रे प्रसिद्ध व्हायची. आता नावीन्य काही उरलं नाही. रोजच्या जीवनाचाच तोही एक भाग म्हणून मानला जातो. एकदा वीज गेली की चार तास निश्चिती, हे आता प्रत्येकाला कळून चुकलंय. आता दिवसातून दोनदा चार-चार तास वीज असणारच नाही, ह्याचीही खात्रीच झालीय् सर्वांची. थोडक्यात, वीज नसणं हे अगदी अंगवळणी पडलंय्.

पण गंमत अशी की, सकाळ—सायंकाळ घराघरात व बाजारात वीज नसते. अशा वेळी पार्कापार्कातून कसले तरी मेळे भरलेले असतात अन् तेथील दुकानांमधून विजेचा झगमगाट दिसतो. लोकांच्या नजरा त्या दिव्यांकडे पाहूनच तृप्त होतात. ह्याच वेळी पार्क स्ट्रीट नामक 'पॉश' विभागात हॉटेलाच्या आणि बंद दुकानांच्या जाहिरातबाजी करणाऱ्या प्रकाशित नळ्यांचा इतका लखलखाट असतो की, रस्ताभर नुसती प्रकाशाची चादर अंथरल्यागत वाटतं; पण ज्या भागात वीज नसते तेथे मात्र चोरी—लूटमारीच्या प्रकारांचा अवलंब करण्यात आलेला दिसतो.

नाही म्हणायला मोठमोठ्या हॉस्पिटलमधून विजेचा पुरेसा पुरवठा केला जातो; पण छोट्या छोट्या प्रायव्हेट दवाखान्यांतून मेणबत्त्याच लावाव्या लागतात. एकदा एक डेन्टिस्ट एका माणसाचा दात काढीत असताना एकदम वीज गेली. आपलं काम अर्धवट टाकून डॉक्टरांनी मेणबत्ती शोधली. ती पेटविली आणि मग उरलेलं काम पूर्ण केलं. तोवर पेशंट आपला 'आ' वासून खुर्चीत तसाच बसून राहिला.

वीज नसल्यामुळे मेणबत्तीचा धंदा जोरात

चालला आहे, त्यातही मारवाडी पॉलिसी सुरू झालीय. मेणबत्त्यांमध्ये चक्क पाण्याचा अंश असतो. पेटविल्यापासून ती सारखी तड-तड वाजत असते व पाण्याचे बारीक थेंब उडत असतात. प्रकाशही नीट पडत नाही. बाजारात कंदील व इतर केरोसीन–लॅम्प्स् मोठ्या प्रमाणावर दिसतात. त्यांचाही चांगला खप होतो.

वीज नसली की पाण्याची ओरड होते. घरमालक त्याचाही फायदा घेतात नि भाडेकरूंना पाणीपुरवठा करीत नाहीत. आता घराघरातून पाणी साठवून ठेवण्याचं एक काम वाढलं आहे. सभा-संमेलनातून 'वीज जाते तेव्हा' ह्या विषयावर वक्तृत्वस्पर्धा किंवा व्याख्याने आयोजित केली जातात. कथा कविता लिहून साहित्य–निर्मिती होते. इतकंच काय, पण हातमागाच्या बंगाली साडीचा एक प्रकारदेखील 'लोडशेडिंग' ह्या नावाने खपविला जातो. ही साडी बरीच लोकप्रिय झालेली दिसते.

वीज जाण्याने नुकसान होत असेल; पण त्यातूनही आपलं हित कसं साधायचं हे लोकांनी मोठ्या कौशल्यपूर्ण रीतीने शोधून काढलं आहे, हा फायदा काय कमी आहे ? □

## पुन्हा घेराव ?

कलकत्ता विद्यापीठाच्या उपकुलगुरूंना पुन्हा घेराव करण्यात आल्याची बातमी परवाच्या वर्तमानपत्रात आलीय्. हे घेराव करणारे कोण तर एल्. एल्. बी.च्या परीक्षेला बसणारे विद्यार्थी ! ही काही अगदीच पोरंसोरं नव्हतं. चांगले ग्रॅज्युएट झालेले आणि कित्येक तर नोकऱ्या करणारे समजदार नागरिक आहेत ! कसल्या तरी वेडगळ मागण्या करीत आरडाओरडा करायचा आणि ऐन परीक्षा उधळून लावायची. बिचारे उपकुलगुरू घाबरून गेले ह्या घेरावामुळे ! त्यांनी लागलीच ज्योती बसूंना फोन केला. मुख्यमंत्रीमहाशयांनी मग भाष्य केलं की, 'हे अडथळा निर्माण करणारे विद्यार्थी काँग्रेस पक्षाचे आहेत असं ऐकतो. त्यांना परीक्षेला बसायचं नसेल तर त्यांनी खुशाल घरी बसून राहावं; पण इतरांना त्रास देण्याचा त्यांना काहीही अधिकार नाही !' एवढे म्हणून मुख्यमंत्री मोकळे झाले. मग कोणी तरी मध्यस्थी केली आणि परीक्षा एकदाची पार पडली.

हे तर काहीच नाही. मला पाच-सहा महिन्यांपूर्वीचा एक प्रसंग आठवतोय्. एका परिचित कुटुंबाकडे एकदा गेले असताना सहज विषय निघाला तेव्हा मी म्हटलं – 'काय हो, व्हाइस चॅन्सेलर याच भागात कुठे तरी राहतात ना ?'

'होय, इथेच. आमच्याच इमारतीत वरच्या मजल्यावर.'

'मग परवा त्यांना घरीच घेराव केला होता म्हणून ऐकलं ते काय इथेच ?'

'हो, ना. इमारतीच्या सर्व पायऱ्यांवर ठाण मांडून बसली होती पोरं, ती थेट चौथ्या मजल्यावरच्या त्यांच्या फ्लॅटच्या दारापर्यंत ! तब्बल तीन तास तळ ठोकला होता त्यांनी ! इतरांना देखील जाणं–येणं मुष्किल झालं होतं.'

हे ऐकून नवल वाटलं. ह्या विद्यार्थ्यांची मागणीदेखील विचित्रच. काय तर म्हणे ६५ टक्के विद्यार्थ्यांना तुम्ही नापास केलंत हे योग्य झालं नाही. आता त्या सर्वांना ग्रेस मार्क देऊन पास करा, नाही तर परिणाम ठीक होणार नाही ! उपकुलगुरूंना धाकद-पटशा दाखवून त्यांच्याकडून जबरदस्तीने पास करवून घेणं याला काय म्हणावं ? विशेष नवलाची गोष्ट म्हणजे विद्यार्थ्यांच्या ह्या मागणीला पालकांचाही पूर्ण पाठिंबा होता. त्यांचे म्हणणे ग्रेस मार्क देऊन आमच्या मुलांना पास करावंच लागेल, नाही तर आम्ही भरलेल्या फीचे पैसे वाया जातील. पुन्हा एवढी फी आम्ही कोठून भरायची ?

ह्यात बेजबाबदारपणा कोणाचा ? विद्यार्थ्यांचा, पालकांचा, शिक्षकांचा की खुद्द उपकुलगुरूंचा ? हे ज्याचे त्यानेच ठरवावे हे बरे ! □

## एशिआटिक सोसायटीचं नशीब

एशिआटिक सोसायटी म्हणजे प्रचंड ग्रंथसंभार . . . दुर्मिळ ग्रंथांचा संग्रह . . . मूल्यवान अक्षरसंपत्ती . . . देशाला भूषणावह असलेलं एक पदकच जणू . . . आणि आणखी किती तरी. अशा ह्या एशिआटिक सोसायटीची एवढी दुर्दशा का व्हावी ? आणि जबाबदार म्हणविणाऱ्या कोणाही व्यक्तीचं तिच्याकडे लक्ष जाऊ नये ? वर्षानुवर्षं अनाथ होण्याची पाळी ह्या ग्रंथालयावर यावी यासारखं दुर्भाग्य कोणतं ? शेवटी सर्वसाधारण माणसालाच हळहळ वाटू लागते; पण उपयोग काय ? त्याच्या हातात काय आहे ? १९४ वर्षांचं हे ज्ञानभांडार, पण त्याचं संरक्षण आणि संवर्धन ह्याबाबतीत कधी विचारच केला जाऊ नये, असं का ? १९७५–७६ सालात एकदा चर्चेला विषय समोर आला होता, गरम चर्विच्चर्वण झालं होतं आणि त्यामुळंच की काय, सरकारची झोप उडाली व ह्याबाबतीत काही तरी हालचाल केली पाहिजे हा विचार पुढे आला. मग एक कमिटी स्थापन झाली व दोन आठवड्यात त्यांनी नीट तपासणी करून रिपोर्ट सादर करावा असं ठरलं; पण दोन आठवड्यां-ऐवजी दोन वर्षं उलटली तरी रिपोर्टचा पत्ता नाही ! अखेर परवा परवा कमिटीचे डॉ. प्रफुल्लचंद्र गुप्ता ह्यांनी प्रेस कॉन्फरन्समध्ये सांगितलं की, कमिटी हे काम करू शकणार नाही ! आश्चर्याची गोष्ट अशी की, आजवर प्रत्यक्ष किंवा परोक्षपणे कोणीच मनापासून सोसायटीचं काम केलेलं नाही. परवा नुकतीच यासंबंधी मीटिंग घेण्यात आली; पण निव्वळ चर्चा करून हा प्रश्न सुटणार नाही. सोसायटीच्या नशिबी अनाथ होण्याची पाळी आलीय् तेव्हा तिची हेळसांड दूर करणं हे पहिलं कर्तव्य आहे. सोसायटीचे जे चार सेक्रेटरी आहेत ते आठवड्यातून चार दिवस ऑफिसमध्ये येतात आणि जेमतेम दोन–तीन तास थांबून पळून जातात आणि अध्यक्षमहाराज तर महिन्यातून एकदा–मीटिंगचे वेळीच फक्त उपस्थित असतात ! एरवी ह्या बाजूलाही ते फिरकत देखील नाहीत. अशा अवस्थेत सोसायटीची उन्नती होणार कशी ? सभासदांची संख्याही अगदीच कमी आहे. म्हणूनच तिची आर्थिक व प्रशासनिक जबाबदारी कुणा तरी कर्तबगार व्यक्तीने उचलायला हवी. त्यासाठी एक फुलटाइम सेक्रेटरी नेमायला हवा, जो सर्व कामकाज आत्मीयतेने पाहू शकेल. शिवाय लायब्ररीचा लेंडिंग सेक्शन बंद करून केवळ रेफरन्स लायब्ररी म्हणूनच फक्त ती जाहीर करावी. कारण आतापर्यंत लेंडिंग सेक्शन चालविल्यामुळे किती तरी दुर्मिळ पुस्तके हरविली आहेत, आता फक्त ती सभासदांपुरतीच मर्यादित ठेवावी. सरकारने तिच्या संरक्षणार्थ आर्थिक साहाय्य करावे व काम करणारांनी आपलेपणाने ह्या ज्ञान-भांडाराचे जतन करावे. अभ्यासूंना तिचा पूर्ण फायदा घेता येईल अशी व्यवस्था व्हावी. ग्रंथांची योग्य ती काळजी घेण्यात यावी. १९७१ पासून कॅटलॉग छापलाच नाही, ह्याचाही विचार करावा. इतके केले तरच एशिआटिक सोसायटीचे हाल संपतील व तिची अवस्था सुधारेल ! नाही तर . . . तिचं नशीब ! □

# मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या निमित्ताने

एक : अच्युत खोडवे, औरंगाबाद

महाराष्ट्र विधिमंडळात मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा ठराव दि. २७ जुलै १९७८ ला बिनविरोध संमत झाला व एक इतिहास घडला. मुख्यमंत्री शरद पवार व ठराव संमत करणारे विधिमंडळातील लोक यांना मराठवाड्यात त्याची एवढी तीव्र प्रतिक्रिया व तीही लगेच होईल, असे वाटले नसावे. मराठवाडा संतांची भूमी म्हणून आपण सतत गौरवीत आलो. तेव्हा हाही अन्याय तो सहन करील अशीच महाराष्ट्र-विधिमंडळातील सर्व सभासदांची कल्पना असली पाहिजे. नाही तर एवढ्या घिसाडघाईत हा ठराव संमत करून घेण्यात आला नसता व मराठवाड्यातील जनमानस समजून घेण्याची टाळाटाळ झाली नसती.

दैनंदिन व्यवहारात नाव ठेवतेवेळी माता-पित्यांच्या आवडी-निवडींबरोबरच कुटुंबातील इतर घटकांची इच्छा, समाजाची रूढी व परंपरा, ग्रह-नक्षत्र, शुभाशुभ इत्यादी अनेक बाबी विचारात घेण्यात येतात व एकदा ठेवलेले नाव सहसा बदलण्यात येत नाही आणि नाव बदलण्याचा अपवादात्मक प्रसंग आलाच तर माता-पिता व संबंधित व्यक्तीची संमती आवश्यक समजण्यात येते; पण हा साधा व्यवहारही महाराष्ट्र शासनाने मराठवाडा विद्यापीठाचे नाव बदलण्याचा ठराव संमत करताना पाळला नाही. मराठवाडा विद्यापीठाच्या जडण-घडणीत मराठवाड्यातील जनतेने तन-मन वाहून कार्य केले व आपल्या पसंतीचे नाव ठेवले. त्या जनतेला नामांतराच्या वेळी विश्वासात का घेण्यात येऊ नये, हे समजणे कठीण आहे. अशा प्रकारे आतापर्यंत भारतातील एखाद्या तरी विद्यापीठाचे नाव बदलले आहे का, याची जरी माहिती मिळविण्याचा महाराष्ट्र शासनाने प्रयत्न केला असता तरी त्यांना आपली चूक उमगली असती. बनारस हिंदू विद्यापीठ व अलिगढ मुस्लिम विद्यापीठ या दोन विद्यापीठांच्या नावांतील जातीय शब्द काढण्याचा भारत सरकारने जेव्हा प्रयत्न केला तेव्हा संबंधित लोकांनी किती विरोध केला हे येथे नमूद करण्याचे कारण नाही. जातीय शब्द काढणे जरी योग्य असले तरी शेवटी लोकमताची कदर करून आहे तीच नावे भारत सरकारला चालू ठेवावी लागली. ही घटना ताजी असताना महाराष्ट्र शासनाने मराठवाडा विद्यापीठाचे नाव बदलण्याचा प्रयत्न का करावा किंवा दलितांनी स्पृश्य-अस्पृश्यांत दरी निर्माण करणारी, अंतःकरणे परस्पराबद्दल कलुषित करणारी आग्रही मागणी का करावी व ती मान्य करवून घेण्याकरिता अनेक तऱ्हेची दडपणं तरी का आणावीत ?

यासंबंधीचा ठराव मांडताना मुख्यमंत्री शरद पवार यांनी महाराष्ट्र शासनाची भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांच्या मते विद्यापीठ-नामांतराच्या निर्णयाने सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने एक मोठे पाऊल टाकले गेले आहे. खरोखरच तसे झाले आहे का ? आतापर्यंत घडलेल्या व आजही घडत असलेल्या घटना काय दर्शवितात ? कधी नव्हती एवढी दरी आज दलित व दलितेतरांमध्ये निर्माण झाली आहे. अशीच परिस्थिती राहिली तर ग्रामीण भागात याचा अधिकच उपद्रव होणार आहे. थोड्या वेळाकरिता महाराष्ट्र सरकारचा युक्तिवाद बरोबर मानला, तर महाराष्ट्र सरकारच्या पावलावर पाऊल टाकून इतर राज्यांनीही आपापल्या क्षेत्रांत असलेल्या विद्यापीठांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर किंवा इतर दलित पुढाऱ्याचे नाव देण्यास काय हरकत आहे ? इतरत्र जर हे होऊ शकत नसेल तर मराठवाड्यालाच का एवढे अनुगृहीत करावे ?

दलितांच्या मागणीमागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दलची त्यांची आत्यंतिक श्रद्धा व आदर प्रामुख्याने आहे. डॉ. बाबासाहेबांबद्दल इतरांनाही दलितांइतकाच आदर आहे. भारतातील सर्व नागरिक बाबासाहेबांना भारताचा एक थोर पुरुष मानतात. मराठवाड्यातील जनता त्यास अपवाद नाही. म्हणून बाबासाहेबांच्या स्मारकास मराठवाड्यातील जनतेचा मुळीसुद्धा विरोध नाही. अशा थोर व्यक्तीचे स्मारक त्यांच्या थोरवीला साजेसे, उचित व वादातीत असावे असे त्यांना वाटते. विद्यापीठाचे प्रस्थापित नाव बदलून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव त्यास दिल्याने ही गोष्ट साध्य होणार नाही. मतभेद असलाच तर तो स्मारक कसे असावे यासंबंधी आहे. अशा स्थितीत शासनाला मराठवाड्यातील जनतेला विश्वासात घेऊन हा प्रश्न सोडविणे शक्य होते. कदाचित थोडा अवधी लागला असता; पण ही जीवित व वित्तहानी तरी निश्चित टाळता आली असती.

जनता पक्ष, दलित पँथर, युक्रांद इत्यादी पक्षांतील नेत्यांनी निरनिराळ्या वेळी वक्तव्ये देऊन व काहींनी कृती करून हा प्रश्न आणखी किचकट केला. त्यात राजकारण आणले गेले व मग मराठवाड्यातील जनतेच्या भूमिकेबद्दलच गैरसमज निर्माण झाला. मुळात मराठवाडा विद्यापीठाचे नाव बदलण्यासच जनतेचा विरोध आहे. केवळ बाबासाहेबांचे नाव विद्यापीठास देण्यास जनतेचा विरोध आहे असे नाही, तर कोणत्याही व्यक्तीचे नाव विद्यापीठास देण्यास त्यांचा विरोध आहे. ही त्यांची भूमिका दलितांच्या विरोधी आहे असे कोणी समंजस म्हणणार नाही. तरीही आज मोठी कोंडी निर्माण झाली आहे. मराठवाडा विद्यापीठाचा नामांतराचा प्रश्न एका मोठ्या कैचीत सापडला आहे. नामांतराच्या विरुद्ध असणारे प्रतिगामी व नामांतरास अनुकूल असणारे पुरोगामी समजले जाऊ लागले आहेत; पण अशी वर्गवारी करणे समाजहिताच्या दृष्टीने अत्यंत चूक व घातक आहे. नामांतराच्या विरुद्ध असणारेही इतरांइतकेच दलितांचे

हित पाहणारे कैवारी आहेत. त्यांच्यापैकी बहुतेकांनी दलितांकरिता सरकारशी, समाजाशी व इतरांशी झगडा दिला आहे.

वास्तविक नामांतराच्या परिणामांचा विद्यापीठाच्या कार्यकारिणी-सकट कोणीच गंभीरपणे विचार केलेला दिसत नाही. विद्यापीठाच्या कार्यकारिणीने तर हा महत्त्वाचा प्रश्न सिनेटपुढेही मांडला नाही. पुण्यात भरलेल्या साहित्य-संमेलनातही तेच झाले. तेथे जमलेल्या साहित्यिकांनी मराठवाडा विद्यापीठाला बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे असे सुचविले. साहित्यिकांनी किंवा जनता पक्षासारख्या राजकीय पक्षातील श्री. एस्. एम्. जोशी यांच्यासारख्या मान्यवर पुढाऱ्यांनी बाबासाहेबांच्या नावाकरिता मराठवाडा विद्यापीठाचीच का निवड करावी, हे मराठवाड्यातील जनता समजू शकत नाही. मराठवाड्यात एवढे सर्व रामायण घडत असतानाही श्री. पु. ल. देशपांडे यासारख्या श्रेष्ठ मराठी साहित्यिकांनीही मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरासंबंधी ताठरपणे वक्तव्य करावे, हे मराठवाड्याचे दुर्दैव आहे.

पुणे विद्यापीठास डॉ. बाबासाहेबांचे नाव सुचवून त्यांनी दलिताबद्दलच्या आपल्या आस्थेचे का प्रदर्शन करू नये? हुलवायाच्या घरावर फातिया असा जर मराठवाड्यातील जनतेचा ग्रह झाला तर तो चुकीचा आहे का? यापैकी कोणीही मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराव्यतिरिक्त इतर प्रकारे आंबेडकरांचे उचित स्मारक सुचविले असते, तर त्याचे मराठावाड्याने अंतःकरणपूर्वक स्वागतच केले असते. आणखीही तसे स्मारक सुचविल्यास स्वागतच होईल याची खात्री कोणीही देईल.

मराठवाडा विद्यापीठाला डॉ. आंबेडकरांचे नाव देण्याबद्दल आणखी एक युक्तिवाद करण्यात येतो. डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक कर्तृत्वाची भूमी मराठवाडा असल्याचे सांगण्यात येते म्हणून औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठाला त्यांचे नाव देणे उचित. डॉ. आंबेडकरांनी मराठवाड्यात नव्हे तर फक्त औरंगाबाद शहराच्या मर्यादेत काही महाविद्यालये काढली आहेत हे खरे आहे; पण ही विद्यालये मराठवाड्याच्या जीवनाशी समरस होऊ शकली नाहीत असे खेदाने म्हणावे लागते. त्याच साली (१९५०) स्वामीजींनीही नांदेडला एक महाविद्यालय काढले. तत्पूर्वीही स्वामीजींनी व मराठवाड्यातील इतर काही व्यक्तींनी व संस्थांनी शैक्षणिक कार्याची मुहूर्तमेढ मराठवाड्यात केली होती, हेही तितकेच खरे आहे. इतकेच नव्हे तर या व्यक्ती व संस्था सर्व मराठवाड्यात पसरल्या होत्या. वस्तुस्थिती तर अशी आहे की, त्या सर्व व्यक्ती व संस्थाच निजामाविरुद्ध लढा देण्याची प्रेरणा देणाऱ्या होत्या. म्हणून त्यांचा वरील युक्तिवादही तौलनिकदृष्ट्या लगंडा पडतो. मुंबई तर डॉ. बाबासाहेबांच्या शैक्षणिक कार्याची केंद्रभूमीच आहे. असे असताना मुंबई विद्यापीठाला डॉ. बाबासाहेबांचे नाव देण्याचे कोणी सुचवीत नाही, असे का?

आणखी एका ऐतिहासिक वस्तुस्थितीकडे जाणून बुजून दुर्लक्ष करण्यात येते. हैद्राबाद राज्य निजामाच्या जोखडाखालून मुक्त होऊन श्री. बी. रामकृष्णरावांच्या नेतृत्वाखाली पहिले लोकप्रातिनिधिक मंत्रिमंडळ आल्याबरोबर स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई व इतर लोकांनी मराठवाड्यात विद्यापीठ स्थापन करण्यासंबंधी प्रयत्न करण्यास सुरुवात केली. हैद्राबाद विधानसभेत तशा प्रकारचा शिफारसवजा ठराव संमत करण्यात आला; पण नंतर लवकरच हैद्राबाद संस्थानचे विभाजन होऊन मराठवाडा महाराष्ट्रात विनाअट संमीलित झाला. श्री. गोविंदभाई व स्वामीजी यांनी त्या वेळचे मुंबई राज्याचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांची भेट घेऊन यासंबंधी त्यांच्याकडून आश्वासन मिळविले. त्या वेळचे मुंबई राज्याचे शिक्षणमंत्री श्री. शांतीलाल शहा हे मराठवाड्याला विद्यापीठ देण्याच्या विरुद्ध होते म्हणतात. पण श्री. यशवंतराव मराठवाड्यास दिलेल्या शब्दास जागल्यामुळे विद्यापीठाला मूर्तस्वरूप आले. या संदर्भात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, म. म. दत्तो वामन पोतदार, धनंजयराव गाडगीळ इत्यादी पश्चिम महाराष्ट्रातील विद्वानांनी दिलेल्या पाठिंब्याचाही उल्लेख करणे आवश्यक आहे. पुढे विद्यापीठाच्या नावाचा प्रश्न चर्चेला निघाला. त्याकरिता न्यायमूर्ती श्री. पळणीटकरांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमण्यात आले. डॉ. बाबासाहेबांचे निकटवर्ती व त्यांच्या ध्येयधोरणाशी एकरूप असलेले श्री. म. भि. चिटणीस हे त्या कमिशनचे एक सभासद होते. या कमिशनसमोर विद्यापीठाला नाव देण्याच्या दृष्टीने ज्ञानेश्वर, स्वामी रामानंदतीर्थ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शिवाजी, फुले इत्यादी थोर व्यक्तींची नावे आली होती. त्याचप्रमाणे, देवगिरी, प्रतिष्ठान, मराठवाडा इत्यादी नावेही आली होती. त्यातील सर्वानुमते मराठवाडा ह्या नावाची निवड झाली व तेच विद्यापीठाला देण्यात आले. कोणत्याही व्यक्तीच्या नावापेक्षा मराठवाड्यातील जनतेच्या एकूण सांस्कृतिक वारशाचे, प्रयत्नांचे व आशा–आकांक्षांचे प्रतीक म्हणून या नावाची निवड करण्यात आली. आज वीस वर्षांनंतर हे प्रतीकात्मक नाव बदलण्याचा ठराव शासनाने मराठवाड्यातील जनतेला विश्वासात न घेता करावा व त्याविरुद्ध एकाही प्रतिनिधीने बोलू नये, ही लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत चीड आणणारी बाब आहे. सहाजिकच तरुण विद्यार्थ्यांचे रक्त पेटले व त्यांनी स्वतःच्या ताकदीवर एवढे उग्र आंदोलन उभारले, त्याबद्दल खऱ्या अर्थाने त्यांचे अभिनंदनच करावयास पाहिजे. याचा अर्थ त्यांनी योजिलेल्या सर्वच उपायांशी कोणी सहमत आहे असा नाही. त्याचप्रमाणे आंदोलनाच्या काळात शासन ठप्प झाल्याचे नाकरणेही कठीण आहे. असे असले तरी प्रत्यक्ष नागरिकांना किंवा खाजगी मालमत्तेला आंदोलन करणाऱ्यांनी सुरुवातीला तरी इजा पोहोचविलीच नव्हती. मात्र एस्. आर्. पी.ने केलेल्या सरसकट प्रक्षोभक मारहाणीबद्दल लोकात चर्चा आहे.

मराठवाडा विद्यापीठाच्या संबंधित काही बाबींकडे या निमित्ताने लक्ष वेधणे अनाठायी होणार नाही. महाराष्ट्रात बहुतेक विद्यापीठांत पाली भाषेचे अभ्यासपीठ आहे. मराठवाडा विद्यापीठातही ते आहे; पण येथे पाली भाषेबरोबर बौद्ध धर्माचा अभ्यासही आवश्यक करण्यात आला आहे. इतर कोणत्या विद्यापीठात अशा प्रकारचा बौद्ध धर्माचा अभ्यास पाली भाषेबरोबर आवश्यक असल्याचे माहीत नाही.

कुठल्याही महाविद्यालयात शिक्षक नेमावयाचा झाला तर तो विद्यापीठाने नेमलेल्या समितीतर्फे नेमण्यात यावा, असा दंडक आहे. मराठवाडा विद्यापीठाने या समितीचा सभासद एक दलित असणे आवश्यक केले आहे. केलेल्या नियुक्तीस कुलगुरूंची संमतीही आवश्यक

आहे. मराठवाडा विद्यापीठाचा कुलगुरू दलित असावा, अशीही एक मागणी आहे. या पार्श्वभूमीत तडकाफडकी झालेल्या नामांतरामुळे मराठवाड्यातील जनतेच्या मनात विद्यापीठाच्या भावी स्वरूपाबद्दल एक प्रकारचा गैरसमज व भीती निर्माण झालेली दिसते.

नामांतराचा निर्णय घोषित करताना महाराष्ट्र राज्याच्या मुख्य-मंत्र्यांनी ही भीती निरर्थक असल्याचे सांगितले आहे. त्याचबरोबर मराठवाडा विद्यापीठाची अस्मिता नाव-लौकिक व धर्मनिरपेक्ष स्वरूप कायम ठेवण्याचे व शिक्षणात कोणताही बदल होणार नसल्याचे आश्वासनही त्यांनी निःसंदिग्ध शब्दांत जनतेला दिले आहे. आता-पर्यंत अनेक प्रकारची आश्वासने निरनिराळ्या मुख्यमंत्र्यांनी महा-राष्ट्र शासनाच्या वतीने दिली; पण त्या आश्वासनांची पूर्ती क्वचित झाली असेल. श्री. वसंतदादांनी मुख्यमंत्री असताना येथील विद्या-र्थ्यांना असे आश्वासन दिले होते की, मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या वेळी त्यांच्याशी विचारविनिमय करण्यात येईल; पण हे आश्वासन पाळण्यात आले नाही. त्यामुळे मराठवाड्यातील जन-तेचा शासनावरचा विश्वास उडत चालला आहे. प्रत्येक बाबतीत शासन किंवा राजकीय पक्ष मराठवाड्याची संमती गृहीत धरून निर्णय घेते, असा येथील लोकांचा ग्रह झाला आहे. नुसत्या नामांतरा-विरुद्ध हा उद्रेक नसून आतापर्यंत झालेल्या अन्यायाबद्दल, मराठ-वाड्याला मिळालेल्या पक्षपाती वागणुकीबद्दल खदखदत असलेल्या असंतोषाचा तो परिस्फोट आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने एखादे स्वतंत्र विद्यापीठ स्थापून किंवा अन्य काही मार्गाने मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर-प्रकरणी एखादी तडजोड निघू शकेल. असे झाले तर असंतोषाचे एक कारण दूर होईल; पण आज विद्यार्थ्यांना व सर्वसाधारण जनतेला त्यांच्या भविष्याबद्दलची शाश्वती हवी आहे. विद्यार्थी कृति समिती-तर्फे काढण्यात आलेली पत्रके पाहिल्यानंतर हा असंतोष किती खोलवर रुजला आहे याची कल्पना येईल. मराठवाड्याची अस्मिता टिकविण्याच्या नुसत्या आश्वासनाने विद्यार्थ्यांचे किंवा जनतेचे समा-धान होणार नाही. आश्वासनपूर्ती करण्याची शाश्वती देणारी एखादी स्वतंत्र यंत्रणा हवी आहे. तेलंगणाचे हितसंबंध संरक्षणा-करिता जसे सांविधिक मंडळ निर्माण करण्यात आले तसे सांविधिक मंडळ किंवा घटनात्मक तरतुदी जितक्या लवकर मराठवाड्याकरिता निर्माण करता येईल तितक्या लवकर निर्माण करणे जरूर आहे. मराठवाड्याला दिलासा देणारा हाच एक उपाय आहे. असे झाले नाही तर फुटीर वृत्ती बळावण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण आजच विद्यार्थ्यांच्या एका गटाने तशा प्रकारची मागणी केली आहे. ◻

## दोन : सुरेश हिरे, औरंगाबाद

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा प्रश्न अलीकडे दोन-अडीच वर्षांपासून जरी गाजत असला तरी नामांतराची मागणी सन १९७४ च्या मराठवाडा विकास आंदोलनानंतर झालेल्या जनता विकास परिषदेच्या बैठकीत झाली; परंतु विद्यापीठाला स्वामी रामा-नंदतीर्थ यांचे नाव द्यावे अशा स्वरूपाची ही मागणी होती. ही मागणी प्रामुख्याने सर्वश्री गोविंदभाई श्रॉफ, अनंतराव भालेराव, भाऊसाहेब वैशंपायन, बाबुराव काळे आदी मंडळींनी उचलून धरली होती.

यानंतर दोनच महिन्यांनी औरंगाबादेस मुस्लिमांचा एक मोठा मेळावा झाला. त्या मेळाव्यात विद्यापीठाला मौलाना आझाद यांचे नाव देण्याची मागणी करण्यात आली होती.

त्याच दरम्यान औरंगाबादेतील मिलिंद महाविद्यालयात प्राचार्य सदानशिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या एका समारंभप्रसंगी काही दलित युवकांनी मराठवाडा विद्यापीठाला स्वामी रामानंदतीर्थ किंवा मौलाना आझाद यांच्याऐवजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देणे सयुक्तिक ठरेल अशी जोरदार मागणी केली कारण डॉ. आंबेड-करांनीच मराठवाड्यातील शिक्षणाचा पाया घातला, असे या युवकांचे म्हणणे होते. पुढे याच मागणीला सर्व दलित संघटनांनी उचलून धरले.

त्या वेळचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी आंबाजोगाईच्या नव्या वैद्यकीय महाविद्यालयाला स्वामी रामानंदतीर्थ यांचे नाव दिले. त्यामुळे मराठवाडा विकास परिषदेच्या नेत्यांनी विद्यापीठास डॉ. आंबेडकरांचे नाव देण्यास आता काही हरकत राहणार नाही, अशी ग्वाही दिली होती. याच वेळी मराठवाड्यातील जवळ जवळ सर्वच राजकीय पक्षांनी व विद्यार्थी संघटनांनी नामांतराला पाठिंबा दर्शविला होता.

आणीबाणीनंतर नामांतराच्या चळवळीने जोर धरला. प्राचार्य सदानशिव यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिक–विद्यार्थी कृति समिती स्थापन करण्यात आली. यात म. भि. चिटणीस, प्रा. बापुराव जगताप, एस्. टी. प्रधान, गंगाधर गाढे, प्रीतम शेगावकर आदी मंडळी होती. या मागणीला पाठिंबा म्हणून महाराष्ट्रात सर्वत्र मोर्चे काढण्यात आले व मागणीचा जोर वाढतच गेला. याच वेळी मास मुव्हमेंटचे ढाले–ढसाळ यांनी एक पुस्तिका प्रसिद्ध करून त्यात जी कारणे दिली ती न पटल्याने प्रारंभी नामांतरला पाठिंबा देणाऱ्या नेत्यांनी आपली भूमिका बदलली.

याच दरम्यान मराठवाडा विद्यापीठ कार्यकारिणीने नामांतराला पाठिंबा देणारा ठराव केला. कार्यकारिणीच्या या निर्णयाच्या निषेधार्थ मराठवाड्यातील ८५ पैकी बहुतेक कॉलेजेस पंधरा दिवस विद्यार्थ्यांच्या संपामुळे बंद होती. या वेळी बाळासाहेब पवार यांच्या पुढाकाराखाली नामांतरविरोधी नागरिक विद्यार्थी कृति समिती स्थापन करण्यात आली.

या कालावधीतच औरंगाबाद जिल्हा जनता पक्ष, महाराष्ट्र जनता मुस्लिम फोरम यांसारख्या जनता पक्षाच्या विविध शाखांनी नामांत-राला पाठिंबा दिला. जनता मुस्लिम फोरम अधिवेशनातील एका कार्यक्रमाच्या निमित्ताने श्री. एस्. एम्. जोशी त्या वेळी औरंगाबादेत आले होते. ते मराठवाडा प्रेसमध्ये थांबले असता गाढे, शेगावकर प्रभृतींनी वीस हजार दलितांचा मोर्चा तेथे आणला. त्या वेळी मोर्चा-समोर बोलताना एस्. एम्. यांनी जनता पक्ष नामांतरासाठी सर्व प्रयत्न करील, असे जाहीर आश्वासन दिले आणि मोर्चा गेल्यानंतर तेथेच प्रेसमध्ये एस्. एम्., अनंतराव भालेराव, काशिनाथ नावंदर,

खा. बापूसाहेब काळदाते व ज. रा. बर्दापूरकर यांची चर्चा होऊन नामांतराला पाठिंबा देण्याचा निर्णय घेण्यात आला. दुसरे दिवशी जिल्हा जनता पक्षाच्या बैठकीतही ठराव घाईघाईने संमत करण्यात आला. यानंतर अशा प्रकारचे नामांतर-पाठिंब्याच्या ठरावाचे लोणच पसरले. निरनिराळ्या एकवीस संघटनांनी अशा प्रकारचे पाठिंब्याचे ठराव केले.

नामांतराच्या मागणीला जोर वाढतो आहे, हे पाहून वसंतदादा मंत्रिमंडळाने नामांतराचा निर्णय घेतला. पुढे मुख्यमंत्री शरद पवार व एस्. एम्. जोशी यांनी ठरावाच्या दुसऱ्या बाजूच्या लोकांना विश्वासात न घेता, विद्यार्थी नागरिकांचे मत न अजमाविता केवळ पुरोगामीपणाचा टेंभा मिरवण्यासाठी घाईघाईने विधानसभा, विधानपरिषदेत ठराव मांडला. या निर्णयाचे काय परिणाम होतील, याची पवार मंत्रिमंडळाला मुळीच कल्पना नव्हती. हे नंतर झालेल्या आंदोलनाच्या लाटेवरून वाटते.

विधिमंडळसभागृहात ठराव येणार असल्याचे समजताच त्याच दिवशी 'मराठवाडा बंद'चा आदेश देण्यात आला. नामांतरविरोधकांनी तो बंद शांततेने यशस्वी केला; परंतु बंदच्या दिवशी सायंकाळी आकाशवाणीवरून ठराव एकमताने संमत झाल्याचे वृत्त ऐकताच नामांतरविरोधक विद्यार्थी व नागरिक संतप्त झाले आणि वातावरण बदलले. चिडलेल्या विद्यार्थ्यांनी गुलमंडीवर एकत्र जमून खा. बापूसाहेब काळदाते व अनंतराव भालेराव यांच्या घरावर मोर्चे नेण्याचा प्रयत्न केला असता पोलिसांनी मोर्चा रॉक्सी टॉकीजजवळ अडविताच तेथे विद्यार्थ्यांनी चिडून दगडफेक केली आणि येथून आंदोलनाने वेगळेच वळण घेतले. शहरातील रस्त्यावरचे दिवे फोडणे, रस्त्यात अडथळे उभे करणे आदी प्रकार मोठ्या प्रमाणात घडले. मात्र याच वेळी औरंगाबाद शहर वगळता मराठवाड्यात इतरत्र मात्र बंद शांतपणे पार पडत होता. दुसरे दिवशी ( दि. २८ जुलै ) मात्र वर्तमानपत्रातील बातम्या वाचून इतरत्रही आंदोलनाला वेगळे वळण मिळाले; परंतु दि. ३० जुलैपर्यंत मराठवाड्यात सर्वत्र आंदोलनातून राग काढला जात होता तो सरकारवर, सरकारी मालमत्तेवर! सरकारने नामांतराचा निर्णय घेतला हे त्यामागचे कारण असावे. या काळात जी जाळपोळ, मोडतोड झाली ती सरकारी यंत्रणेची; पण हरिजनांना मारहाण करणे, त्यांच्या झोपड्या जाळणे हा प्रकार अपवादानेच झाला. दि. ३० पर्यंतचा आंदोलनाचा एक टप्पा होता, जो उत्स्फूर्त म्हणता येईल; परंतु दि. ३० नंतर आंदोलनाचे दुसरे पर्व सुरू झाले. ते मात्र उत्स्फूर्त होतेच असे म्हणता येणार नाही. त्याचा शोध आणखी काही काळ उलटल्यावर घेणेच अधिक युक्त होईल. ☐

## पुणे : दि. ५–८–१९७८

जातिनिर्मूलन संस्थेच्या नुकत्याच झालेल्या सभेमध्ये संस्थेचे विद्यमान अध्यक्ष व सुप्रसिद्ध अर्थशास्त्राचे डॉ. वि. म. दांडेकर यांनी जातिनिर्मूलनाविषयी काही मूलगामी स्वरूपाचे विचार मांडले. ते म्हणाले–

आपल्या देशात गेल्या पंचवीस-तीस वर्षांत जातिवाद जास्तच प्रबळ झाला आहे. त्याच्या कारणांचा आपण सहानुभूतिपूर्वक विचार केला पाहिजे. उदाहरणार्थ, आपल्या समाजरचनेमुळे मागासवर्गीयांना सवलती देऊन योजना आखल्याबरोबर अमुक जातीचे असणे महत्त्वाचे होऊन बसले. आपण वर्गीकृत व्हावे असे प्रत्येक जातीला वाटत आहे. अशा प्रकारे आपला भारतीय समाज एकसंध व्हावा असा आपला प्रयत्न असूनही प्रगट स्वरूपात जाती ठाण मांडून बसल्या आहेत. यावर काय उपाय करावा यासाठी चर्चा, परिषदा घेण्यात आल्या. त्यांस अपेक्षित साथ मिळाली नाही. उलट ज्या सवलती मिळतात त्या बंद करण्याचा यामागे उद्देश आहे की काय, असा विचार करणारांना दर्शनी विरोध करण्यात आला. जातीनिर्मूलनाचा प्रश्न त्यामुळे गुंतागुंतीचा झाला आहे. शिक्षणक्षेत्रातही राखीव जागा ठेवण्याच्या प्रवृत्तीतून हा प्रश्न अवघड झाला आहे. नेमलेल्या राखीव जागा भरण्यासाठी खटपट करणारे, नेमणूक करणाराचे की स्वतःचे हित बघत असतात, हे समजणे कठीण झाले आहे. परंपरेने शिक्षणाचे संस्कार व अनुकूल परिस्थिती यांची उपलब्धता नसल्याने मागासवर्गीय मुले शैक्षणिक क्षेत्रात मागे पडतात व इतरांच्या बरोबर येण्यासाठी आपण त्यांना ओढीत नेतो. पंचवीसतीस मार्क जादा देऊन उमेदवार मुलास कलेक्टर केला की काम झाले, असे आपण समजतो. यामुळे खरे तर जातिनिर्मूलनाचा प्रश्न जेथल्या तेथेच राहातो. त्याऐवजी मागासवर्गातली पंचवीस मुले घेऊन त्यांच्यावर पाच वर्षे मेहनत घेऊन त्यांना संस्कार व शिक्षण देण्याचा प्रयत्न अधिक फलदायी होईल, असे मला वाटते. जातिनिर्मूलनाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा बनण्याचे मागे राखीव जागांचे राजकारण, नोकरदारांना अवास्तव पगार देणे, या प्रवृत्ती आहेत, असे मला प्रामाणिकपणे वाटते. यातून मार्ग काढण्यासाठी आपणास नव्या वाटा शोधाव्या लागतील. त्याविना यातून सुटका नाही. अन्यथा मागासवर्गीयांपैकी कोणास लायन्स क्लबचे सभासद केले की जातिचे निर्मूलन झाले, इतका वरवरचा व उथळ प्रयत्न करण्याचा भाबडेपणा आपण केला नसता. सरकारी सहाय्य मिळविले तरी सरकारचा हात धरून चालण्याने या प्रश्नाची सोडवणूक होणार नाही. आंतरजातीय विवाह हा या प्रश्नावर अचूक तोडगा आहे. कारण आई-बापाची जी जात तीच मुलीची, हे जोवर चालू आहे तोवर जगाच्या अंतापर्यंत ही समस्या कधी मिटणार नाही. तेव्हा असे विवाह घडवून आणणे, योगायोगाने जिथे घडत असतील त्यांना प्रोत्साहन देऊन अशा चांगल्या घटनेला सुयोग्य स्वरूपाची प्रसिद्धी देणे हे महत्त्वाचे काम आहे. या प्रश्नाची सांगोपांग चर्चा होण्यासाठी परिषदा घडवून आणणे, पत्रिका व पुस्तके या द्वारा लोकमत तयार करणे हा या बाबतीतला चांगला उपाय मला वाटतो. अशा प्रकारे दलितांना इतरांबरोबर आणणे व वरच्या वर्गातही जातीयतेची जी घाण साठलेली आहे तिचेही निवारण करणे, थोडक्यात म्हणजे जातीयतेची कल्पना जिथे जिथे बीज धरून आहे तिथे तिथे ज्याला त्याला आपापल्या जागी राहून जे जे करता येईल ते ते करणे आवश्यक आहे. आजवर अनेक कारणांमुळे मला या प्रश्नाकडे लक्ष देता आले नाही. तरी यापुढे माझ्या परीने मी या कामाकडे लक्ष देईनच. समाजानेही या प्रश्नाकडे सहानुभूतीच्या व सोडवणुकीच्या दृष्टीने लक्ष दिले तर नजीकच्या काळात जरूर तो उतारा सापडून आजची गंभीर परिस्थिती आपण बदलू शकू असा विश्वास वाटतो.

या सभेमध्ये जातिनिर्मूलन संस्थेचे श्रेष्ठ नेते श्री. शिरुभाऊ लिमये, यांनी संस्थेच्या कामाला गती देण्यासाठी नवा उमेदीचा कार्यकर्तावर्ग जवळ केला असल्याचे सांगून लवकरच या प्रश्नाबाबत लोकमत तयार करण्यासाठी परिषद घेण्याचा निर्णय घेतला असल्याचे सांगितले.

–विलास वाघ

## जनमतकौल पत्रिकांसोबत वाचकांकडून आलेल्या

# काही उत्स्फूर्त प्रतिक्रिया

◻ सोबत आपण जाहीर केलेली 'जनमतकौल प्रश्नपत्रिका' भरून पाठवीत आहे. त्याच वेळी माझी भूमिकाही विशद करावी असे मला वाटते.

आजच्या काळात आपल्या देशातील कोठल्याही पक्षाची मूळ तात्त्विक अशी राजकीय भूमिका शिल्लक उरलेली नाही. तसेच त्या त्या पक्षाचे नेतेही (राष्ट्रीय व काही प्रांतीय पातळीवर) वृद्ध, नवीन तरुण पिढीच्या भावना न जाणणारे असे परंपरावादी आहेत. त्यांच्या हातून आता राष्ट्रीय व सामाजिक प्रश्न सोडविले जाणे कठीण आहे.

या परिस्थितीत श्री. शरद पवार यांसारख्या तरुण व शासन आणि संघटना या दोन्हीमध्ये अनुभवी असलेल्या नेत्याकडून निदान काही नवीन मार्ग काढून आत्तापर्यंत तुंबून राहिलेल्या राजकीय व सामाजिक प्रवाहांना दिशा तरी लागेल. त्यातून राजकारण हे कधीही 'स्तब्ध' (Static) किंवा 'पुस्तकी' (Booksih) असे राहू शकत नाही. तेव्हा महाराष्ट्रातील ह्या प्रयोगाचे आपण स्वागतच केले पाहिजे. १९६९ साली आपण अशाच श्रीमती इंदिरा गांधींची (त्यांच्या' बंडाची') तारीफ केलेली आहे.

नवी दिल्ली —बंडोपंत सरपोतदार

◻ जनमतकौल उपक्रम फारच छान! प्रश्नपत्रिका पेपरांतही छापाव्यात व महाराष्ट्रभरचे मत अजमावून घ्यावे. भरपूर प्रसिद्धी द्यावी (Results ना)!

Democratic Proecss मधील हा एक फारच उपयुक्त उपक्रम ठरेल. राजकारण्यांवर वचक बसण्याची पाळी येईल. कमीत कमी महाराष्ट्रात तरी हा प्रयत्न करता येईल, इतर मासिके / पाक्षिके उदा. India Today वगैरे असले 'जनमतकौल' घेत असतात; परंतु त्यांच्या प्रश्न पत्रिका आम्हास identification वाटत नाहीत व केलेला उद्योग हा contorted वाटतो.

हा, तर मी काय म्हणत होतो—Democracy बद्दल. स्वातंत्र्यानंतर आपल्याकडे लोकशाही कधीच नांदली नाही. किंबहुना मला तर वाटते की " The very concept of Democracy as is visualized by the learned is inapplicable to this country under the 1947 or present conditions." केवळ फॅशन म्हणून ही वस्तू आपण आयात केली व त्याच कारणास्तव आपण तिचा कैवार घेतला. इंदिरा गांधींची १९७६ ची पीछेहाट म्हणजे लोकशाहीचा विजय नसून मन मानेल ते करणे पसंत असलेल्या गुंडाचाच विजय आहे आता जे खालपासून वरपर्यंत हजारो खाबू—बाबू सर्वत्र पहावयास व अनुभवावयास मिळतात त्यापेक्षा एक–दोनच गुंड दिल्लीत ठेवलेले परवडले. ज्या राष्ट्रात क्षुल्लक गोष्टींवरही दुमत होऊन यादवी माजते तेथे प्रत्येक शिक्षित व अशिक्षित नागरिकाचे मत मागायला सांगितले आहे कुणी? ज्या राष्ट्रात मंत्र्यासारखी जबाबदार मंडळी (पाँडेचेरी – प्रकरण) बलात्कारासारख्या गुन्ह्याखाली चौकशीपात्र होतात तेथे अरब राष्ट्रात प्रचलित असलेला 'हात–पाय–तोड कायदाच' योग्य आहे, असे कोठल्याही सात्त्विक माणसास वाटणार नाही काय? आणि मग जर असे वाटले की या गोंधळापेक्षा इंदिरा गांधीच काय पण कुणीही छडीवाला बरा तर काय हरकत आहे; पण नाही? असे बोलायचीही चोरी, कारण मग त्याने आमच्या धंद्यावर परिणाम होतो. (लोकशाहीतही) असो. वाटले तर ही ओकारी छापा व बघा इतर अनेकांची सहमते आपल्याला मिळतील.

पुणे आ. स. उपळेकर

◻ शनिवारीच आपला अंक हाती आला. 'जनमतकौल' भरून देण्यासाठी म्हणून हातात घेतला आणि वाटलं आणखी काही मित्रांनाही सोबत घेता आलं तर बरं; पण आपल्याकडून सुटचा जनमतकौलपत्रिका मागवून घेऊन त्या वेळेवर पाठविण्याइतका वेळ नसल्याने आपल्या परवानगीशिवाय येथेच चक्रमुद्रित करून घेतल्या व मित्रांना दिल्या. पूर्ण केलेल्या पत्रिका सोबत पाठवीत आहे त्यांचा स्वीकार व्हावा.

प्रश्नावलीव्यतिरिक्त माझं स्वतःच मतप्रदर्शन पुढीलप्रमाणे—

वर्षानुवर्षांची मक्तेदारी असलेले एक पक्षीय सरकार जाऊन तेथे लोकशाहीप्रधान शक्तींचे संमिश्र सरकार येणे हीच मुळात एक महत्त्वपूर्ण घटना होय आणि ज्या परिस्थितीत म्हणजे हुकूमशाहीच्या जखमा अजून ओल्या असताना व पुन्हा एकवार हुकूमशाहीशक्ती डोके वर काढीत असताना हे सरकार उभे रहाणे ही तर काळाचीच गरज मानायला हरकत नाही. थोड्या वेगळ्या शब्दांत म्हणायचे तर आपल्या शत्रूचा शत्रू हा आपला मित्र या नात्याने इंदिरा गांधी आणि काँग्रेस (इं.) च्या रूपाने पुन्हा एकदा हुकूमशाही या देशातल्या लोकशाहीला आव्हान देत असताना हे सरकार हा त्यावर उपाय आहे आणि या सत्तान्तराच्या निमित्ताने इंदिरा-काँग्रेस बळकट होईल हेही काही खरे नाहीय. एकदा बाईला गजाआड जाऊ द्या, की मग पहा येनकेनमार्गाने खुर्चीसाठी एकत्र जमलेली हो कोल्ही-कुत्री कशी सैरावैरा पळतात ती! असेही धरले की या घटनेमुळे बाईंचा पक्ष बळकट होईल तर आज विकलांग अवस्थेत असणाऱ्या साहेब काँग्रेसमधील वायलर रवी, विनायक पाटील, प्रियरंजन मुन्शीसारखे तरुण रक्त आणि ज्यांनी बाईंच्या एकाधिकारशाहीचे चटके सोसलेयत ते सारे बाईंच्या

काँग्रेसमध्ये जाण्यापेक्षा 'जनते'ला साथ देणेच पसंत करतील.

मुंबई **पां. सि. वाडकर**

□ १९७७ साली दुसरे स्वातंत्र्ययुद्ध झाले आणि प्रामाणिक लोकशाहीचा खरा विजय झाला. वाटलं होतं की, आता खरोखर प्रगतीच्या मार्गाने जनतेची वाटचाल सुरू होईल, परंतु गेल्या पंधरा महिन्यांच्या अनुभवाने असे वाटते को, आपण मृगजळामागे तर धावत नाही ना? अर्थात हे मान्य करावयास हवे की, तीस वर्षांची कीड एका दिवसात नष्ट होणार नाही; परंतु कीड नष्ट होण्यासाठी जे उपाय आपण करतो ते खरोखर उद्वेकजनक आहेत. असेच थातुरमातुर उपाय योजले तर कीड नष्ट न होता तिचा पसारा पहिल्यापेक्षा जास्त वेगाने दुप्पट होईल. याची प्रचिती आलेली आहे. वरील मत विशेष एका प्रश्नासंबंधी नसून सर्वंकश आहे.

महाराष्ट्रातील राजकीय मंचावरील नवीन प्रयोग म्हणजे दुसऱ्या स्वातंत्र्यलढ्यात ज्यांनी आत्मसमर्पण केले त्यांची एक प्रकारे घोर विटंबना करण्यासारखेच आहे. ज्यांनी एके काळी इमारत पाडण्यात अटीतटीने पुढाकार घेतला त्यांनाच आज इमारतीचा मुख्य नेमावयाचे! खरोखर हा खेदजनक प्रसंग आहे.

मुंबई **माधव देशपांडे**

□ महाराष्ट्रातील जनता पक्षाचे शरद पवारांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सदस्यांच्या मदतीने बनविलेले मंत्रिमंडळ 'स्थिर' व 'कार्यक्षम' शासन करू शकेल असे वाटत नाही. दादांचे मंत्रिमंडळ कोसळणे आवश्यक होते; पण त्यानंतर राष्ट्रपतिशासन आणि फेरनिवडणुकांच्या मार्गे नवीन सरकार येणे उचित ठरले असते. पण एस. एम्. जोशी, यशवंतराव चव्हाण, उत्तमराव पाटील, वसंतदादा, शरद पवार, मधु लिमये यापैकी कोणाचीही जनतेपुढे जाण्याची तयारी नाही. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे या सर्वांनी तशी कबुलीच दिली आहे. सध्याच्या सरकारात जो तो वेळ काढण्याचा प्रयत्न करील. राजकीय वलय निर्माण करण्यासाठी काही कार्यक्रमाची घोषणाही केली जाईल. कापूस-एकाधिकार खरेदीची घोषणा करण्यात आलीच आहे. श्रीमंत शेतकरी आणि तथाकथित 'पुरोगामी' पत्रकारांना यामुळे आनंद होईल. योजनेतील त्रुटी दूर न करता योजना राबविली जाईल.

राज्यांच्या अर्थसंकल्पांच्या त्रुटी भरण्यासाठी शेतीवर कर बसविणे आवश्यक आहे. सक्तीचे कुटुंबनियोजन या अशक्त व अस्थिर सरकारकडून कार्यवाहीत येणे अशक्य आहे.

मुंबई **श्रीनिवास कलंत्री**

□ आगर ह्या तीन हजार लोकवस्तीच्या एका खेड्यात 'माणूस' अतिशय आवडीने वाचला जातो. गत एक तपापासून 'माणूस' ह्या गावी येत आहे.

आधुनिक सुधारणांपासून अनेक वर्षे दूर असलेल्या या लहानशा खेड्यात छापील पत्रिका (जनमतकौलासंबंधी) उपलब्ध होऊ शकत नव्हत्या. वेळही कमी होता. सबब 'जनमतकौल पाच प्रश्नां'च्या हस्तलिखित १८ प्रती तयार करून घेऊन भरून पाठविल्या आहेत. कृपया त्या विचारात घ्याव्यात.

आगर **ह. वा. सांगळोदकर**

□ नवीन मंत्रिमंडळाच्या बनावात आम्हाला खालील गोष्टी अयोग्य वाटतात.

जनता पक्षानं अतिशय दुय्यम स्थान स्वीकारले.

निवडून आलेल्या आमदारांच्या प्रमाणात मंत्रिपदे दिली नाहीत.

'बंडखोरी केली की मंत्रिपदाचं बक्षीस मिळतं' असं वाटावं अशा तऱ्हेनं मंत्रिपदं दिली गेली.

पक्षांतराला उत्तेजन केवळ सत्तालालसेनं दिलं गेलं.

अकलूज **डॉ. सौ. कांचन गांधी**
**डॉ. रमण गांधी**

□ माननीय श्री. शरद पवार यांना सर्व परिस्थितीची आधीच जाणीव होती मग ते दादा-मंत्रिमंडळांत गेलेच का? सुरुवातीलाच जर वेळखाऊ धोरण जनता पक्षाने अवलंबिले नसते व सरकार स्थापन झाले असते तर मा. श्री. शरद पवार यांनी जनता सरकारला पाठिंबा दिला असता काय? आम्ही सहकारातील भ्रष्टाचार खणून काढू अशी डरकाळी फोडण्यात आली आहे. माननीय श्री. यशवंतराव मोहिते सहकारमंत्री असताना त्यांनी सभागृहात वेळोवेळी जे आकडे सांगितले त्यांची गणती जवळ जवळ ४६ करोड रुपये होते. याशिवाय अन्य भानगडी वेगळ्याच! याच्या पाठीशी असणाऱ्या, या भानगडींना दडपून टाकण्यासाठी जिवाचे रान करणाऱ्या, अनेक बरे-वाईट मार्ग अनुसरणाऱ्या व्यक्तींवर खरोखरच कारवाई करणार काय? आता मंत्रिमंडळ जाहीर झाले आहे. अनेक शिष्टमंडळे अमक्याला घ्या, तमक्याला घ्या असे सांगत आली होती. त्यांच्या मुखंडाचे उपद्रवी मूल्य आता वर येईल. ती एक नस्तीच डोकेदुखी जनसामान्याला सहन करावी लागेल. 'धरले तर डसते व सोडले तर पळते' अशी स्थिती होईल व ठेचून टाकण्याची तर शक्ती नाही. त्यामुळे सर्वसाधारण माणूस घायकुतीला येईल. यातूनच इंदिरा काँग्रेस भरभराटीला येईल. पैशांनी विकत घेतली जाणारी ध्येयहीन, कोठेही निष्ठा नसलेली, सुसंस्कार नसलेली माणसे दुखावली गेली म्हणजे आपले हिडिस स्वरूप उघडे करतात, हवे त्याला हाताशी धरून आपला दरारा, मूल्य वाढवून घेतात. त्यांना आता संधी मिळेल. 'हमारे साथ आवो, हम आपको मुहमाँगा इनाम देंगे', याची आता साथच उसळेल. अस्थिर जीवनाची ही नांदी आहे असे मला वाटते व या अस्थिरतेतूनच इंदिरा काँग्रेस वर येईल.

बहुमताने कारभार करणे, स्वमनाने कारभार करणे व कुबड्या घेऊन धावणे यासारखा हा फरक आहे. पोत्यात पाय घालून धावण्याची शर्यत जनता पक्ष महाराष्ट्रात खेळत आहे. पोते पायांत अडकले तरी पडणार, न अडकले तरी शर्यत हरणार, असे मला तरी वाटते.

अमरावती **वसंत दिगंबर कुलकर्णी**

□ सध्या पुण्यपावन मुंबईनगरीत सुविख्यात लोकनाट्यकलाकार शरद बारामतीकर (लोकशाहीर ऊर्फ पूर्वीचे इंदिराशाहीर यशवंतरावजी कऱ्हाडकर यांचे पट्ठे) व त्यांचे जनता पक्षातील इतर सुविख्यात कलाकार यांची तुफान व बेफाम संगीतबारी

विधानसभा नाटयगृहात सुरू झाली आहे. खास गोष्ट म्हणजे पंधरा दिवसांपूर्वीच याच नाटयगृहात चालू असलेल्या वसंतदादा सांगलीकर (इंदिरापदकविजेते) यांच्या बारीत शरद बारामतीकर ढोलकीवादन करीत होते व आज तेच शरद बारामतीकर सांगलीकरांच्या समोर आपल्या नवीन बारीचे संयोजन करीत आहेत.

समस्त महाराष्ट्रवासीयांना ह्या बारीतर्फे जाहीररीत्या कळविणेत येते की, आपण आपले बहुमोल मत ह्या बारीस द्यावे व आपल्या करमणुकीची संधी द्यावी. आल्यासारखे निदान चार-सहा महिने तरी आम्ही आपल्याला निर्भेळ करमणुकीची हमी देतो. बारीची खास वैशिष्टये म्हणजे 'इंदिरा विरोधी गवळण' दिलखेचक सत्तानृत्य व तुफान विनोदी वग 'राया मला खुर्चीवरून ओढू नका!'

तरी आजच ह्या बारीस भेट देऊन आपली निराशा टाळा. (उद्या राहील की नाही शंकाच!)

टीप: कुजके टॉमटो व नासकी अंडी ह्यांचे अधिकृत विक्रेते श्री. जांबुवंतराव धोटे असून नाटयगृहाबाहेर हे पदार्थ फुकट देण्यात येतील.

कोल्हापूर **राजेंद्र कुलकर्णी**

◻ सोबत जनमतकौलाचा कागद भरून पाठवीत आहे. इंदिरा गांधींनी आणीबाणीच्या काळात जे राज्य केले तसे पुन: येऊ नये ही बहुसंख्य नागरिकांची इच्छा नक्कीच आहे. इंदिरा गांधी म्हणतात की, जनता पक्ष हा त्यांचा शत्रू नं. १ तसे जनता पक्षाचा शत्रू नं. १ म्हणजे इंदिरा गांधी. त्यांना सत्तेपासून दूर कसे ठेवता येईल याचा प्रामुख्याने विचार केला पाहिजे. याकरिता जनतेने मा. शरद पवार यांच्या पुरोगामी काँग्रेसशी हातमिळवणी करून राज्य हस्तगत केले यात काहीच चूक नाही. रेड्डी काँग्रेसने इंदिरा काँग्रेसबरोबरचे संमिश्रसरकार मोडले; पण त्याचबरोबर विरोधी पक्ष म्हणून बसण्याची जी कोलांटी उडी मारली तो अजबच होती. अशा प्रकारे इंदिरा काँग्रेसबरोबर हातमिळवणी करण्याचाच तो दुसरा प्रकार होता. कारण जनता पक्ष एकटयाच्या पक्षाच्या जोरावर मंत्रिमंडळ बनवू शकत नव्हता व रेड्डी काँग्रेस बाहेरून जनता पक्षाला पाठिंबा द्यायला तयार नव्हती. म्हणजेच पुन: निवडणूक इत्यादी घोळ झाला असता. तेव्हा झाले हे चांगले झाले.

मा. मोरारजीभाई आणि मंडळी मूळची काँग्रेसची; पण बाईंनी स्वत:ला जेव्हासम्राज्ञी म्हणून घ्यायला सुरुवात केली व संजय, बन्सीलाल यांच्यासारख्या नालायक मंडळींना हाताशी धरून जो धुमाकूळ घातला तेव्हा ही मंडळी बाहेर पडली. तेव्हा काँग्रेसमधील पुरोगामी मंडळीशी हातमिळवणी करायला काहीच हरकत नाही.

'माणूस'च्या मागच्या आठवडयातील अंकामध्ये आपण राजस्तानभेटीबद्दल जे लिहिले आहेत तेच धोरण आता जनता पक्ष व पुरोगामी काँग्रेस यांनी अनुसरायला हवे. राज्यकर्ते कितीही चांगले असले तरी नोकरशाही ही चीज अजब आहे. याबाबत मध्यवर्ती सरकारतल्या एका मंत्र्यांनी एक मजेदार किस्सा सांगितला. ते म्हणाले, 'एक डॉक्टर होते व त्यांचे एक मित्र खेडेगावात रहात होते व ते एकदम आजारी झाले. डॉक्टरना निरोप आला व ते आगगाडीने खेडेगावाजवळच्या स्टेशनवर उतरले व तेथून टांग्याने अगर बैलगाडीने जायचे होते; पण घोडा आजारी असल्याने टांगेवाला यायला तयार नव्हता. डॉक्टरांनी दादा-बाबा करून दुसरा घोडा आणायला लावला व ते निघाले. टांगा थोडा गेला व थांबला. टांगेवाला उतरून घोडयाच्या पुढे आला व त्याने नाचाचा वेडावाकडा प्रकार केलान व आवाज काढलेन; मग हे घोडं थोडं आणखी पुढं गेलं व थांबलं. डॉक्टरनी विचारलं हा काय प्रकार आहे? तेव्हा टांगेवाला म्हणाला की, हे वरातीचं घोडं आहे. सुज्ञास जास्त सांगणे नलगे. तेव्हा कार्यकर्त्यांनी कंबर कसून सरकारी योजना खालच्या थरापर्यंत जातील हे पाहिले पाहिजे, तरच आपण लिहिलेत तसा विश्वास महाराष्ट्रात पण निर्माण होईल.

मद्रास **श्रीधर लिमये**

◻ पवार मंत्रिमंडळामुळे लोकशाही-शक्तींचे ध्रुवीकरण दृष्टिक्षेपात आले आहे असे वाटते. अर्थात ही घटना खुर्ची वाचविणे किंवा लोकशाही वाचविणे यातील कोणत्या Category त बसते यावर एवढयातच मतप्रदर्शन करता येणार नाही. ते फक्त काळच ठरवू शकेल.

नव्या मंत्रिमंडळामुळे इंदिरा काँग्रेस महाराष्ट्रात सत्तेपासून दूर गेली आहे; पण म्हणून हा बदल-बनाव लोकशाहीला उपकारक आहेच असे नाही. जगातील कोणतीही सत्ता भ्रष्टाचारापासून मुक्त नाही. 'जनता'ही याला अपवाद नाही. कदाचित भ्रष्टाचार-अत्याचारांची तीव्रता कमी होईल. संमिश्र मंत्रिमंडळाची सुरुवात भ्रष्टाचारानेच झाली असल्याने (एकीकडे पक्षांतरविरोधी ठरावावर चर्चा व दुसरीकडे 'किस्सा कुर्सीका' हा प्रचंड विरोधाभास) ही भीती साधार आहे.

इंदिरा काँग्रेसच्या बळकटीचे गुपित नानी पालखीवालांच्याच भाषेतील तथाकथित Intelligence of illiterate किती प्रमाणात झुकतो आणि Illiteracy of Intelligent किती प्रमाणात वाढते यावरच अवलंबून आहे. सत्तेवरील इंदिरा काँग्रेस-कार्यकर्त्यांनी काही चमत्कार केल्याचे ऐकिवात नाही. शिवाय इंदिरा काँग्रेस ही सध्या 'इंडिया बचाओ' कार्यक्रमात व्यग्र असल्याने त्यांच्याकडे लोकांपर्यंत पोहोचेल असा कार्यक्रम कार्यवाहीत आणण्याची क्षमता नाही. म्हणूनच इंदिरा काँग्रेस बळकट होणार नसली तरीही ती अशक्त होणार नाही.

खुर्चीप्रधान राजकारणामुळे व काही नेत्यांच्या आततायीपणामुळे 'जनता'ची प्रतिमा मात्र निश्चितपणे डागळली आहे. (अर्थात त्याच वेळी दिल्ली आणि आसपास घडलेल्या संगीत 'मानापमान'चा हिस्साही फार मोठा आहे.)

ठाणे **किशोर दीक्षित**

◻ या (मंत्रिमंडळाच्या) स्थापनेमुळे जनता पक्षाची प्रतिमा डागळली आहे या उत्तराचे विवेचन मला करावेसे वाटते.

जनता पक्षाची सभासदसंख्या इतर गटांच्या मानाने जास्त असतानासुद्धा एका संख्येने अल्प असलेल्या गटाचा प्रतिनिधी मुख्यमंत्री व्हावा, ही घटनाच मुळी जनता पक्षाच्या दृष्टीने लाजिरवाणी आहे.

मला तर असे वाटते की, शरद पवारांनी आपणांस मुख्यमंत्रिपद मिळेल अशी पूर्णपणे

खात्री झाल्यावरच या सरकारस्थापनेस आपला पाठिंबा जाहीर केला असावा. वास्तविक पहाता जनता पक्षासारख्या बलाढ्य पक्षानेच बाजू ताणून धरावयास पाहिजे होती व आपला प्रतिनिधी मुख्यमंत्रिपदावर विराजमान करावयास पाहिजे होता. असा हट्ट धरला असता तर श्री. शरद पवार देखील तिरपुडेयांच्या जागी उपमुख्यमंत्री म्हणून बसावयास तयार झाले असते. म्हणून जरी कॉंग्रेसला महाराष्ट्रातून हटविलेले असले तरी हासुद्धा जनता पक्षाचा नैतिक पराभवच झाला आहे, असे मला वाटते.

पुणे — नंदू उंडे

□ महाराष्ट्रात संमिश्र पवार मंत्रिमंडळ येणे ही घटना मला अयोग्य वाटते. राष्ट्रीय राजकारणावर दूरगामी परिणाम करणारी ही घटना आहे. या युतीमध्ये कुठलेही तात्त्विक अधिष्ठान नाही. चव्हाण-कॉंग्रेसबरोबर युती करायचीच होती तर ती विधानसभा निवडणुकीनंतर लगेच व्हावयास हवी होती. म्हणजे त्यात आजच्या एवढा संधिसाधूपणा दिसला नसता. चार-सहा महिने ज्या लोकांच्या धोरणांवर रोज तुम्ही टीका करता त्यातीलच काही लोक अतिशय लोकशाहीप्रेमी असल्याचा साक्षात्कार जनता पक्षाला एका रात्रीत होतो, हे सामान्य माणसाच्या आकलनशक्तीपलीकडचे आहे. सर्वच पक्ष कॉंग्रेसप्रमाणे सत्तालोलुप, सौदेबाजी करणारे, तत्त्वहीन राजकारण करणारे आहेत अशी समजूत होऊन सामान्य माणसाचा लोकशाहीवरील विश्वास लवकरच उडाला तर आश्चर्य वाटावयास नको !

या घटनेमुळे जनता पक्षाची प्रतिमा डागाळली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर जनता पक्षास जे तात्त्विक अधिष्ठान प्राप्त झाले होते ते आज नष्ट झाले आहे. सत्तेसाठीच हे लोक एकत्र आले आहेत यात शंकाच नाही. विधानसभेत बहुमत हवे म्हणून अल्पसंख्य गटास मुख्यमंत्रिपद द्यावे लागणे हा राजकीय सौदा झाला. राजकारणी पुरुष वारांगनेप्रमाणे आहेत असे म्हणतात. जास्त पैसे मिळवून देणाऱ्या गिऱ्हाइकाबरोबर शय्यासोबत करायची तसाच हा सौदा आहे. मुख्यमंत्रिपद मिळताच पलीकडे उडी मारली. श्री. पवार जर खरोखरच लोकशाहीप्रेमी होते तर इंदिरा-कॉंग्रेसबरोबरच्या संमिश्र मंत्रिमंडळात त्यांनी सामील न होणे संयुक्तिक दिसले असते. लोकशाहीसाठी कुठलाही त्याग करावयाचा नाही; पण सत्ता मिळविताना 'आम्ही लोकशाहीचे रक्षक आहोत' असा आव आणावयाचा; हे सारे ढोंग आहे.

आम्ही जनता पक्षास कॉंग्रेसच्या सरंजामशाहीने जी डबकी तयार केली आहेत, जातीयवादाची जी बीजे तालुका पंचायतीपर्यंत पेरली आहेत ती नष्ट करण्यासाठीच निवडून दिले होते. त्याच कॉंग्रेसजनांशी हातमिळवणी करून सहकारक्षेत्रातील भ्रष्टाचार कसा निपटून टाकणार ? मग त्या सत्तेचा उपयोग काय ? श्री. पवारांचा गट हा लोकशाहीप्रेमी लोकांचा गट नाही. दादांच्या मंत्रिमंडळात स्थान न मिळालेला असंतुष्ट लोकांचा हा गट असल्याने या मंत्रिमंडळास फार स्थैर्य लाभेल असे वाटत नाही.

पवारसाहेबांचे विविध क्षेत्रांतील अनेक चांगले लोक मित्र आहेत. ते 'बिचारे' या घटनेस 'तात्त्विक-अधिष्ठान' देण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांची कीव येते. झाले ते राजकारण संधिसाधुपणाचे झाले, हे प्रत्येक सुबुद्ध माणसाने मान्य करायलाच हवे.

या मंत्रिमंडळाने राज्यातील इंदिरा कॉंग्रेसची संघटना थोडी-फार कमकुवत होईलही. कारण त्यातील बरेचसे सत्तालोलुप लोक आता पक्ष सोडतील; परंतु इंदिरा गांधींची जनमानसात असलेली वैयक्तिक लोकप्रियता कमी होईल असे वाटत नाही.

मुंबई — डॉ. विजय बर्वे

□ श्री. शरद पवारांबरोबर पुरोगामी आघाडी स्थापन करून जनता पक्षाने माझ्यासारख्या जनता पक्षाच्या चहात्यांना सुखद धक्का दिला. तत्त्व ह्या दृष्टीने बऱ्याच मंडळींना हा प्रकार चुकीचा वाटला. बरीच मंडळी नाराजी व्यक्त करीत आहेत; परंतु ध्रुवीकरण वगैरे जे काय राजकारणाच्या संदर्भात प्रकार ऐकू येतात, तसेच व्यावहारिक तडजोड ह्या दृष्टीने सध्याच्या घटनेकडे पाहिले असता हा प्रयोग स्तुत्य आहे; असे वाटते.

एका दिशाहीन पक्षाच्या गलथान राजवटीपेक्षा तसेच राष्ट्रपति राजवटीत भरभराटीस येणाऱ्या नोकरशाहीच्या बजबजपुरीपेक्षा अनेक विधायक कार्यक्रम लोकांपुढे ठेवून लोकांचा कौल घेऊन निवडून आलेल्या समविचाराच्या पुरोगामी आघाडीचे सरकार नक्कीच चांगले होय.

मुंबई — डॉ. एन्. एम्. भगत

□ राजकीय नवीन घडामोडीमुळे जनता नाराज आहे. एक वर्षापूर्वी ज्या जनता पक्षाला जनतेने बहुमताने निवडून दिले त्याच पक्षाने जनतेची निराशा केली, ही गोष्ट खेदजनक आहे. जनता पक्षात चाललेल्या घडामोडींमुळे जनता पक्षाची ज्यांनी निर्मिती केली, ते श्री. जयप्रकाश नारायणसुद्धा जनता पक्षाच्या कारभारामुळे नाराज आहेत.

कॉंग्रेसमधून फुटून एक गट तयार करणारे शरद पवार व त्यांना साथ देणारे जनता पक्षाचे नेते, म्हणजे सत्तेसाठी धडपडणारे नेते. वेळ पडल्यास ते कोणाला जवळ करतील हे सांगता येत नाही. याला कारण जनता पक्षाजवळ ध्येय–धोरण असे काही सुद्धा नाही.

कॉंग्रेस आणि कॉंग्रेस ( आय )चे संमिश्र सरकार करताना कॉंग्रेसने कॉंग्रेस (आय )ला सरकारात यायला भाग पाडले आणि आता त्यांच्याशी संबंध नको असे म्हणणारे त्या वेळी त्या भागीदारीत वाटा घ्यायला तयार होते व आता मुख्यमंत्री होण्यासाठी स्वपक्ष फोडायला तयार झालेले शरद पवार यांनी पक्षाची कोणती हुकूमशाही वाचविली ?

शरद पवार मंत्रिमंडळामुळे कॉंग्रेस आयला अधिक फायदाच होणार आहे. कारण त्यांनी सत्तेची लालसा ( महाराष्ट्रात ) तरी ठेवली नव्हती. त्यामुळे त्यांचे काहीच नुकसान होणार नाही. उलट त्यांची प्रतिमा उजळेल. कारण जनता पक्ष सत्तेसाठी किती हपापला आहे हे दिसते. कॉंग्रेस ( चव्हाण )-मध्ये काहीसुद्धा राम नाही, हे गेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये स्पष्ट झाले आहे.

या घटनेमुळे जनता पक्षाला अधिकच संकटांना तोंड द्यावे लागेल. कारण श्रेष्ठ नेत्यांमध्ये भांडणे सुरूच आहेत. चंद्रशेखर यांचे शरद पवार मंत्रिमंडळाला आशीर्वाद आहेत तर अनेक नेते विरोधात आहेत.

अकोला — कु. सुनिता शं. मानकर

□ आणीबाणीच्या काळ्याकुट्ट पार्श्वभूमीवर जेव्हा जनता पक्षाचा जन्म झाला तेव्हा सामान्य जनतेच्या नव्या पक्षाकडून फार मोठ्या अपेक्षा होत्या. त्या सर्व अपेक्षामध्ये काही अत्यंत ठळक अशा होत.

१) आणीबाणीत हिरावलेल्या व्यक्तिस्वातंत्र्याची पुनर्स्थापना होणे, वृत्तपत्रे न्यायालये स्वायत्त होणे वगैरे.

२) मुख्य म्हणजे ज्या प्रकारचा भ्रष्टाचार काँग्रेस सरकारमध्ये बोकाळला होता व सत्तेमुळे ज्या भ्रष्टाचाराचे समर्थन ज्येष्ठ काँग्रेस-मंडळी सहज करू शकत होती त्या वृत्तीचाच ह्या देशातील सामान्य माणसाला वीट आला होता.

त्यामुळे जयप्रकाशजींच्या आशीर्वादाने जन्माला आलेला हा पक्ष काही तरी किमान नैतिकता बाळगून असेल अशी अपेक्षा होती आणि ही विश्वासार्हता आजच्या शासनाने अत्यंत थोड्या अवधीत गमावली ही खरी शोकांतिका आहे.

पक्षांतर्गत भांडणे, इंदिराजींबद्दल काय करायचे ते त्वरेने न करता लोकांसमोर स्वतःची फजिती करून घेणे व सत्तेसाठी काँग्रेसने तीस वर्षांत जे जे केले ते केवळ दीड ते दोन वर्षांच्या कालावधीत करणे यासारख्या कारणांनी जनता पक्षाबद्दल लोकांचा भ्रमनिरास होण्यास सुरवात झाली आहे असेच म्हणावे लागेल.

महाराष्ट्रापुरते बोलायचे तर जनता व काँग्रेसच्या एका गटाचे संमिश्र सरकार ही लोकशाहीरक्षणाच्या गोंडस नावाखाली दोन्ही गटांनी केलेली हातमिळवणी आहे. जनता पक्षांतर्गत पक्षांना एकमेकांबद्दल एवढा हेवा वाटत असेल असे वाटले नव्हते.

खरा प्रश्न असा की, उद्या हे संमिश्र सरकार ह्या आघाडीने यशस्वीरीत्या चार वर्षेपर्यंत टिकविले तर नंतरच्या निवडणुकीत जनता पक्ष व पुरोगामी काँग्रेस पक्ष लोकांसमोर कोणत्या भूमिका घेणार ? की, महाराष्ट्रापुरती ही आघाडी कायमची आमच्या मानगुटीवर बसणार ? इंदिरा काँग्रेसच्या भीतीच्या नावाखाली सत्तेसाठी केलेल्या ह्या युतीने सामान्य सुशिक्षित माणसाचे डोके सुन्न केले आहे.

मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करण्यासाठी नव्या मंत्रिमंडळाने ज्या त्वरेने मान्यता दिली आहे त्यावरून अल्पसंख्याकांचे लाड पुरविण्यात ही आघाडी देखील आजवरच्या आघाड्यांना मागे टाकणारी ठरेल अशी ग्वाहीच मिळाली आहे.

अल्पसंख्यांकांना भूतलावर कुठेही भारताप्रमाणे स्पेशल कायदे वगैरे नाहीत. अल्पसंख्यांकांमधील कित्येक गटांची संख्या प्रचंड वाढून बाकी समाज अल्प झाला तरी चालेल, अशीच दुर्दैवी भूमिका आजवर घेतली गेली आहे व नवे महाराष्ट्र सरकार तीच ठेवा गौरवाने पुढे नेणार आहे. त्यांना सुयश चिंतिणे एवढेच आमचे कर्तव्य !

पैठण — डॉ. बी. व्ही. महाजन

□ महाराष्ट्रात काँग्रेसची राजवट गेल्यामुळे एसेम्‌सह सर्वांना आनंद होणे सहाजिक असले तरी खऱ्या अर्थाने काँग्रेस राजवट गेलेली नाही. शरद पवारांच्या अल्पगट असलेल्या विधिमंडळ काँग्रेसला बहुमत असलेल्या जनता पक्षाने पाठिंबा देऊन, शरदरावांचे नेतृत्व मान्य करून, सुरवातीस दाखविलेल्या बावळटपणाची थोडी-फार भरपायी केली आहे.

एसेम्‌ त्या वेळी म्हणाले होते की, सध्या मी राजकारण करतो आहे, तरी अडचणीचे प्रश्न मला सध्या विचारू नका. राजारामबापू, शंकरराव चव्हाण यांना बरोबर घेऊन पावले टाकलीत, ती नाइलाज म्हणून जनता मान्य करील; पण एवढ्या घाईने गुडघ्याला बाशिंग बांधून शरदरावांचे नेतृत्व मान्य करण्यात ना तत्त्व, ना निर्भेळ राजकारण !

मला तर प्रामाणिकपणे वाटते की, यशवंतराव शरदरावांचेमार्फत दुहेरी डाव टाकून राहिले आहेत. शरदरावांच्या या कृतीमुळे इंदिराबाईंचे अखिल भारतीय महत्त्व कमी झाले तर इंदिरा नको म्हणणारे सर्व जुने काँग्रेसवाले एक होतील-अगदी जनता पक्ष फोडून ! आणि इंदिराबाईंवर त्याचा काहीही परिणाम झाला नाही तर यशवंतराव-शरदराव सरळ 'जनता'मध्ये घुसून महत्त्वाच्या जागेवर दिसतील, कारण मोरारजी देसाई पंतप्रधान आहेत !

अर्थात राजकारण काय वळण घेईल ते काहीच सांगता येत नाही. आम्ही आपले सामान्य मतदार लोकशाहीच्या संकेतानुसार एकदा मत देऊन बसलो, आता पाच वर्षांनी येणाऱ्या मताधिकाराची वाट पहात बसायचे! दुसरे काय-कप्पाळ !

ठाणे (पूर्व) — सु. वि. मुळे.

□ जनता पक्षाचा एक अत्यंत चाहता म्हणून जनता पक्षाच्या लोकांना सत्ता मिळाली म्हणून जरी आनंद वाटत असला तरी लोकशाहीनिष्ठ पक्ष म्हणून जनता पक्षाने जनमानसात प्रतिष्ठा मिळविली असे वाटते. गेली तीस वर्षे काँग्रेस पक्षाने जे सत्तेचे राजकारण कोणतेही विधिनिषेध न पाळता केले ते कटाक्षाने जनता पक्षाने टाळले असे वाटते होते. महाराष्ट्रातल्या संमिश्र मंत्रिमंडळामुळे या भावनेला तडा गेला याचे अत्यंत दुःख होत आहे. महाराष्ट्रात राष्ट्रपतिराजवट झाली असती तर काय आकाश कोसळले असते ? जनता पक्ष म्हणजे स्वार्थी, संधिसाधू, आयाराम-गयारामचा पक्ष नव्हे ही जनमानसातील भावना पक्षश्रेष्ठींनी जपावी हीच अपेक्षा. कळावे. जनमत कौल उपक्रमाबद्दल अभिनंदन.

चिकोडी — चं. धों. कुलकर्णी

□ महाराष्ट्रात झालेले सत्तान्तर ही राजकीय क्षितिजावरील एक महत्त्वपूर्ण घटना आहे. तरुण होतकरू रक्ताला वाव मिळालेला आहे. या घटनेमुळे आम्हा सीमावासियांना एक नवीन आकांक्षा निर्माण झाली. या सत्तान्तरामुळे कर्नाटकी बेड्या आमच्या हातातून निखळून पडतील अशी आशा निर्माण झालेली आहे.

म्हसोबा हिटणी (ता. हुक्केरी) — बाबासाहेब बं. पाटील

□ आपल्या 'जनमतकौल'मधील प्रश्नांची उत्तरे मी आपल्या नियमानुसार म्हणजे 'फक्त हो किंवा नाही'च्या स्वरूपात दिलेली आहेत; पण ती उत्तरे अपूर्ण आहेत. उदा. प्रश्न १ चे उत्तर मी 'अयोग्य वाटते' असे दिले आहे. पण याचा अर्थ असा नाही की, मला दादांचे मंत्रिमंडळ नामशेष झाल्याबद्दल हळहळ वाटते किंवा दादांचे मंत्रिमंडळ लोकशाहीला उपकारक होते. तेव्हा माझा कौल कौल मी खाली देत आहे.

म्हणे शरद पवार आणि त्यांचे समर्थक

यांना इंदिरा कॉंग्रेसच्या हुकूमशाहीला विरोध करण्यासाठी आणि लोकशाही बळकट करण्यासाठी जनता पक्षाचे सहकार्य हवे होते आणि ते त्यांनी स्वतःचे मंत्रिमंडळ बनवून अखेर घेतलेही; मग जनता पक्षाच्या मंत्रिमंडळाला पाठिंबा देऊनही त्यांना हे उद्दिष्ट साधता आले असते. पण नाही, त्यांना स्वतःची खुर्ची बळकट करावयाची होती !

खरे तर 'इंदिरा' ह्या नावाचा (भीतियुक्त प्रभाव) त्याच वेळी काळाच्या आड नाहीसा झाला ज्या वेळी त्या नावाचा निवडणुकीत पराभव झाला आणि मला तर वाटते की, हे नाव वृत्तपत्रांतून उगाच पुन्हा पुन्हा उच्चारून त्या नावाला आपणच महत्त्व प्राप्त करून देण्यासारखे आहे. तेव्हा इंदिरा कॉंग्रेस म्हणा वा हुकूमशाही म्हणा, त्याबद्दल उगाच भय बाळगण्याचे काहीच कारण नाहीय. श्री शरद पवार इंदिरा कॉंग्रेसच्या हुकूमशाही प्रवृत्तीविरुद्ध लढू इच्छितात (मंत्री होण्याआधी) या विधानाला काहीच अर्थ नाही आणि शरद पवार एवढे शूर (?) लढवय्ये होते तर जेव्हा प्रत्यक्ष लढाई चालू होती तेव्हा ते रणभूमीवर का उतरले नाहीत? आणि लढाई संपल्यानंतर शत्रू पूर्णपणे पराभूत झाल्यानंतर, घायाळ झाल्यावर मेलेल्याला आणखी मारण्यात काही अर्थ नाही !

या सत्तान्तरामुळे टिळक–गांधी यांची कॉंग्रेस संपली, अशी हास्यास्पद प्रतिक्रिया व्यक्त करणाऱ्या विद्वानांची तर अक्षरशः कीव येते. म्हणजे या विद्वानांना असे म्हणायचे आहे काय की स्वातंत्र्यानंतर २५–३० वर्षे जी कॉंग्रेस देशामध्ये नंगा नाच घालीत होती ती कॉंग्रेस टिळक–गांधी यांना अपेक्षित होती? टिळक–गांधी कॉंग्रेस तेव्हाच संपली होती जेव्हा गांधींनीच कॉंग्रेस बरखास्त करायला सांगितली होती, पण दुर्दैवाने गांधींचे म्हणणे कोणीच ऐकून घेतले नाही आणि भारताच्या दुर्दैवाने कॉंग्रेस काही नामशेष झाली नाही !

जेव्हा केन्द्रामध्ये जनता पक्ष बहुमताने निवडून आला त्या वेळेला राजकीयदृष्ट्या जागरूक असलेल्या देशातील माझ्यासारख्या सर्वसामान्य नागरिकाच्या चेहऱ्यावर आनंद आणि संतोषाची एक स्मित रेखा झळकून गेली होती. देशामध्ये पहिल्यांदा जनतेचे खरे प्रतिनिधी, (मोजके का होईना) की ज्यांना मीठ–भाकरी व गोधडी यांची जाण आहे, सामान्य माणसांच्या भावनांची ओळख आहे, असे श्री. मोरारजीभाई, श्री. बाजपेयी, श्री. फर्नांडिस, श्री. दंडवते, श्री. सुब्रह्मण्यम् व चंद्रशेखर यांच्यासारखे नेते सत्तेवर आले होते. किंबहुना मी तर असे म्हणेन की, पहिल्यांदाच भारतीय राजकारणात बुद्धिवादाचा विजय झाला होता !

लोकसभेच्या निवडणुकीनंतर विधानसभेच्या निवडणुकीतसुद्धा बहुतेक प्रांतात जनता पक्ष निवडून आला. तीच अपेक्षा महाराष्ट्रात सुद्धा होती. पण जेव्हा निवडणुकीत इंदिरा कॉंग्रेस, दुसरी कॉंग्रेस (चव्हाण कॉंग्रेस म्हणा हवे तर) यांचे उमेदवार अपेक्षेपेक्षा जास्त संख्येने निवडून आले तेव्हा तोच जागरूक नागरिक पुन्हा अस्वस्थ झाला, पार गोंधळून गेला, त्याची झोप उडाली! तरी पण त्याला थोडीफार आशा होती की, जनता पक्ष मित्रपक्षांच्या सहाय्याने स्वतःचे मंत्रिमंडळ बनवील; पण ती आशा जनता पक्षाने मालवून टाकली. हा महाराष्ट्र जनता पक्षाचा पहिला पराभव होता; पण आता तरी जनता पक्षाने स्वतःच्या पायावर मंत्रिमंडळ बनविण्याची जबाबदारी उचलायला हवी होती. तीही जबाबदारी जनता पक्ष पेलू शकला नाही. त्याने नव्या शरद सरकारमध्ये दुय्यम भागीदारीचे स्थान मोठ्या आनंदाने स्वीकारले, नव्हे मोठी धन्यता मानली. इथे जनता पक्षाचा दुसरा व शेवटचा पूर्ण पराभव झाला. म्हणजे गांधींसारखीच एस्. एम्. जोशींची अवस्था झालीय आणि हा पराभव जनता पक्षाचा नसून त्या सामान्य पण जागरूक मनाचा आहे व ह्या अस्वस्थ मनातली जनता पक्षाची जी उरलीसुरली पुसटशी प्रतिमा शिल्लक होती, ती पूर्णपणे कोळवंडली आहे! आपल्या देशात पक्षांतर व सत्तांतरही इतकी स्वस्त व बाजारू बाब होऊन गेलीय की, सामान्य माणसाचा लोकशाही राजकारणावरील विश्वासच उडावा. केव्हा केव्हा मनात प्रश्न येतो की, इथल्या विद्वानांना (?) राजकारणाचा हाच अर्थ अभिप्रेत असावा काय? तेव्हा सत्तेच्या सिंहासनावरून एक राव जाऊन दुसरे पंत आले काय, सामान्य नागरिकाला त्याबद्दल काहीच हळहळ नाहीय. चिंता मात्र जरूर आहे— त्याच्या स्वतःच्या व राष्ट्राच्या भवितव्याची !

पुणे वसंत फेगडे

□ ३० वर्षांनंतर राज्यात झालेला बदल अनेक दृष्टींनी स्वागतार्ह आहे. संमिश्र मंत्रिमंडळ 'अपरिहार्य' म्हणूनच आले आहे, म्हणून ही राजकीय तडजोड मनःपूर्वक स्वीकारावयास हवी.

वसंतदादांचे भूतपूर्व मंत्रिमंडळही संमिश्रच होते. 'खुर्च्या संभाळणे' हा एक कलमी कार्यक्रम त्यांचेपुढे होता असेच भासत होते. ते पाडून व्यवहारी पर्याय स्वीकारणे हे लोकशाहीला कमी मारक किंवा त्या अर्थी उपकारक आहे.

या घटनेमुळे इंदिरा कॉंग्रेस बळकट होणार नाही. एक पक्ष म्हणून ('इंदिरा' कॉंग्रेस म्हणून नव्हे) ती बळकट होणार असेल तर ते स्वागतार्हच मानावे लागेल; पण तसे होणार नाही. कारण त्या पक्षात तळमळीचे कार्यकर्ते आहेत असे त्या पक्षाचे मित्रदेखील म्हणणार नाहीत. इंदिरा गांधींची प्रतिमा – उद्या अधिक डागळली तर मग पक्षांतर करण्याची फार मोठी लाट उसळेल.

जनता पक्षाची प्रतिमा उजळण्याजोगे पक्षकार्यकर्त्यांकडून काही होत आहे असे दिसत नाही. सरकार बनविल्यामुळे नव्हे तर आर्थिक सामाजिक कार्यक्रम यशस्वीपणे राबविल्याने प्रतिमा उजळण्याची शक्यता आहे.

आर्थिक कार्यक्रमांना जनता पक्षाने अग्रक्रम द्यावयास हवा. शेतीउत्पन्नावर कर बसविण्याचे धाडसी पाऊल उचलून व किमान वेतन ठरवून गरिबांसाठी ('खऱ्या अर्थाने') झटणारे सरकार जर होईल तर प्रत्येक खेड्यात पाण्याची सोय ते निश्चितपणे करील. पक्षाचा पाया त्यामुळे विस्तृत होईल, लोकप्रियता लाभेल व मग रोजगार हमी, कुटुंब–नियोजन, 'एक गाव एक पाणवठा' इत्यादि कल्याणकारी व पुरोगामी सामाजिक जडण-घडणीचे कार्यक्रम हाती घेणे इष्ट व सुलभ होईल.

मुंबई र. दा. पेंडसे

□ महाराष्ट्रातील सत्तान्तर ही स्वातंत्र्योत्तर काळातील एक महत्त्वाची राजकीय घटना आहे. महाराष्ट्रातील हे बिगरकॉंग्रेसचे पहिले मंत्रिमंडळ आहे, असे म्हणणे धाडसाचे आहे. मुख्यमंत्री शरद पवार व त्यांच्या

सहकाऱ्यांनी चार महिन्यांची मुदत मागितली आहे. मुख्यमंत्री पवार व त्यांच्या सहकाऱ्यांचा निर्णय हा सत्ताग्रहण करण्यावरच प्रामुख्याने आधारित होता. ना. पवारांना लोकशाही–मूल्याची चाड असती तर विधानसभा–निवडणुकीनंतर त्यांनी जनता पक्षाला जाहीर पाठिंबा द्यावयास पाहिजे होता. सत्तेला चिकटून राहणे हाच त्यांचा एक कलमी कार्यक्रम आहे, होता व राहील ! ना. पवारांनी लोकसभा-निवडणुकीत इंदिरा गांधींच्या हुकूमशाही प्रवृत्तीचे समर्थन केले. त्यानंतर इंदिरा काँग्रेसच्या संयुक्त मंत्रिमंडळात काम केले आणि त्या वेळी त्यांना मुख्यमंत्री व्हावयाचे होते व त्यासाठी त्यांना स्वातंत्र्य–लोकशाही मूल्यांची झालर हवी होती.

जनता पक्ष हा महाराष्ट्रातील सर्वांत मोठा पक्ष आहे. त्यांच्याजवळ स्वतःचा कार्यक्रम आहे. शे. का. पक्ष, महाराष्ट्र समाजवादी पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष हे जनताचे मित्रपक्ष त्या सर्वांचे कार्यक्रम वेगळे. त्यामुळे जनता पक्षाला स्वतःचा कार्यक्रम राबविणे अशक्य झाले आहे. जनता पक्षाची प्रतिमा जनमानसात तयार होण्यात अडचण होईल. १३ सभासद असलेल्या शे. का. पक्षाने ३ जागा मंत्रिमंडळात पटकाविल्या तर विधिमंडळातून बाहेर पडलेल्या ३८ काँग्रेस सभासदांनी १३ जागा मिळविल्या. इंदिरा गांधींच्या नावावर निवडून आलेल्या विदर्भातील २, आमदारांचा मंत्रिमंडळात समावेश झाला आणि १०४ सभासद असलेल्या जनता पक्षाने फक्त १४ जागा मंत्रिमंडळात मिळविल्या. हे गणित अन्यायकारक आहे. महाराष्ट्रातील ज्या जनतेने जनता आमदारांना मोठ्या संख्येने यशस्वी केले, त्या मतदारांच्या तोंडावर काँग्रेसचे १३ मंत्री फेकले गेले, ही अयोग्य तडजोड महाराष्ट्रात जनता पक्षाला महाग पडणार आहे !

कोपरगाव भास्कर जोशी

☐ महाराष्ट्रात दोन काँग्रेसचे संमिश्र मंत्रिमंडळ कोसळून त्या जागी जनता + मित्रपक्षाचे संमिश्र मंत्रिमंडळ आले. सत्तेसाठी तत्त्वहीन तडजोडी कशा होतात हे दिसून आले. १९६७ साली काँग्रेसची राजवट बऱ्याच राज्यांत कोसळली व सं. वि. द. सरकारे स्थापन झाली; परंतु केंद्रातील काँग्रेस सरकारने ती पाडली. त्या काँग्रेसपेक्षा आम्हीही वेगळे नाही हेच जनता पक्षाने दाखवून दिले.

आणीबाणीत व त्यानंतर आजपर्यंत पवारांना लोकशाही वाचविण्यास 'जनता'शी युती करावी असे वाटले नाही. मात्र मुख्यमंत्रिपदाची लालूच दाखविताच त्यांना लोकशाही आठवली. तरीही त्यांनी काँग्रेस सोडली नाहीच. कारण काँग्रेसची धोरणे त्यांना मान्य आहेत. फक्त मुख्यमंत्रिपदावर (इतरांच्या सहकार्याने) जाण्यास विरोध म्हणून विधिमंडळ पुरोगामी आघाडी त्यांनी स्थापन केली आहे. खुर्चीसाठी पक्षत्याग करणे, खुर्चीसाठी पक्षद्रोह करणे व भूमिकेसाठी पक्षत्याग करणे यात फरक आहे. त्यामुळे कालचा प्लेगग्रस्त पक्ष आज संजीवनी देणारा ठरतो. कालचे जातीयवादी व प्रतिगामी आज सहिष्णु पुरोगामी ठरतात. ही खुर्चीची किमया आहे. आलेली सत्ता नाकारून पक्षकार्य, लोकसेवा करणारे मधू लिमये, नानाजी देशमुख, मृणाल गोरे ज्या जनता पक्षात आहेत त्याच जनता पक्षात सत्तेसाठी दुसरे पक्ष फोडून लोकशाहीचा जप करणारेही आहेतच.

आज जनता पक्षात वैयक्तिक महत्त्वाकांक्षेबरोबर आर्थिक धोरणाबद्दल मतभेद आहेत. लघुउद्योगांना प्राधान्य देऊन ग्रामीण शहरी समतोल साधण्यास ग्रामोद्योगास महत्त्व मिळावे म्हणून माजी समाजवादी, भालोद व जनसंघ प्रयत्नशील आहेत तर असलेल्या धोरणातच जुजबी बदल करू इच्छिणारे माजी काँग्रेसवाले आहेत. काँग्रेसच्या भूमिकेस पाठिंबा मिळावा म्हणून सर्व पक्षांतील काँग्रेसवाल्यांना एकत्र आणण्याचे प्रयत्न चालू आहेत. उद्योगपती व हितसंबंधी मंडळी यासाठी प्रयत्नशील आहेतच. म्हणूनच मोठी वृत्तपत्रे एकतर्फी व अतिरंजित बातम्या देऊन जनता पक्षातील मतभेद वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

या मतभेदातून ध्रुवीकरण झाले व दोन पक्ष निर्माण झाले तर चांगलेच होईल. आज जनता पक्षास पर्यायी पक्ष नाही. त्यासाठी एकुलते एक काँग्रेसचे राज्य पाडण्याचा प्रयत्न म्हणजे यांना पर्याय नको आहे की काय, याची शंका निर्माण करणारा आहे. याचा परिणाम इंदिरा काँग्रेसला शक्ती प्राप्त होईल. आज सामान्य नागरिकाला इंदिरा–जनता दोन्ही सारखेच, पण धडाडी असणाऱ्या इंदिराजी बऱ्या असे वाटते.

राजकीय पक्षांना तत्कालीन फायदा म्हणून हुकूमशाहीविरुद्ध आघाडी, लोकशाहीचा जय वगैरे शब्द वापरणे ठीक आहे; पण आपली वृत्तपत्रे व विचारवंत याबाबत स्पष्ट भूमिका घेतात का ? जनता सरकार येण्यापूर्वी वीस कलमी कार्यक्रम, कुटुंब नियोजनइष्टांकपूर्ती इ. बाबत वृत्तपत्रे पुरवण्या प्रसिद्ध करीत. आता कुटुंब नियोजनातील अत्याचार आयोगाचे कामकाज याला प्रसिद्धी देतात. दोन वर्षांपूर्वी मोरारजींच्या वाढदिवसाच्या निमित्ताने एखादा लेख पाठवून त्यात त्यांच्या तडफदार, उत्साही व्यक्तिमत्त्वाचे कौतुक केले असते तर वृत्तपत्रांनी छापले असते का ? आज मात्र त्यांच्या असलेल्या व नसलेल्या गुणांबद्दल विशेष वार्ता छापल्या जातात. एखाद्या तज्ज्ञ डॉक्टरांप्रमाणे त्यांचे आहारा–विहारांवरचे विचार व सल्ला छापला जातो. शिवांबूसह सर्व विचारांना भरमसाठ प्रसिद्धी कशासाठी ? ते त्या पदावरून गेल्यावर, येणाऱ्या नव्या माणसांबद्दल आरत्या ओवाळण्यास पुन्हा तयारी; म्हणजेच वृत्तपत्रे खरोखरच स्वतंत्र आहेत का ? ती लोकशिक्षणाचे काम करतात का ? काही वृत्तपत्रांचा अपवाद सोडल्यास वृत्तपत्रांना स्वातंत्र्य उपभोगण्याचा वकूब नाही असे वाटू लागते.

विचारवंत व वृत्तपत्रे यांचा अंकुश सरकारवर असणे लोकशाहीत अत्यावश्यक असते; परंतु बहुतेक विचारवंत पिंजऱ्यातील पोपट आहेत तर वृत्तपत्रे कोणाच्या तरी व्यक्तिनिष्ठेशी बांधलेली आहेत. ती निःपक्ष व स्वतंत्र (?) तर निश्चितच नाहीत. हीच बाब चिंतेची वाटते.

ज्या पक्षात पक्षकार्यासाठी मंत्रिपद नाकारणारे लिमये–देशमुख आहेत व मंत्रिपद सोडण्यास तयार असलेले बाजपेयी आहेत, व्यक्तिस्तोमावर हल्ला चढवून पक्ष श्रेष्ठ मानणारे कार्यकर्ते आहेत त्या जनता पक्षाकडून काही तरी भरीव होईल व त्यांचे हाती लोकशाही जिवंत राहील, याविषयी शंका नाही.

सोलापूर सौ. मृणालिनी दाते

□ माझ्या मते सध्याचे संमिश्र मंत्रि-मंडळ पूर्वीच्या वसतदादा–तिरपुडे यांच्या मंत्रिमंडळाएवढे अयोग्य युतीचे आहे. जनता पक्षाकडून एवढ्या लवकर ही राजकारणी मतलबी चाल अपेक्षित नव्हती. निवडणुकीत ज्यांना आम्ही कॉंग्रेसविरुद्ध, अगदी स्पष्टच म्हणायचे, तर इंदिरावादी कॉंग्रेसविरुद्ध निवडून दिले त्यांनी हे संमिश्र मंत्रिमंडळ बन-विताना कॉंग्रेस ( याय ) व कालपर्यंत कॉंग्रेस ( आय ) वाल्यांच्या गळचात गळा घातला आहे. त्याहून विरोधात राहणे लोकशाहीला शोभून दिसले असते.

मुंबई श्री. नाबर

□ राजकारण हे सत्तेसाठी असते आणि भले-भले संन्यासी (क्वचित संत सुद्धा) त्या सत्तेसाठी 'काटेरी शिरपेच' पसंत करतात. तेव्हा ही सगळी निव्वळ सत्तालालसा आहे असे म्हणणे त्या घटनेस पुरेसा न्याय देत नाही.

संमिश्र मंत्रिमंडळ हा प्रयोग बरेच वेळा भारतात (राज्यपातळीवर) अयशस्वी ठरला आहे हे जरी खरे असले तरी त्यामुळे तो प्रयोग टाळला जाऊ नये. कारण (किमान महाराष्ट्राच्या संदर्भात) निवडणुका हा मार्ग अव्यवहार्य होता.

वसंतदादांचे ह्यापूर्वीचे मंत्रिमंडळ खुले-पणाने लोकद्रोहावर उभे होते. ज्यांनी श्रीमती गांधींवर सतत (प्रचारात) तिखट टीका केली, त्यांनीच त्या हुकूमशाही शक्तींशी संगनमत केले. त्यामुळे त्या मंत्रिमंडळाला निर्माण झालेला पर्याय स्वागतार्ह ठरतो.

इंदिराशाहीच्या संकटाचा मुकाबला एकटा जनता पक्ष प्रभावीपणे करू शकलेला नाही. तेव्हा असे सहकार्य एकदम टाकाऊ ठरू नये.

अखेरीस, चाळीस वर्षं राजकारणाचा असलेला साचा बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे, म्हणून ह्या घटनेस महत्त्व प्राप्त होते. उतावळेपणाने हे काही तरी वाईट घडले, असे म्हणणे योग्य नाही. जर ह्याही प्रयोग नको असेल तर राष्ट्रपती राजवट येणार. अशा परिस्थितीत संमिश्र मंत्रिमंडळ राबवून पहाणे संसदीय राजकारणाच्या दृष्टीने उचित ठरेल. छोटे किंवा इंदिराजी ह्यांच्या राजकारणाच्या शैलीत ते कदाचित बसत नसेलही, कारण पुंडशाही आणि गर्दी-बाज राजकारण ही त्यांची राजनीती आहे. आपण वेगळ्या राजनीतीची आशा करू या.

पुणे सुहास पळशीकर

□ जांभेकर प्रदीप वसंत, वसई; प्रमोद प्रभाकर गुळूनकर, पुणे; भगवान पुंडलिक बागुल, दाभाडी; व्यंकटेश अनाजी ऊर्फ मालक देशपांडे, पाटण; डॉ. द. रा. जोशी, मलकापूर; विनायक दाते, पुणे; कृ. गो. घाणेकर, पुणे; वसंत बाबुराव काटे, पुणे; मु. ल. कुर्तडीकर, औरंगाबाद; विलास सरवदे, उस्मानाबाद; प्रकाश नीलकंठराव बुर्ली, सांगली; माळी मास्तर, निपाणी; सुधीर भीटवडेकर, पुणे; अरविंद जोशी, लातूर, राम गोगटे, मुंबई; जयंत ध्रास्कर, चिंचवड; अजित कानेटकर, पुणे; मनोहर शेलार, पुणे; पी. एस्. गोगावले, गोगलवाडी; मुकुंद केळकर, भोर; रा. प. नेने, पुणे; अतुल काळे, पुणे; कुंटे धोंडीराम लोणारी, भोर; सुरेश साळुंखे, भोर; मुकुंद आवटे, खेड; फुलचंद भि. सांकला, पुणे; अविनाश कुलकर्णी, पुणे; मधुसूदन रामचंद्र जोशी, चिंचवड; ज. गो. टिपणीस, पुणे; श्रीराम रानडे, पुणे; न. शं. गर्दे, पुणे; वि. प्र. कुलकर्णी, पुणे; वि. अ. देशपांडे, कोल्हापूर; विश्वनाथ कुंभार; जयराम; वसंत सप्रे; भा. वा. दाते; संजय कुलकर्णी; दिलीप जोशी; अशोक आपटे; अनंत केशव पटवर्धन, देवरूख; वि. भि. दबडे, कुलाबा; सोपान राघू भगर, शिवणे; डॉ. डी. ए. आंबेकर, जालना; मनोहर पाटील, मुंबई; रमेश वामन परांजपे, मालाड; मेघराज गोठी, धोटी; ना. रा. काकिर्डे; द. वि. खडवेकर, मुंबई या मंडळींनी नवीन मंत्रिमंडळाच्या बनावाबाबत उल्लेखनीय प्रतिक्रिया कळ-विलेल्या आहेत. जागेअभावी सर्व प्रतिक्रिया प्रसिद्ध करणे शक्य नाही. तरी कुणी गैर-समज करून घेऊ नये. अनेकांनी प्रतिक्रिया प्रसिद्धीसाठी पाठविल्या पण नाव-गाव काहीच लिहिले नाही. त्याही प्रसिद्धीतून वगळाव्या लागल्या. तरी पण या सर्वांनी जागरूकपणे आपापली मते कळविली याबद्दल 'माणूस' या सर्वांचा आभारी आहे. □


## तीन राजहंस प्रकाशने

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

**आणि ड्रॅगन जागा झाला**
अरुण साधू । चवदा रुपये

**फिडेल, चे आणि क्रांती**
अरुण साधू । सात रुपये

**पूर्णिया**
अनिल अवचट । सहा रुपये

रंगभूमी । विनया खडपेकर

# चंदेरी

## नेटका प्रयोग

'नाट्यप्रभा 'निर्मित 'चंदेरी' या नाटकाचे लेखक श्री. रमेश मंत्री आहेत आणि दिग्दर्शन श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांनी केलेले आहे.

'नवऱ्याला हवी मैत्रीण' 'वरातीमागून घोडं' 'शहाणीला भेटला दीड शहाणा' ही रमेश मंत्री यांची आतापर्यंत रंगभूमीवर आलेली नाटके फार्सिकल, विनोदी होती. त्यापेक्षा 'चंदेरी' हे नाटक पूर्णपणे वेगळे आहे. हे मनोविश्लेषणात्मक, गंभीर प्रकृतीचे नाटक आहे. यात विनोद आहे तो नाममात्रच, ताण कमी करण्याकरिता मुद्दाम घातलेला तेवढाच. तिलोत्तमेच्या हृदयातील 'प्रणय' भावनेच्या गुंतागुंतीचे चित्र हा या नाटकाचा मुख्य विषय आहे.

बकुळ या गावात स्वतःच्या बंगल्यात जहागिरदार बापूसाहेब आणि त्यांची पत्नी तिलोत्तमा रहातात. नानासाहेब त्यांचे कारभारी. अक्कासाहेब बापूसाहेबांची बहीण. यमुना, चंदेरी या त्यांच्या घरात काम करणाऱ्या मुली. चंदेरी तिलोत्तमेच्या माहेरची. तिच्या गरीब मैत्रिणीची मुलगी. विवाहाला सातआठ वर्षे झाली तरी तिलोत्तमेला मूलबाळ नाही. साखरकारखाना आणि तत्संबंधीची कामे या व्यापात बापूसाहेब दंग आहेत.

गावातल्या जत्रेत चंदेरी आणि तिलोत्तमा यांची नीलकंठ सामंत या तरुणाशी ओळख होते. बैल धावून आलेला असताना तो तिलोत्तमेला वाचवितो. अल्लड, निष्पाप चंदेरीच्या प्रेमात पडतो. तिच्याशी भेटीगाठी घेऊन दोन दिवसांत मुंबईला निघून जातो. चंदेरीला पत्र लिहितो. चंदेरी निरक्षर असल्यामुळे तिलोत्तमाच उत्तर पाठविते. अशी पत्रापत्री वाढते. चंदेरीसाठी लिहिणारी तिलोत्तमा स्वतःच त्या पत्रात गुरफटते. मात्र ज्या क्षणी तिलोत्तमेला हे कळते की, चंदेरी नीलच्या मुलाची आई होणार आहे त्या क्षणी तिलोत्तमा बदलते. ती चंदेरीची काळजी वाहणारी आई होते. नील आणि चंदेरीचा विवाह घडवून आणते. विवाहानंतर नीलला कळते चंदेरी निरक्षर आहे. ती पत्रे, त्यातील भावना, मानसिक गुंतागुंत हे सारे तिलोत्तमेचे. नील तिच्याकडे प्रेमाच्या एका क्षणाची याचना करतो; पण तिलोत्तमा खरी नीलमध्ये गुंतलीच नाही. ती गुंतली होती विशुद्ध प्रेमपत्रांच्या लेखनात आणि वाचनात. निमित्त झाला होता नील. तिच्या मनात होते बापूसाहेबच. तिलोत्तमा–नील संवादातून हे बापूसाहेबांना कळते. ते तिला समजून घेतात. नीलही सावरतो. चंदेरीला घेऊन जातो. खिडकीतून बापूसाहेब, तिलोत्तमा त्यांच्याकडे पहात असतात. येथेच नाटक संपते.

या नाटकातील प्रमुख व्यक्तिरेखा सजीव आणि सूक्ष्म आहेत. त्या लेखक, दिग्दर्शक आणि कलाकार यांची प्रगल्भता दाखविणाऱ्या आहेत.

तिलोत्तमा ही एका खानदानी घराण्यातील सून. ती सुशिक्षित आहे. सुसंस्कृत आहे. भावनोत्कट आहे. परिपक्व आहे. खानदानी कुटुंबाची बंधने तिला पटत नाहीत; परंतु त्यांचा ती जाच मानीत नाही. तडफडणे, चडफडणे, त्रागा करणे हे तिच्या स्वभावात नाही. मात्र म्हणून ती सारे अगतिकपणे सोसते असेही नाही. ती धीट आहे. चतुर आहे. वेळप्रसंग पाहून उलट प्रश्न विचारते. स्वत:ची नाराजी व्यक्त करते. बापूसाहेबांनी गुर्मीत राहू नये, ज्यांना ते जंगली म्हणतात त्यांच्यातलेच ते मूळचे आहेत हे भान ठेवावे असे तिला वाटते. म्हणूनच जत्रेच्या गोंगाटामुळे बापूसाहेबांच्या चिडण्यावर ती म्हणते, 'अक्का तर म्हणत होत्या, आपल्यासही लहानपणी आवडावयाचे ते सारे." बापूसाहेबांच्या सतत कामात दंग असण्यावरून ती म्हणते, "मला माहीत आहे. अर्ध्या रात्रीही मी सांगू शकेन तुम्ही कारखान्याबद्दलच बोलणार !" दुसऱ्यांदा एके ठिकाणी ती म्हणते, "मला एकटीला जाऊन काय करायचे आहे काश्मीरला ? " बस ! तिच्या नाराजीचे प्रकटीकरण एवढेच. तीव्र परंतु संयमी. ती घरातले सगळे ऐकतेच असे नाही. घरातल्या वातावरणाविरुद्ध ती चंदेरीचे लाड करतेच. त्या बाबतीत ती फारसे कुणाचेच ऐकत नाही. तिचे खानदानीपण असे की चंदेरीची तिची कितीही जवळीक असली तरी मोलकरीण–मालकीण हे अंतर तुटलेलं नाही. अगदी सहजपणे ते राहते. हे अंतर ठेवण्यासाठी तिलोत्तमेला मुद्दाम प्रयत्नही करावे लागत नाहीत. तिलोत्तमा, चंदेरीच्या प्रेमाच्या गोष्टी रस घेऊन ऐकते. तिला शिकविते. पत्रे लिहून देते. जत्रेला पाठविते. शोधायला जाते. विशेष प्रसंगी नील येतो तेव्हा आपली साडीही नेसायला देते; पण घरातल्या कोचावर ती तिला खेळू देत नाही, हेच ते अंतर. नीलच्या बाबतीतले तिचे वागणे बुचकळ्यात टाकते. त्याला पत्रे लिहिताना ती धुंद होते. भान हरपलेल्या त्या मनोवस्थेत खानदानी, संयमी तिलोत्तमेचे अवधान एकदोन क्षणी सुटते. एकदा ती चंदेरीला म्हणते, तुझा काय हक्क आहे त्या प्रेमावर? ती सगळी माझी पत्रं आहेत. मी लिहिलेल्या पत्रांना आलेली उत्तरं आहेत." एकदा ती अक्कासाहेबांना म्हणते, "ते मूल आमचं दोघींचं आहे. खरं म्हणजे ते माझ्याच पोटी यायला हवं होतं." अशा विचित्र शब्दांत ती आपले मनोगत व्यक्त करते. तेव्हा वाटते, तिलोत्तमा नीलच्या आकर्षणात सापडली आहे. मग पुढे काय घडते? पुढे ती दिसते गरोदर चंदेरीची चिंता वाहणारी आई म्हणून. नीलच्या आगमनाच्या दिवशी ती किंचित् अधीर वाटते. त्याने कवितेचा उल्लेख केल्यावर क्षणभर बावरी होते; पण क्षणभरच ! मग पुन्हा ती चंदेरीमधे गढून जाते. नीलवरचे प्रेम व्यक्त करणे व्यवहाराला धरून होणार नाही म्हणून ढोंगीपणाने किंवा संयमाने ती अशी वागते असे वाटत नाही. खरोखरच तिचा नीलशी संबंध नाही आणि ती चंदेरीच्या विवाहसमारंभात

आईसारखी गुरफटून गेली आहे असे वाटते. या वागण्याचा अर्थ लागतो, तिने शेवटी नीलला दिलेल्या उत्तरात. ती म्हणते, "मला प्रेमपत्रे लिहायची होती. तुम्ही निमित्त झालात. माझ्या मनात बापूसाहेबच होते. मी खरे म्हणजे त्यांनाच लिहीत होते. त्यांच्याकडून अपेक्षा करीत होते." तिचा चेहरा, तिचा स्वर, तिचे शब्द सांगतात तिचे हे निवेदन प्रांजळ आहे. याचा अर्थ असा की, तिच्या हृदयातल्या प्रेमभावनेचा आविष्कार होण्याचे 'नील' हे एक निमित्त ठरते. नीलच्या पत्रांना उत्तरे लिहिणे, त्याच्या येण्याची अधीरतेने वाट पाहणे हा सारा आविष्कार प्रकट होण्याचाच प्रकार. मूल नसलेली आई किंवा मूल दूरगावी असलेली आई दुसऱ्याच्या मुलावर प्रेम करते. त्या दुसऱ्या मुलाला केवळ एक साधन एवढेच महत्त्व असते. वास्तविक तो स्वतःच्याच वात्सल्यभावनेचे कोड पुरवीत असते. तसे हृदयातील प्रणयभावनेचे कोड तिलोत्तमा 'नील'च्या निमित्ताने पुरवून घेते. म्हणूनच पत्रांच्या खेळात दुसऱ्या बाजूला नील आहे हे धडधडीत माहीत असताना ती बापूसाहेबांची कल्पना करते. तरी ती लबाड नाही, धूर्त नाही, वेडी नाही, ती अतिशय भावनाकुल आहे. प्रणय, वात्सल्य या भावनांच्या गुंतागुंतीच्या आविष्काराने तिची व्यक्तिरेखा विलक्षण चित्तवेधक झाली आहे.

क्रमांक दोनची व्यक्तिरेखा आहे बापूसाहेबांची. बापूसाहेब पिढीजाद श्रीमंत आहेत. शिवाय स्वतःच्या कर्तृत्वाने ती श्रीमंती वाढविली आहे. त्याचा सार्थ अहंकार त्यांच्या ठिकाणी आहे. तेही सुशिक्षित आहेत, सुसंस्कृत आहेत. सुशिक्षित पत्नीने आपल्या व्यापात समरसून भाग घ्यावा अशी त्यांची रास्त इच्छा आहे. त्या बाबतीत तिलोत्तमेकडून त्यांचा अपेक्षाभंग होतो. या अपेक्षाभंगाचा बाऊ करणे त्यांच्या स्वभावात नाही. किंबहुना या अपेक्षाभंगांना त्यांच्या आयुष्यात महत्त्वाचे स्थान नाही. अक्काशी बोलताना सहज या गोष्टीचा उल्लेख होतो. विचारांचा गुंता, भावनांचे खेळ त्यांच्यात अगदीच नाहीत; परंतु माणसांची त्यांना पारख आहे. म्हणूनच तिलोत्तमेचे पत्रात गुरफटून जाणे ते समजू शकतात. तिला काही अधिक विचारण्याची त्यांना आवश्यकता भासत नाही. नील-तिलोत्तमा बोलणे ते मागे उभे राहून ऐकतात. एक शब्दही न बोलता निघून जातात. त्यांचे हे न बोलणेच फार बोलके आहे. त्यांच्या सरळसोट वाटणाऱ्या व्यक्तिमत्त्वाची असामान्य समजशक्ती दाखविणारे आहे. भोवतालच्या लोकांपेक्षा ते स्वतःला उच्च समजत असले तरी ते उर्मट नाहीत. 'नील'चे काका जरी घरातल्या मोलकरणीचे भावी सासरे असले ते त्यांना सन्मानाने वागवितात. मात्र त्यांनी नीलच्या काकांना शेवटी चाळीस हजार रुपये देणे हे त्यांचे ओढूनताणून अकारण केलेले उदात्तीकरण वाटते.

नील सामंत एक उमदा, हुषार, प्रामाणिक तरुण. तो स्वाभिमानी आहे. शब्दाला जागणारा आहे. भावनोत्कट आहे. रसिक आहे. चंदेरी निरक्षर आहे हे कळल्यावर त्याचा दारुण मनोभंग होतो. 'एका माणसाची काय पडझड होईल' असं तुम्हाला वाटलं नाही का?' असा प्रश्न तो तिलोत्तमेला विचारतो; पण आग पाखडीत नाही. चंदेरीला जनावर म्हणतो तेव्हाही त्याचे शब्द विषारी वाटत नाहीत. दारुण दुःखाचे वाटतात. तो नंतर समाधानाने चंदेरीला घेऊन जातो. आपला शब्द शेवटपर्यंत पाळतो; पण अशा या जबाबदार तरुणाचे चित्र उभे करताना एक मोठी चूक झाली आहे. नील म्हणतो, 'खरे जे काही घडले ते पत्रातच. माझे प्रेम होते त्या पत्र लिहिणाऱ्या व्यक्तीवर!' पत्रापत्री होण्यापूर्वीच चंदेरी आई होण्यापर्यंत मजल गेली असताना नीलच्या या बोलण्याला कितपत अर्थ आहे? आधीच चंदेरीबद्दल वाटत असलेले प्रेम या पत्रामुळे अधिक उत्कट होते आणि ती पत्रे तिची नव्हतीच म्हटल्यावर तो मानसिकदृष्टचा कोसळणे अगदी स्वाभाविक आहे. तरी जे काही घडले ते पत्रानंतरच हे त्याचे बोलणे केवळ बेजबाबदारपणाचे आहे.

अक्का बापूसाहेबांची बहीण. ती तिलोत्तमेला समजू शकते. भावालाही समजू शकते. दोघांना जोडण्याचा प्रयत्न करते; पण उपदेशाचा भडिमार नाही. घराण्याच्या रीतिरिवाजाच्या मर्यादा तिलोत्तमेने ओलांडू नयेत असे तिला वाटते ती ते बोलून दाखवते. कमालीच्या सौजन्याने तिलोत्तमेला उमगावे पण तिचा अपमान होऊ नये अशा धडाणपणाने.

या तुलनेने चंदेरीची व्यक्तिरेखा नाटकात महत्त्वाची असूनही काहीशी ढोबळ उतरली आहे. 'अशिक्षित, निष्पाप, अल्लड तरुणी' हे मराठी, हिंदी नाटक चित्रपटातले आवडते पात्र आहे. तिने कसे बोलायचे, कसे हसायचे, कसे वागायचे हे ठरून गेले आहे. त्याच सांकेतिक मुशीतून चंदेरी निर्माण झाली आहे. म्हणून ती खळाखळा हसते. भडाभडा बोलते. 'नवराबायकोत जे जे होते ते ते सगळं आमच्यात झालं' असं खुल्लंखुल्ला सांगून टाकते. हे स्वाभाविक म्हणून चित्रित केलेले वागणे त्यातील सांकेतिकतेमुळे कृत्रिम वाटते. मात्र तिलोत्तमेच्या पत्रांबद्दलच्या भावना तिला Instinctively कळत नाहीत. स्वार्थासाठी आपली निरक्षरता ती लपवून ठेवते. येथे ती सांकेतिकतेपासून दूर जाते. वास्तव होते.

दुय्यम पात्रे वकील, यमुना आणि नानासाहेब यांची नाटकात खास आवश्यकता वाटत नाही. कथानकाला ती कोणताही हातभार लावीत नाहीत. फक्त घरंदाज श्रीमंतीच्या वातावरणाला ती पोषक आहेत. म्हणून ती आगंतुकही वाटत नाहीत. त्यांच्याखेरीज वातावरणाचा परिणाम साधता आला असता तर बरे झाले असते. वकील-नाना संवाद, यमुना-चंदेरी संवाद केवळ प्रेक्षकांना हसविण्यासाठीच टाकले आहेत. मात्र ते थोडक्यात आटोपले आहेत हे बरे झाले. जर ते लांबविण्याचा मोह झाला असता तर नाटकाची गती संथावली असती.

खानदानी कुटुंबाचे एक सुंदर दृश्य येथे दिसते. ही श्रीमंत माणसे सुसंस्कृत आहेत, वाचाळ नाहीत. सर्वसामान्यपणे श्रीमंत म्हणजे दुर्गुणांचे, व्यसनांचे आगर असे चित्र वाङ्मयात आढळते. हिंदी चित्रपटात 'खानदानकी इज्जत' या प्रकरणाने मोठाच घुडगूस घातला आहे. या ठरीव ठशातून नाटकातील वातावरण सुटले आहे. ते वास्तवाशी येऊन भिडले आहे.

तसे पाहिले तर नाटकाच्या कथानकाचा मसाला नेहमीचाच आहे. १. कुमारिका गरोदर रहाणे २. कामात बुडालेल्या पतीमुळे पत्नीचा एकटेपणा. ३. प्रेमाचा त्रिकोण ४. विनोदी पात्रे ५. पति-पत्नीचे शेवटी मीलन. या घटकातूनच बहुतेक चित्रपट, नाट-

काची कथानके निर्माण होतात. हेच घटक 'चंदेरी 'तही असल्यामुळे हे सुंदर चाललेले नाटक मध्येच कोसळेल की काय अशी भीती वाटत होती. विशेषत: 'या पत्रांवर काय तुझा हक्क ?' हे तिलोत्तमेचे वाक्य 'आहे. फिर्यादी आहे आणि आरोपही आहेच ' हे बापूसाहेबांचे वाक्य या दोन वाक्यांना ही भीती वाटली; परंतु सुदैवाने ती खोटी ठरली. या वाक्यांची फेक थोडी सवंग हिंदी चित्रपटस्टाइल होते. म्हणूनही तसे वाटत असेल.

नाटकाचा प्रयोग अगदी चोख आहे. खेड्यातील श्रीमंत जहागिरदाराचा बंगला योग्य रीतीने सजविला आहे. केवळ तोरणे बांधून लग्नाच्या वातावरणाचा परिणाम साधण्यात कौशल्य आहे. सर्व पात्रांची वेषभूषा, केशभूषा, रंगभूषा भूमिकेला अनुरूप आहेत. सर्वांनी आपापल्या भूमिका समरसून केल्या आहेत. तरी काहींचा उल्लेख विशेषत्वाने करणे योग्य होईल.

तिलोत्तमेची भूमिका ही नाटकातील मध्यवर्ती भूमिका आहे. ही व्यक्तिरेखा अतिशय मोहक, कमालीची भावगर्भ, कलावंताला आव्हान करणारी आहे. लता, अरुण यांनी हे आव्हान समर्थपणे पेलले आहे. त्यांचे रूप सुंदर आहे. चेहरा अतिशय भावदर्शी आहे. आवाज मधुर आहे. वाणी विलक्षण परिणामकारक आहे. त्यांनी उभ्या केलेल्या तिलोत्तमेच्या बोलण्यात अभिजात सुसंस्कृती आहे. चालण्यात खानदानी डौल आहे. हृदयात वात्सल्य आहे. वृत्तीत उत्कटता आहे. विचारांनी या उत्कटतेला अगदी नकळत खेचून धरले आहे. काही अपवाद वगळता इतका सुजाण अभिनय अभावानेच पहायला मिळतो.

लता-अरुण यांच्या खालोखाल श्री. मोहन कोठीवान (बापूसाहेब) सौ. सरोज कोठीवान (अक्कासाहेब) यांचा अभिनय वाखाणण्याजोगा आहे. कर्तृत्ववान परंतु अहंकारी, करारी पण समंजस असे बापूसाहेबांचे पैलू दाखविण्यात श्री. कोठीवान यशस्वी झाले आहेत. खानदानी कुटुंबातील एक शहाणीसुरती प्रौढा सौ. सरोज कोठीवान यांनी सहजपणे मूर्त केली आहे. खरे म्हणजे सौ. कोठीवान यांना वाव फार थोडा आहे; पण अभिनयकौशल्याची चमक तेवढ्यातही दिसते. मुकुंद गोखले (नील सामंत), नयनतारा (चंदेरी) यांच्या भूमिका एकंदर ठीक आहेत. बाकी आरती कलबाग (यमुना), विश्वास गाडे (नानासाहेब) नाना शिंदे (नानासाहेब) गणेश सोळंकी (वकीलसाहेब) यांनी आपापल्या लहान भूमिका व्यवस्थित संभाळल्या आहेत.

नाटकाच्या सुरुवातीला पारदर्शक पडद्यातून जत्रेचे दृश्य दाखविले आहे. ते रंगीबेरंगी दृश्य प्रेक्षकांना चट्कन आकृष्ट करून घेते. सुरुवातीलाच एक उत्कंठा लावते; परंतु कथानकात या दृश्यांची बिलकुल आवश्यकता वाटत नाही. चंदेरी जत्रेला गेली होती हे पुढच्या संवादावरून कळतेच.

नाटकाचे नाव जरी 'चंदेरी' असले तरी हे नाटक आहे तिलोत्तमेचेच. तिलोत्तमेभोवतीच सारे कथानक फिरते. या दृष्टीने नाटकाचे नाव खटकते. मात्र चंदेरी या शब्दात एक माधुर्य असल्यामुळे हे नाव मोहविते.

सजीव व्यक्तिरेखा, सूक्ष्म मनोविश्लेषण आणि नेटका प्रयोग यामुळे 'चंदेरी' एक समाधान देणारी कलाकृती ठरते. *

---

# ह्यांचं मेलं असंच !

## एक सामान्य फार्स

---

'अनुभूती' निर्मित "ह्यांचं मेलं असंच !" या नाटकाचे लेखक श्री. श्रीधर घैसास आहेत आणि दिग्दर्शन श्री. रवींद्र दिवेकर यांनी केलेले आहे.

श्री. साखरदांडे हे सचिवालयातले बडे अधिकारी. त्यांच्या पत्नी दीपिकाबाई. मुलगी संगीता. ती गायन शिकते. तिचे शिक्षक सचिवालयाच्या कुटुंबनियोजनखात्याचे गायक म्हणून काम करणारे. श्री. साखरदांडे यांचा भाचा मुकुंदा. छायाचित्रे घेणे हा त्याचा व्यवसाय. मालतीबाई श्री. साखरदांड्यांच्या हाताखाली त्यांच्या कचेरीत काम करणारी स्त्री. शेजारी रहाणारे गृहस्थ अण्णा, त्यांचा मुलगा श्रीरंग. श्री. नवरे हे समोर रहाणारे गृहस्थ.

दीपिकाबाईंचा संशयी स्वभाव आणि त्या संशयी स्वभावाला खाद्य पुरवतील अशा योगायोगाने घडणाऱ्या गोष्टी व त्यातून निर्माण झालेला गोंधळ हा या नाटकाचा मुख्य विषय आहे.

गणेशचतुर्थीचा दिवस. आरती वगैरे झाल्यावर सगळे पांगतात. एका अज्ञात स्त्रीकडून श्री. साखरदांड्यांना वाढदिवसाची भेट येते. दीपिकाबाईंच्या मनात काहूर माजते. नवऱ्याच्या सगळ्या हालचालींवर ती बारीक लक्ष ठेवते. समोरच्या घरातून व्हायोलिनवादनाद्वारे आपल्या नवऱ्याला संदेश येतात असे तिला वाटते. नवऱ्याच्या सगळीकडे बायकांच्या भानगडी आहेत असे तिला ठामपणे वाटते. मग आपला छायाचित्रकार भाचा मुकुंद याला ती हाताशी धरते. "ह्यांचे" कोणत्या तरी बाईबरोबरचे 'तसले' फोटो मला पुरावा म्हणून आणून दे असे ती त्याला सांगते. त्यासाठी ती सहलीला निघते तेव्हा कॅमेरा घेऊन मुकुंदाला घरात लपायला सांगते. मध्येच गायन-गुरुजी येतात आणि गंमत म्हणून दीपिकाबाई-मुकुंदा यांची छायाचित्रे घेतात. दिपिकाबाई-मुकुंदा एकमेकांच्यावर आदळत असणाऱ्या क्षणांची छायाचित्रे योगायोगाने टिपली जातात. दीपिकाबाई सहलीला जाते श्री. साखरदांडे घरी येतात. मालतीचा फोन येतो. ते तिला फाइल घेऊन यायला सांगतात. कपडे बदलून येतात. एवढ्यात श्रीरंगा लपण्यासाठी आणि त्याचे वडील त्याला शोधण्यासाठी साखरदांड्यांच्या घरात धुडगूस घालतात. झटापटीत ते साखरदांड्यांची लुंगी घेऊन जातात. मालती घरात शिरते तेव्हा साखरदांडे बनियन-अंडरपँट या पोषाखात. त्यांना तसे पाहून मालतीला चक्कर येते म्हणून, ते तिला सावरतात. मुकुंदाचा कॅमेरा आपले काम करतो. नंतर हिकमतीने श्री. साखरदांडे मुकुंदाच्या घरातून रोल पळवितात. तो रोल दीपिका-मुकुंदा यांची छायाचित्रे टिपलेला असतो. श्री. साखरदांडे-मालती यांची छायाचित्रे टिपलेला रोल मुकुंदाजवळ रहातो. ती छायाचित्रे अर्थात दीपिकाबाईकडे जातात. दोघे एकमेकांवर तोंडसुख घेतात. शेवटी दीपिकाबाई-मुकुंद' छायाचित्रांचा खुलासा गायनगुरुजी करतो. बुरख्यांचा खुलासा मुकुंदा करतो. एवढ्यात मालती येते. बुरखाधारी मुकुंदाला पाहून तिला चक्कर येते. श्री.

साखरदांडे तिला सावरतात. म्हणजे त्याही छायाचित्रांचा उलगडा आपोआप होतो.

कथानकाच्या बांधणीत अनेक दोष आहेत. हा फार्स आहे तेव्हा तार्किक सुसंगती अपेक्षित नाहीच; परंतु कोणत्या ना कोणत्या तन्तूने सर्व घटना, प्रसंग एकमेकांना बांधले गेले पाहिजेत. तसे येथे झालेले नाही. पहिला गणेशचतुर्थीनिमित्त होणारा आरतीचा प्रसंग, ते संगीताने आधुनिक पद्धतीने आरती म्हणणे या प्रसंगाचा पुढे नाटकाशी काहीही संबंध नाही. तो प्रसंग वगळून एकदम मुकुंदा प्रवेशतो येथे नाटक सुरू झाले असते तरी काही बिघडले नसते. सौ. नवरे आणि श्री. साखरदांडे यांचे संबंध कोणते, व्हायोलिन-वादनाचा प्रकार काय, मालती कशासाठी येते याची उत्तरे नाटकात नाहीत. लेखकाने कथानकाच्या बांधणीकडे काटेकोरपणे लक्षच पुरविलेले नाही.

वाह्यात विनोदाची रेलचेल करून प्रेक्षकांना हसविण्यात लेखकाचे सारे श्रम खर्ची पडले आहेत. दीपिकाबाई स्वतःच्या मुलीला म्हणते, " अग,रात्री ह्यांनी माझं उघडूनसुद्धा बघितलं नाही-म्हणजे प्रेझेंट ग ! " असेच विनोद क्षणाक्षणाला सबंध नाटकभर चालू असतात. जेथे वाह्यातपणा करण्यासाठी शब्दांची शक्ती कमी वाटली आहे तेथे पात्रांच्या कृतीने ती उणीव भरून काढली आहे. दीपिकाबाई-मुकुंदा यांनी एकमेकांना मारलेले धक्के, श्री. नवरे यांनी मालतीला मांडीवर घेणे अशापैकी त्या कृती. श्री. साखरदांडे रंगमंचावर 'अंडरवेअर'मध्ये असताना बऱ्याच वाकड्यातिकड्या उड्या मारतात ते अशाच कृतींपैकी. सहज आठवतो 'नांदा सौख्यभरे' या सई परांजपे यांच्या नाटकातील एक प्रसंग. घाईगर्दीत ऑफिसला निघालेले श्री. अरुण जोगळेकर अंडरपँटमध्येच रंगमंचावर येतात. 'वा ! अग, तू काय मला धांदरट समजतेस ? ' असे बायकोला रुबाबात बोलून अंडरपँन्टवरच ऑफिसमध्ये पळतात. येथे एक निर्मळ विनोदाला प्रेक्षक पोट धरधरून हसतात. कारण लेखिका दाखविते एका माणसाचा धांदरटपणा, आपण धांदरट नाही हे सिद्ध करण्याच्या धडपडीतून त्याचे सिद्ध झालेले धांदरटपणच. त्याचे 'उघडे शरीर' हा विनोदाचा विषय नाही. प्रस्तुत 'ह्यांचं मेलं असंच' या नाटकात मात्र श्री. साखरदांडे यांचे बनियन-हाफपॅन्टमध्ये रंगमंचावर असणे भांडवल म्हणून वापरले आहे. 'तुज आहे तुजपाशी' मधल्या काकाजीच्या राजस भूमिकेची चव चाखलेल्या दाजी भाटवडेकरांनी लोकांना हसविण्यासाठी रंगमंचावर अंडरपँटची खेचाखेच करीत उड्या मारा-व्यात हा दैवदुर्विलास खेदजनक आहे.

नाटकाचा प्रयोग एकंदरीत ठीक होतो. रजनी जोशी ( दीपिकाबाई ) दाजी भाटवडेकर ( श्री. साखरदांडे ) शशिकांत कारेकर ( गायनमास्तर ) रवींद्र दिवेकर ( मुकुंदा ). गणेश सोळंकी ( नवरे ) सुभाष वेंगुर्लेकर ( श्रीरंग ) विजय बोरकर (अण्णा) विजय साळवी ( गुरुजी ) या कलाकारांनी आपल्या भूमिका व्यवस्थितपणे केल्या आहेत. लता म्हापसेकर ( मालतीबाई ) यांची वाक्य उच्चारण्याची पद्धत कृत्रिम, नाटकी वाटते. विशेष लक्षात रहातात त्या ज्योती पाडळकर. 'संगीता'च्या भूमिकेत आपले अभिनयकौशल्य दाखवायला त्यांना वाव फार थोडा आहे. तरीही त्यांचे सहज बोलणे, चालणे, रंगमंचावर एकंदर वावरणे अभिनयकौशल्याची झलक दाखवून जाते. सर्वच पात्रांची रंगभूषा, केशभूषा भूमिकेला योग्य आहे. रंगमंचावर दिसणाऱ्या खोलीची सजावट योग्य पद्धतीने केली आहे. त्यातील फर्निचर, एकंदर वस्तू यावरून ती कोणत्या तरी बड्या अधिकाऱ्याच्या घराचीच खोली वाटते. कोठे भडकपणा नाही, अतिश्रीमंती नाही.

' ह्यांचं मेलं असंच ' हे फार्सचे नावही योग्य वाटते. कारण दीपिकाबाईंच्या संशयी मनाला एकसारखे वाटते, ह्यांचं मेलं असंच !

हा फार्स ही एक निकृष्ट दर्जाची करमणूक आहे. नाटकाचा हा तमाशा पाहून असे वाटते, नाटकाची सुरुवात गणेशचतुर्थीच्या प्रसंगाने करण्यापेक्षा शिमग्याने केली असती तर साजरे झाले असते. □


# निबंधस्पर्धा

भारतीय बाल-कल्याण परिषदेतर्फे एक निबंधस्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. निबंधासाठी विषय आहे – ' मुलांचा हक्क '– प्रथम तीन क्रमांकांना योग्य बक्षिसे दिली जातील.

ह्या स्पर्धेत फक्त १३ ते १५ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना भाग घेता येईल. निबंध इंग्लिश, हिंदी किंवा मराठी भाषेत असावा. हे निबंध शाळाप्रमुखांमार्फत खालील पत्त्यावर १५ सप्टेंबर १९७८ पर्यंत पोचणे आवश्यक आहे :–

मानद चिटणीस,

**महाराष्ट्र राज्य बालविकास समिती**

शिवनेरी अॅनेक्स,

अॅलेक्झांडर ग्रॅहेम बेल मार्ग.

मलबार हिल, मुंबई ४००००६.